ता० २३ डिसेंबर १८९०.

# अबलोन्नतिलेखमाला.

## लेख दुसरा.

ह्याच्या चालीरीतींचा संक्रमणेतिहास व लग्नाचे खरे उद्देश आणि त्यांचें परस्पर महत्व यांजविषयीं.

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:-मनु:
गृहे लक्ष्म्यो मान्या: सततमबला मानविभवै:-वराहमिहिर:

चिं० वि० वैद्य, एम्. ए., एल्. एल्. बी.

प्रांतजज्ज, माळवा, उज्जनी.

डिसेंबर, सन १८९०.

पुणें येथें 'आर्यभूषण' छापखान्यांत छापिला.

---

ग्रंथकर्त्यानें सर्व हक्क आपणाकडे
ठेविले आहेत.

# अबलोन्नतिलेखमाला.

## लेख दुसरा.

### लग्नाच्या चालीरीतींचा संक्रमणेतिहास व लग्नाचे खरे उद्देश आणि त्यांचें परस्पर महत्व यांजविषयीं.

लेखांतील विषय.

लग्नशब्दाच्या व्याख्या पुष्कळ तऱ्हेनें करितां येतील; परंतु लग्नशब्दानें साधारण ज्ञेय हेंच आहे कीं स्त्रीपुरुषांचा समागम कांहीं नियमित काळपर्यंत अव्यभिचारानें रहावा असा निर्बंध असणें. केवळ स्त्रीपुरुषांच्या समागमास लग्न ही संज्ञा देतां येणार नाहीं. पुष्कळ जातींच्या पक्ष्यांचीं जोडपीं एकमेकांस न सोडतां राहतात. तथापि, अशा पक्ष्यांत विवाह आहेत हें ह्मणणें सुयुक्तिक असत नाहीं. किंबहुना पक्षीपशु वगैरे सर्व अंडज प्राण्यांत नरमाद्यांचा कांहीं काळ थोडाबहुत समागम असतोच. अंडज प्राणिकोटि कायम रहावी म्हणून परमेश्वरानें जनावरांत काय व मनुष्यांत काय, कामवासना ठेविली आहे व स्त्रीपुरुषसमागम हें सर्व प्राणिकोटींस साधारण आहे. तसेंच लग्नसंस्था ही पूर्वी मनुष्यजातींत नव्हती व हल्लीं पृथ्वीतलावर कांहीं जाति अगदीं रानटी स्थितींतल्या अशा आहेत कीं त्यांत विवाह नाहींत, ही गोष्ट निर्विवाद आहे. स्पेन्सरनेंही आपल्या समाजशास्त्रग्रंथांत लिहिलें आहे कीं पूर्वी मनुष्यजातींत ज्याला लग्न हें नांव देणें शोभणार नाहीं असेच अनियमित संबंध असत. सारांश लग्नाची संस्था निसर्गप्राप्त नसून नवीन उत्पन्न झाली आहे व लग्नसंज्ञा संभोगास लागू नसून संभोगाचें निबंधन यासच योग्य आहे. हा निर्बंध कसा उत्पन्न झाला व आजपर्यंत का कायम आहे, या निर्बंधाचीं कसकशीं स्वरूपें

होत गेलीं व निरनिराळ्या लग्नाच्या चाली कशा पडल्या व बदलल्या, ह्याचें निरूपण या लेखांत करण्याचें योजिलें आहे. तसेंच लग्नाचे खरे उद्देश समाजशास्त्राच्या दृष्टीनें कोणते आहेत, त्यांचें परस्पर महत्व कसें आहे, व निरनिराळ्या लग्नपद्धतींत हे उद्देश कितपत साधतात व आपल्या हिंदुस्थानच्या सांप्रत विवाहचालीमुळें हे उद्देश कसे सिद्धीस जातात याजविषयीं विचार या लेखांत केला आहे.

लग्नें उत्पन्न होण्याच्या कारणाविषयीं दंतकथा व शास्त्रीय सिद्धांताचें ऐक्य आहे.

२. लग्नाची चाल मनुष्यप्राणि रानटी स्थितींत असता नव्हती व जसजशी सुधारणा होत गेली तसतशी ही चाल पडत गेली ही गोष्ट निर्विवाद आहे. स्पेन्सर ह्मणतो: "अगदीं मूळ स्थितीच्या लोकांत जशी कोणत्याही प्रकारची राज्यव्यवस्था नसते तशीच कुटुंबव्यवस्थाही नसते. स्त्रीपुरुषांचा संबंध व पितापुत्रांचें नातें हीं जशीं पशूंत अनियमित असतात तशींच मूळ स्थितींतल्या मनुष्यांतही असतात, व ज्या लोकांत कांहीं राज्यव्यवस्था असते त्यांत कुटुंबव्यवस्थाही नजरेस येते. यावरून या दोन्ही सुधारणांचा एकमेकींशीं संबंध असून त्या बरोबर होत गेल्या असाव्या." तात्पर्य लग्नसंस्था निसर्गोत्पन्न नसून जशी मनुष्यजातीची संक्रमणस्थिति वाढत गेली तशी उत्पन्न झाली असें दिसतें. कांहीं देशांत ज्या कथा आपण ऐकितों त्यांजवरूनही हेंच अनुमान निघतें. भारतांत आदिपर्वांत कुंतीपण्डुसंवादांत पूर्वीं मनुष्यांत विवाहाची चाल नव्हती असें स्पष्ट वर्णिलें आहे. इतकेंच नव्हे, पण्डूच्या वेळीं उत्तरकुरूच्या लोकांत अनियमित व्यवहार सुरू होते. एकदा असें झालें कीं श्वेतकेतूच्या समक्ष त्याचा बाप तेथें असतां त्याच्या मातेचा एका परपुरुषानें हात धरून चल असें ह्मटलें तेव्हां श्वेतकेतूस कोप येऊन त्यानें असा निर्बंध केला कीं स्त्रियांनीं पतीस सोडून देऊं नये व पतींनीं पत्नीस सोडूं नये; सोडल्यास दोघांस भ्रूणहत्येचें पातक घडेल. दीर्घतमा ऋषीचीही अशीच कथा भारतांत दिली आहे. हा अंध असल्यामुळें त्याची प्रद्वेषी नामक बायको त्यास सोडून दुसरा नवरा करण्याच्या इच्छेनें जाऊं लागली तेव्हां त्यानेंही अ-

ही मर्यादा केली कीं इतउत्तर स्त्रियांस एकच पति होईल*; ह्मणजे लग्नाचा हा दुसरा निर्बंध झाला असें ह्मटलें पाहिजे. ग्रीस देशाच्या इतिहासांतही सीक्राप्स राजानें ग्रीक लोकांत ही संस्था सुरू केली असें वर्णिलें आहे. याचें कारण काय झालें याचा उल्लेख मिळाला नाहीं. असो. अशा दंतकथा मागाहून विचारी लोकांनीं कल्पिल्या असाव्या असा संशय येण्यासारखा आहे खरा. तत्रापि हें निर्विवाद आहे कीं वरील दंतकथांचें व स्पेन्सरच्या शास्त्रीय सिद्धांताचें पूर्ण साम्य आहे; ह्मणजे मनुष्यजातींत प्रथमतः अनियमित व्यवहार होत व अशा व्यवहारापासून पितापुत्रांचें नातें चांगलें राहत नसून उतारवयांत व बाळपणांतही मनुष्याची जोपा चांगली होत नसे. याच अडचणींमुळें विवाहपद्धति सोईवार होऊन अमलांत आली असावी. लग्नापासून समाजास फायदे कसे होतात हें स्पेन्सरनें उत्कृष्ट रीतीनें दाखविलें आहे. हें समजण्यपूर्वीं मनुष्यांचा एक चमत्कारिक स्वभाव पूर्णपणें लक्षांत आला पाहिजे.

मनुष्यसमाजांचा नेहमीं परस्पर युद्धाकडे कल असतो.

३. मनुष्य हा समाजप्रिय प्राणि आहे अशी व्याख्या आपण पुष्कळ ऐकतों, परंतु ही व्याख्या अपुरी आहे. जमाव करून एकत्र राहण्याचा मनुष्याचा स्वभाव आहे खरा; अगदीं रानटी स्थितींतील लोक सुद्धां हिंस्रक पशूंप्रमाणें स्वजातीयांचा त्याग करून एकेकटे राहिलेले

---

* अनावृताः किल पुरा स्त्रिय आसन् वरानने
कामचारविहारिण्यः स्वतंत्राश्चारुहासिनि ।
प्रमाणदृष्टो धर्मोयं...कुरुष्वद्यापि पूज्यते ।
श्वेतकेतोः किलपुरा समक्षं मातरं पितुः
जग्राह ब्राह्मणःपाणौ गच्छाव इति चाब्रवीत् ।
क्रुद्धं तं तु पिता दृष्ट्वा श्वेतकेतुमवाचह ।
यथा गावः स्थितास्तात स्वे स्वे वर्णे तथा स्त्रियः ॥
तदाप्रभृति मर्यादा स्थितेयमिति नः श्रुतम्
व्युचरन्त्याः पतिं नार्या अद्यप्रभृति पातकम्—वगैरे–महाभारत.
प्रद्वेषी उवाच—अहं त्वां भरणं कृत्वा जात्यंधं ससुतं तदा
नित्यकालं श्रमेणार्त्तो नाभरेयं महातपाः ।—महाभारत.

आढळत नाहींत. तथापि याच्याच विरुद्ध मनुष्यांचा असाही एक स्वभाव आहे कीं, ते नेहमीं आपसांत कलह करितात. एक समूह दुसऱ्यास पादाव करून जिंकिण्यास इच्छित असतो. ही लढाईकडे ओढणारी प्रवृत्ति अमेरिकन ताम्रवर्ण इंडियनांपासून तों सुधारलेल्या इंग्लिश, जर्मन, फ्रेंच लोकांपर्यंत सारखीच दृष्टीस पडते; ह्मणून मनुष्याची पूर्ण व्याख्या अशी होईल कीं मनुष्य हा आपल्या समाजांत एकीनें व दुसऱ्या समाजांशीं शत्रुत्वानें राहणारा प्राणि आहे. स्पेन्सरनें ह्मटलें आहे: "मनुष्यजातीचें अस्तित्व जगांत कायम आहे तें इतर प्राण्यांप्रमाणें मनुष्यजात एक संघानें राहिल्यामुळें आहे असें नाहीं, परंतु मानवी जातीचे समाजरूपी निरनिराळे परस्पर शत्रुत्वानें राहणारे भाग होऊन त्याचें अस्तित्व कायम आहे ह्मणून आहे." ह्मणजे इतर प्राण्यांहून या गोष्टींत मनुष्यप्राणि भिन्न आहे. इतर प्राणि एकाच जातींत एकमेकांस मारून टाकण्याचा प्रयत्न करीत नाहींत यामुळें त्या जातीस फक्त इतर जातींपासूनच बचाव करावा लागतो. मनुष्यास इतर प्राणि खाऊं पाहतात इतकेंच नाहीं, ते आपसांत एकमेक समाजास नाहींसें करण्याचा यत्न करीत असतात, ह्मणून मनुष्यजाति जगांत कायम राहून वाढत जाण्यास परस्परसमाज बळकट होऊन एकमेकांस हार न जातील असें झालें पाहिजे, तरच ही जात टिकेल. हा हेतु साधण्यास लग्नसंस्था हें एक साधन आहे.

लग्नापासून पितापुत्रांचें नातें व कुटुंब व जात्यभिमान व पूर्वजभक्ति इत्यादि एकीचीं कारणें उत्पन्न होतात.

४. एक समाज दुसऱ्या समाजास हार न जाईल असें होण्यास प्रत्येक समाजाची एकी व संख्या वाढत गेली पाहिजेत व लग्नसंस्थेपासून हे दोन्ही हेतु साधतात. आतां हे हेतु साधावे ह्मणून बुद्धिपूर्वक मनुष्यांनीं विवाहाचे नियम घालून दिले हें युक्तीस ठीक दिसत नाहीं. असें झालें असावें कीं जे समाज लग्नसंस्था अमलांत आल्यामुळें वाढत गेले त्यांनीं इतरांस जिंकून नाहींसें केलें किंवा आपल्यांत मिसळून टाकलें. ज्या लोकांत स्त्रीपुरुषांचे समागमाविषयीं कांहीं निर्बंध नसतो तेथें मुलाचा बाप कोणता हें ओळखणें शक्यच नाहीं. आईचें नातें निश्चित होणें सुलभ आहे; परंतु अशा रानटी लोकांत मुलगा कांहींसा मोठा झाला ह्मणजे गोधर्मांप्रमाणें आईची व मुलाची ताटातूट

होऊन कांहीं दिवसांनीं त्यांचीही एकमेकांस ओळख राहत नाहीं. अशा स्थितींत परस्परांविषयीं जितकें प्रेम असेल त्यापेक्षां कोणत्याही प्रकारचा लग्नसंबंध असल्यास त्या लोकांत अधिक असेल हें निःसंशय आहे. सारांश, लग्नाच्या योगानें कुटुंब बनतें व कुटुंबामुळें पुढें जात बनून सहजगत्या जात्यभिमान उत्पन्न होतो. तसेंच बहुतकरून सर्वत्र ठिकाणीं पूर्वजभक्ति सुरू होते यामुळें आह्मीं अमुक पुरुषाचे वंशज असा समाजास अभिमान राहतो; ह्मणजे समाजाची एकी फार चांगली वाढत जाते. याप्रमाणें ज्या समाजांत लग्नपद्धति प्रचारांत आली त्याचें बल वाढून त्यांनीं इतरांस जिंकून टाकलें. ही एकी निरनिराळ्या लग्नपद्धतींमुळें कमजास्त प्रमाणानें साधते ह्या गोष्टीचा येथें उल्लेख केला पाहिजे.

लग्नापासून प्रजा पुष्कळ वाढते.

५. लग्नाच्या चालीमुळें स्त्रीपुरुषांस पुष्कळ संतति होते हें शास्त्रप्रसिद्ध आहे. प्रवास केलेले लोकही असेंच सांगतात कीं ज्या लोकांत स्त्रीपुरुषांच्या समागमाविषयीं कांहीं निर्बंध नसतो त्या लोकांची संतति अशक्त असून कधींही भरभराटीस न येतां दिवसेंदिवस क्षय पावत जाते, व ह्याप्रमाणें लग्ननिर्बंध ज्यांच्यांत नाहीं असे इतिहासांत उपलब्ध असलेलेही कित्येक लोक लय पावले आहेत. याचा अनुभव पाहण्यास समाजाचेंच उदाहरण पाहिजे असें नाहीं. लग्ननिर्बंध न पाळणाऱ्या एकेका व्यक्तीवरून देखील असेंच दिसून येतें. विश्वयोषिता बहुतकरून वंध्या असतात व ह्याचें कारण त्यांचा अनेक पुरुषांशीं व्यवहार हेंच समजतात. यावरून ज्या समाजांत स्त्रीपुरुषांचे समागमाविषयीं कांहीं निर्बंध असत त्यांची संतति पुष्कळ व बलिष्ट होत जाऊन त्यांनीं इतरांस पादाक्रांत करून टाकिलें असावें हें अगदीं साहजिक दिसतें. सारांश, लग्नपद्धति असल्यानें समाजाची एकी वाढते व त्याची संख्या आणि सामर्थ्य हींही वाढत जाऊन त्या समाजाचें स्थैर्य परंपरेनें रहात जातें, ह्या गोष्टी इतक्या उघड आहेत कीं, त्यांचें सत्यत्व दाखविण्याकरितां विशेष चर्चा करण्याची गरज नाहीं. स्पेन्सर ह्यानें ह्या विषयावर एक सुप्रसिद्ध पुस्तक लिहिलें आहे आणि त्यांत जगांतील पुढें सरसावलेल्या मुख्य मुख्य मनु-

ष्यजातींत मूळच्या स्त्रीपुरुषांच्या अनियमित व्यवहारापासून तों लग्नपद्धति प्रचारांत येईपर्यंत कशी सुधारणा होत गेली हें स्पष्ट रीतीनें सिद्ध करून दाखविलें आहे.

लग्न ह्मणजे मिळकत व अनियमित व्यवहार ह्मणजे सामाजिक मिळकत हें सर जान लबकचें मत अग्राह्य आहे. रानटी लोकांत हत्यार वगैरे आपल्या वस्तूची खासगी मिळकतीची कल्पना असते.

६. सर जान लबक वगैरे कांहीं शास्त्रकारांचें असें मत आहे कीं "लग्न ह्मणजे मिळकत अशीच समजूत अनादि कालापासून होती. ज्या रानटी लोकांत आपण अनियमित व्यवहार पाहतों त्या लोकांत लग्न नाहीं असें समजूं नये. अनियमित व्यवहार ह्मणजे सामाजिक लग्न असें धरलें पाहिजे. ज्या वेळेस मनुष्यास खासगी मिळकत ठाऊक नव्हती त्या वेळेस लग्नाची संस्था अमलांत नव्हती व जसें रानटी लोकांत जमिनीचा सामाजिक उपभोग घेतात त्याप्रमाणेंच त्या लोकांत एका जातीच्या स्त्रीरूपी क्षेत्राचा उपभोग जातीचे लोक सामयिक घेत असत, व यालाच आपण अनियमित व्यवहार समजतों; व जसे पुढें जमिनीचे विभाग झाले तशीं लग्नें ह्मणजे नियमित व्यवहार अमलांत आले." सामाजिक शास्त्रकारांची नेहमीं अशी चूक होते कीं जीं अनुमानें मनुष्याच्या सुधारलेल्या स्थितीसच लागू आहेत तीं अगदीं रानटी लोकांस लागू करतात. मोठ्या मनुष्याचा जोडा लहान मुलाचे पायांस घट्ट कसा बसेल? राजसंस्था ह्मणजे राजा व प्रजा यांचा करार अशी कांहीं लोक कल्पना करितात, परंतु रानटी लोकांस राजाचे हक्क व जबाबदाऱ्या काय व प्रजेचे हक्क व जबाबदाऱ्या काय हें समजलें असेल व कराराची योग्य कल्पना त्यांस होती हें असंभवनीय आहे. तसेंच सामाजिक मिळकत ह्मणजे काय व अनियमित व्यवहार ह्मणजे सामाजिक मिळकत हें समजणें जर हल्लींही कठिण आहे तर रानटी लोकांस हें समजलें असेल हें म्हणणें सुयुक्तिक दिसत नाहीं. लग्नाची चाल मिळकतीच्या कल्पनेवरून निघाली नाहीं हें निर्विवाद आहे. स्पेन्सरनें वरील अभिप्रायासंबधें येणेंप्रमाणें लिहिलें आहेः—"सर जान लबक याचे मताप्रमाणें एक समाज एका प्रदेशावर आपला सामायिक हक्क चालवीत असेल हें ग्राह्य आहे. कांहीं

पशूंचाही स्वभाव असा आपण पाहतों; ह्मणजे टेम्स नदीवरील एका टप्यांतील हंस दुसऱ्या टप्यांतील राजहंसास आपल्या हद्दींत येऊं देत नाहींत. फार कशाला? एका गल्लींतलें कुत्रें दुसऱ्या कुत्र्यास आपल्या भागांत येऊं देत नाहीं. याचप्रमाणें मनुष्यांचा स्वभाव असेल; व ज्या काळीं लोक शेती करीत नव्हते व सर्व लोक पारधी असत अशा वेळेस कांहीं लोक मिळून एका प्रदेशाचें जंगल राखून ठेवणें जरूरच होतें, परंतु एवढ्यावरून मनुष्यापाशीं खासगी मिळकत नव्हती व सर्वच सामयिक होतें हें अयुक्तिक आहे. कुत्र्याला देखील आपले स्वतःचे निराळे हक्क कळत असतात. त्याचें भक्ष्य कोणी घेऊं लागला अगर त्याच्या बसण्याच्या जागेंत दुसरा कोणी जाऊं लागला तर तो बेशक त्याचें पारिपत्य करतो; इतकेंच नव्हे, आपल्या धन्याची खासगी मिळकत दुसऱ्यास घेऊं देत नाहीं. रानटी लोकांस कुत्र्याइतकी देखील खासगी मिळकतीची कल्पना नसेल हें संभवत नाहीं. रानटी लोकांत आपापलीं हत्यारें, अलंकार व शस्त्रें हीं निरनिराळीं असत व त्यांचें खासगी स्वामित्व ते समजत असतील यांत आश्चर्य कोणतें."

लग्न ह्मणजे मिळकत अशी कल्पना पूर्वी होती हें ह्मणणें आणखीही कांहीं आधारांनीं अग्राह्य दाखवितां येईल. जर रानटी लोकांची स्थिति बहुतेक पशूप्रमाणें होती तर कुत्र्यास जेवढी मिळकतीची व लग्नाची कल्पना आहे त्यापेक्षां अधिक अगदीं आद्यावस्थेंत मनुष्यास नसेल. कुत्रा जसा आपल्या बसण्याच्या जागेवर कायमचा हक्क सांगतो तसा आपल्या मादीवर गरजेपेक्षां अधिक वेळपर्यंत आपला ताबा ठेवण्याचा त्याचा कल दिसत नाहीं. बरें कांहीं रानटी लोकांत पुरुषापेक्षां स्त्रियांचेंच प्राबल्य अधिक असतें. अशा लोकांत लग्न ह्मणजे स्त्रीरूपी मालमत्ता अशी कल्पना कधींच नसेल, व अशा लोकांत बायकाही असें समजत नाहींत कीं पुरुष आमची मिळकत आहे. सारांश लग्नाची चाल मिळकतीच्या कल्पनेवरून निघाली व अनियमित व्यवहार ह्मणजे सामाजिक लग्न हें मत निराधार व अयुक्तिक आहे. पूर्वी ह्मटलेंच आहे कीं राज्यव्यवस्था व गृहव्यवस्था हीं बरोबरच मनुष्याचे संक्रमणस्थितींत उत्पन्न होत गेलीं व दोहोंचेंही

बीज मनुष्याची युद्धाकडे नैसर्गिक प्रवृत्ति हेंच आहे, हें स्पेन्सरच्या समाजशास्त्रज्ञांस अवगत असेलच.

लग्नापासून प्रजा पुष्कळ वाढते.

७. लग्नपद्धतीचें बीज कांहींही असो; इतकें निर्विवाद आहे कीं जे समाज बलिष्ट होऊन इतरांस जिंकूं लागले त्यांच्यांत लवकरच ही समज उत्पन्न झाली कीं बायको ही नवऱ्याची जंगम मिळकतच आहे व तिची पाहिजे ती व्यवस्था करण्यास तो मुखत्यार आहे. ही समज दृढ होण्यास लढाऊ लोकांत परक्या जातींतील स्त्रिया पकडून आणून लग्न करण्याचा सांप्रदाय सुरू झाला तोच विशेष कारण झाला. हें कृत्य पराक्रमाचें दर्शक व स्तुत्य असें ते लोक समजत. अर्थातच जिंकून आणलेल्या वस्तूंवर जिंकणारा मिळकतीप्रमाणें हक्क सांगूं लागला हें साहजिकच आहे. परजातींतील बायको जिंकून आणणें हें मोठें शूरत्वाचें लक्षण समजलें गेल्यामुळें अशा बायकोपेक्षां जातींतीलच बायको कमी किंमतीची समजत. यामुळें जिंकून आणलेल्या बायकोचे नियम त्यांसही लागू असत. दुसऱ्या जातींवर स्वाऱ्या करून त्यांचा पाडाव करण्याची चाल फार वाढल्यामुळें पराजित झालेल्या पुरुषांस देखील गुलाम करून त्यांस आपल्या जिनगीप्रमाणें वागविण्याची वहिवाट सुरू झाली; मग अशक्त बिचाऱ्या स्त्रियांस गुलामाप्रमाणें वागविल्यांत विशेष आश्चर्य काय आहे? तसेंच ह्या लढाई करण्याचे प्रवृत्तीमुळें लोकांत थोडथोडी राजकीय व्यवस्थाही निर्माण होऊं लागली. राज्यव्यवस्था होऊं लागल्यामुळें आपल्या जातींतील लोकांची जिनगी सुरक्षित राहून शत्रूंच्या हातीं न लागावी असा बंदोबस्त कांहीं अंशीं होऊं लागला, व प्रत्येक मनुष्यास अपल्या गुलामांवर आणि स्त्रियांवर पूर्ण अधिकार चालवून त्यांचा निर्धास्तपणानें उपभोग घेतां येऊं लागला. स्त्रियांस मालमत्तेप्रमाणें समजण्याचें आणखीही एक असेंच कारण झालें, तें असें:—वर सांगितल्याप्रमाणें लग्नपद्धति प्रचारांत येऊन वाढत चालल्यामुळें नवराबायको, पितापुत्र इत्यादि नातीं उत्पन्न होऊन कुटुंबें होऊं लागलीं. त्या कुटुंबांतील मनुष्यांचें पोषण करणें व त्यांवर आपला दाब राखणें हें काम प्रत्येक कुटुंबांतील सर्वांत वडील

कर्त्या पुरुषाकडे येत असे, आणि त्याचा अनुभव, शहाणपण व बल हीं बाकीच्या सर्वांपेक्षां अधिक असल्यामुळें त्याजकडे हे अधिकार येणें साहजिकच होतें; परंतु ही प्रवृत्ति चोहींकडे पसरल्यामुळें चांगलेवाईटपणाचा भेदाभेद नाहींसा होऊन प्रत्येक कुटुंबांतील मुख्य मनुष्यास, मग तो शाहणा असो नसो, हा अधिकार वहिवाटीनें प्राप्त होऊं लागला, आणि तो वाढत वाढत इतका वाढला कीं घरांतील इतर निर्जीव वस्तूंप्रमाणेंच कुटुंबांतील मनुष्यांचाही तो पूर्ण मालक बनत असे. त्यांपैकीं एखाद्यास ठार मारण्याची किंवा त्याची दुसरी कांहीं व्यवस्था करण्याचीही त्यास पूर्ण मुखत्यारी असे. तेव्हां अर्थातच आपल्या मुलींवर देखील त्याचा अशाच प्रकारचा हक्क असून तिला पाहिजे त्यास देण्यास तो पूर्ण अधिकारी असे. त्याप्रमाणें त्यानें आपल्या इच्छेनुरूप तिला पति पाहून दिल्यावर अथवा तिला कोणास विकत दिल्यावर ती नवऱ्याचे स्वाधीन झाली ह्मणजे हेच पूर्ण मुखत्यारीचे हक्क त्याजकडे जाऊन तो तिचा मालक बने.

स्त्रियांचें पूर्ण दास्य समजत.

८. जे लोक आणि समाज बलिष्ठ होऊन त्यांनीं मागें सांगितल्याप्रमाणें लढाया करण्याचा धंदा चालविला होता त्या सर्व लोकांत सामान्यतर्वे एकच समज असे कीं लग्न करणें ह्मणजे स्त्रीरूपी मालमत्ता मिळविणें होय; ह्यामुळें इतर मालमत्तेवर जसा त्यांस संपादन करणाराचाच मात्र हक्क असतो तसा स्त्रियांवरही त्यांस संपादन करणाराचा स्वतंत्र हक्क राहूं लागला, परंतु बायकोच्या संबंधानें अमुक कर्तव्यकर्मे नवऱ्यास केलीं पाहिजेत अशा अटी किंवा इतर कोणत्याही प्रकारची बायकोसंबंधानें जबाबदारी पुरुषांवर नसे. तसेंच ह्या स्थितींत त्यांनीं किती काळपर्यंत रहावें हाही निश्चय ठरविणें स्त्रियांचे स्वाधीन नसे. सारांश त्या सर्व प्रकारांनीं परतंत्र असून त्यांस केवळ आपल्या नवऱ्याचे कृपेवर अवलंबून राहणें भाग झालें.

ऐतिहासिक उदाहरणें चिनी, हिंदू, रोमन, ग्रीक, पाश्चात्य देशाचीं आहेत.

९. ज्या काळापासून इतिहास उपलब्ध आहेत तेव्हांपासूनच एकमेकांशीं लढाया करून त्यांचा पाडाव करण्याची राष्ट्रांची प्रवृत्ति चालत आली आहे आणि हल्लीं जरी जगांत चोहोंकडे सुधारणा वाढत चालली आहे आणि कित्येक राष्ट्रें तिच्या शिखराचे जवळ जवळ पोंच-

ळीं आहेत तरी त्यांचा हा स्वभाव अद्यापि नाहींसा झाला आहे असें नाहीं. इतकें मात्र झालें आहे कीं शिक्षणाचा आणि विचारी लोकांचा कल स्त्रियांस स्वतंत्रतेचे हक्क देण्याकडे दिवसेंदिवस विशेष होत आहे; परंतु आपणास माहीत असलेल्या इतिहासांतील बहुतेक लोकांत ज्या लग्नपद्धति होत्या त्यांवरून व लग्नामुळें त्यांस जे हक्क येत असत त्यांवरून असें दिसतें कीं स्त्री ही नवऱ्याची मिळकत आहे अशी कल्पना त्यांच्या मनांत पूर्ण ठसली होती. चिनी लोकांत बायका विकत घेण्याची चाल आहे. वेश्या ठेवणें ही त्यांस अगदीं सामान्य प्रचारांतील गोष्ट वाटते. कांहीं लोक बायकांस खरेदी करून त्यांचा नांगरास जुंपण्याकडेही उपयोग करितात, व याहूनही विशेष आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं सासरा आपल्या विधवा झालेल्या सुनांस विकतो आणि लोक त्याजपासून त्यांस खरेदी करून उघडपणें आपल्या घरीं वेश्येप्रमाणें ठेवितात.* हिंदु लोकांत देखील बायकांस जिंकून आणून किंवा विकत अथवा दान घेऊन त्यांशीं लग्न करण्याची चाल आहे, आणि लग्नानंतर त्यांजवर नवऱ्याचा अगदीं पूर्ण हक्क चालतो. नवऱ्याच्या हयातींत मात्र ती परतंत्र आहे असें नाहीं, कोणत्याही वयांत बायकांना स्वतंत्रता मिळूंच नये अशाविषयीं हिंदुशास्त्राचा नियम आहे. लग्नापर्यंत तिनें आपल्या बापाचे आज्ञेंत रहावें आणि लग्नानंतर पति व त्याचे मागून पुत्र सांगतील त्याप्रमाणें वर्तावें. ग्रीक लोकांत व रोमन लोकांतही आपल्या मुलीची आपल्या इच्छेनुरूप व्यवस्था करण्याचा प्रथम बापाला पूर्ण अधिकार असे, आणि पृथ्वींतील दुसरे कोणतेही लोक आपल्या मुलांवर इतकी मालकी समजत नसत असें इतिहासावरून दिसतें. त्याप्रमाणें रोमन लोक आपल्या मुली पाहिजे त्यास देऊं शकत. लग्न कोणत्या रीतीनें करावें ह्याविषयीं कायद्यानें ठरविलेला कोएम्प्शिओ नांवाचा शुद्ध विक्रीसारखा विधि करावा लागत असे. त्याप्रमाणें लग्नविधि होऊन ती नवऱ्याचे स्वाधीन झाल्यावर त्याचे घरीं तरी तिला संसारयात्रेंतील जोडीदार ह्या नात्यानें न वागवितां नि-

* बाबिलोन शहरचे लोकांत अशी चाल असे कीं स्त्रिया उपवर झाल्या म्हणजे त्यांस उघड लिलांवानें विकावें.

ंतर नवऱ्याचें दास्यत्व करावें लागत असे. तिला आपल्या इच्छेनुरूप वागविण्याचा नवऱ्यास पूर्ण अधिकार असून तिचें जीवितही त्याच्या स्वाधीन असे. रोमन लोकांचे कायदे न्यायाचे आणि चांगले अशी जरी सर्वत्र ख्याति आहे, तरी स्त्रियांचे संबंधानें त्यांत असें ठरविलें होतें कीं बापास आपल्या मुलीसंबंधानें जितके हक्क असतात (ते कोणते हें वर सांगितलें आहे) तेच हक्क नवऱ्यासही आपल्या बायकोसंबंधानें आहेत. तसेंच ती कोणत्याही साधनानें जी द्रव्यप्राप्ति करील अथवा तिला जें जें काहीं वारस ह्या नात्यानें प्राप्त होईल तें सर्व तिच्या नवऱ्याचें आहे असें त्यांत ठरविलें होतें; आणि स्त्रियांस मालमत्तेप्रमाणें मानीत ह्यास दुसरा असा मोठा ठळक आधार आहे कीं नवऱ्याचें आणि तिचें लग्न कायदेशीर रीतीनें झालें नसल्यास त्यानें एक वर्षपर्यंत तिला बायकोप्रमाणें आपल्याजवळ ठेविली ह्मणजे निर्जीव वस्तूंप्रमाणें तिजवरही वहिवाटीचा हक्क सांगतां येऊन तो कायदेशीर नवरा आहे असें मानित असत. ह्याप्रमाणें रोम येथील जुना कायदा होता, व त्यास सिव्हिल ला असें ह्मणतात. हल्लीं देखील युरोपांत लग्नाविषयीं जो सुधारलेला कायदा आहे तो सिव्हिल ला, दुसरा ख्रिस्ती धर्मानें ठरविलेला कॅनॉन ला (लग्नाचा कायदा) आणि ट्युटानिक ह्मणजे जर्मनींतील लोकांची लग्नपद्धति ह्या तिहींचें मिश्रण आहे. ह्यामुळें युरोपाच्या सुधारलेल्या राष्ट्रांतील मुली जरी हल्लीं स्वतःच आपला नवरा आपण पसंत करितात तरी बाकीच्या चालींच्या संबंधानें विचार केला असतां त्यांच्यांतही मागच्या जुलुमी चालीचें थोडें दिग्दर्शन होतें. बायको ही नवऱ्याच्या ताब्यांतील एक वस्तू आहे ही समज अद्याप युरोपांतही आहे असें स्पष्ट दिसतें. तेथील लोकांत अशी चाल आहे कीं भावी वधूवरांचें परस्पर मन मिळून त्यांचा लग्नसंकेत जरी ठरला तरी लग्न करण्यास मुलीच्या बापाची संमति मिळवावी लागते, व बापानें कन्यादान केल्यावांचून तें लग्न कायदेशीर होत नाहीं. दुसरें असें आहे कीं बहुतेक देशांतील विवाहित स्त्रियांस वेगळी मालमत्ता संपादन करण्याची मोकळीक नसे. ती जें जें काहीं मिळवील तें सर्व तिच्या नवऱ्याचें आहे असें मानीत, व पुढें जरी सुधारलेलीं मतें प्रचारांत येऊं लागून कांहीं नियमित प्रकारची जिंदगी (वस्त्रेंभूषणें

वगैरे ) मात्र स्त्रियांस स्वतंत्र रीतीनें उपभोगितां यावीं अशी मोकळीक मिळाली, तरी ह्याशिवाय इतर कोणत्याही प्रकारची मोकळीक त्यांस मिळाली नाहीं. विवाहित स्त्रियांस कोणताही करार स्वतंत्रपणानें करण्याचा किंवा कोणतीही वस्तू भाड्यानें देण्याघेण्याचा अधिकार नसे. लग्नाविषयीं अशी एक सुंदर कॅनॉन लाची कल्पना आहे कीं विवाहित स्त्रीपुरुष हीं उभयतां एकजीव आहेत. ही कल्पना मागच्या लढायांच्या वेळची नसून त्यापेक्षां अधिक सुधारलेल्या काळांत उत्पन्न झाली आहे. कायदेपण्डित तरी ह्या मताचा उपयोग केवळ स्त्रीजातीस फसविण्याकडे करितात, असें म्हटलें पाहिजे. ह्याविषयीं मिल्ल असें म्हणतो कीं नवरा आणि बायको एकजीव आहेत ह्यामुळें बायकोची मिळकत असेल तेवढी सारी नवऱ्याची आहे असें मानितात. येथपर्यंत हें म्हणणें रास्त आहे, परंतु ह्याच्या उलट मत म्हणजे नवऱ्याची मिळकत असेल तितकी सारी बायकोचीही मानावी हें विचारदृष्ट्या न्याय्य असून तें मात्र अमलांत आणीत नाहींत. यावरून असें दिसतें कीं कायदा नेहमींप्रमाणें जुन्या मतास अनुसरून असून तें सोडण्याविषयीं तो इतका प्रतिकूल आहे कीं स्त्री म्हणजे नवऱ्याच्या हक्काची व त्याचे ताब्यांतील एक वस्तू आहे, ह्याच समजुतीवर त्यांतील पुष्कळ नियम ठरविले आहेत असें दिसतें.

सुस्त्रीचें लक्षण जसें समजतों तसें सत्पतीचें मानीत नाहीं.

१०. हल्लीं स्त्रियांच्या स्थितीविषयीं आपलीं जीं सामाजिक मतें आहेत त्यांचाही विचार केला असतां उघड दिसेल कीं मागें त्यांस जी गुलामांप्रमाणें वागविण्याची रीति होती तिच्यापेक्षां अद्यापिही विशेषशी सुधारणा झाली नाहीं; कारण बहुतेक लोक सुस्त्रियेचीं लक्षणें अशीं मानितात कीं तिनें आपल्या पतीशीं नम्रपणानें वागावें, त्याच्या अर्ध्या वचनांत असावें, व नवऱ्याव्यतिरिक्त कोणत्याही अन्य गोष्टींत तिला सौख्य वाटूं नये, त्याच्या सेवेंत तिनें सदा तत्पर असावें, त्याच्या आज्ञेवांचून बाहेर जाऊं नये, वेळप्रसंगीं त्याच्या जिवास जीव देण्याइतकी प्रीति तिचे ठायीं असावी, आणि त्याला सुख देण्याचा हरएक प्रयत्न तिनें आपल्या सुखाकडे न पाहतां करावा. इतक्या गुणांनीं युक्त असेल तर तिला महापतिव्रता म्हणतात, परंतु

बायकांत हे गुण असल्यावांचून जसें त्यांस कोणी चांगलें ह्मणत नाहीं तसेंच चांगला पति म्हणवून घेण्यास पुरुषासही याच अटी जर ठेविल्या असत्या तर पुरुषांवर व स्त्रियांवर लोकांची समदृष्टि आहे असें मानिलें असतें, परंतु व्यवहार ह्याच्या अगदीं उलट असून जर कोणी पुरुष याप्रमाणें वागूं लागला तर त्यास स्त्रैण समजतील, व अशा मनुष्यास समाजांतील स्त्रिया देखील नांवें ठेवतील.

स्त्रियांना दास्य स्मृतिकार पुरुष असल्यामुळें किंवा त्या निसर्गानें अबला आहेत ह्मणून ठरविलें, ही कल्पना निराधार आहे.

११. स्त्रियांस अशी स्थिति कां प्राप्त झाली ह्याविषयीं कित्येक निरनिराळ्या समजुती लोकांत आहेत. कित्येकांस असें वाटत असतें कीं राजकीय सूत्रें चाळविण्याचे अधिकार नेहमीं पुरुषांकडे असल्यामुळें त्यांनीं पक्षपातानें पुरुषांस स्वतंत्रता असावी आणि बायकांनीं त्यांचें दास्य करावें असे कायदे बुद्धिपुरःसर ठरविले असावे. तशीच दुसऱ्या कित्येकांची अशी समजूत आहे कीं ईश्वरानेंच स्त्रियांस दुर्बळ निर्माण केल्यामुळें त्यांच्या अशक्ततेस योग्य अशी ही स्थिति त्यांस त्याच्याच संकेतानें प्राप्त झाली आहे, परंतु ह्या दोहोंपैकीं एकही मत खरें नाहीं. संक्रमणशास्त्रदृष्ट्या आपण पाहिलेंच कीं मनुष्यजातींत जीं स्थित्यंतरें होत गेलीं तीं कोणी पूर्वीं विचार करून बुद्धिपुरःसर घडवून आणलीं नसून सृष्टिनियमाप्रमाणें नेहमीं जी उत्क्रमणस्थिति सुरू आहे त्यामुळें तीं आपोआप घडून आलेलीं आहेत, व हल्लींची स्थिति प्राप्त होण्याचें कारण मनुष्यजातींतील मुख्य मुख्य लोकांत एकमेकांशीं लढाया करण्याची प्रवृत्ति पूर्वींपासून चालत आली हेंच होय. लढायांची प्रवृत्ति अतिशय वाढल्यामुळें पराजित लोकांस गुलाम करण्याची चाल पडली व स्त्रियांस वागविण्याची रीति त्याच मासल्याची असून तिचें मूळ कारणही हेंच इत्यादि विवेचन मागें आलेंच आहे. वरील मतांचे निरसनार्थ इतिहासांतही कांहीं उदाहरणें सांपडतील. प्राचीन ग्रीक व रोमन लोकांची अशी समजूत असे कीं कांहीं लोकांनीं नेहमीं दास्यत्वांत राहावें असा ईश्वरी संकेत असून त्यानेंच मानव जातीचे एक श्रेष्ठ व एक कनिष्ठ असे दोन वर्ग निर्माण केले आहेत, आणि त्यांतील पहिला वर्ग धनीपणास आणि दुसरा गुलामगिरीस योग्य आहे.

सारांश गुलाम धरून आणण्याची चाल त्यांस इतकी साहजिक आणि सृष्टिनियमास अनुसरून असणारी वाटे कीं हें अमानुषपणाचें दुष्ट कृत्य आहे हें त्यांच्या स्वप्नींही येत नसे, परंतु आतां आपलीं मतें बदलून ह्याच कल्पना आपणास फार विपरीत वाटूं लागल्या आहेत, व अद्यापपर्यंत जरी लढाई करण्याची इच्छा मनुष्यमात्रांतील नाहींशी झाली आहे असें नाहीं तरी दिवसेंदिवस उद्योगप्रधान लोकसंस्था झाल्यामुळें व त्यांची परोपकारबुद्धि वाढत चालली असल्यामुळें पूर्वींच्या लोकांची जी समजूत असे कीं अशक्त मनुष्यें बलवान लोकांचे गुलाम होण्याकरितां ईश्वरानें उत्पन्न केलीं आहेत, ती नाहींशी होऊन पृथ्वीवरील असंख्य गुलमांची मुक्तता झाली आहे, व थोड्याच काळांत गुलामगिरी पृथ्वीवरून पूर्णपणें नाहींशी होईल. त्याचप्रमाणें स्त्रियांविषयींचींही लोकांचीं मतें बदलत जाऊन त्यांच्या उन्नतीविषयीं बरेच दिवस प्रयत्न चालले आहेत, व दुर्बल स्त्रीजातीवर हल्लींच्या कायद्यानें व चालीनें प्राप्त झालेले पुरुषांचे हक्क जरी थोडेसे जुलुमाचे आहेत, तरी सुधारणेच्या वरील दोन तत्वांनीं त्यांस लवकरच चांगली स्थिति प्राप्त होईल असें अनुमान दिसत आहे.

स्त्रियांनीं व्यभिचार करूं नये; पुरुषांनीं मात्र करावा.

१२. स्त्रियांस आपल्या मालमत्तेप्रमाणें मानण्याची समज असल्यामुळें लोकांत काय काय चाली उत्पन्न होत असतील ह्याचा विचार केला असतां वाचकांस कंटाळवाणें वाटणार नाहीं. ह्या समजुतीपासून पहिलें अनुमान असें निघतें कीं स्त्रीनें मात्र व्यभिचार न करण्याविषयीं इमान राखावें, परंतु नवरा स्वतःच मुखत्यार असल्यामुळें त्यास मात्र ही शर्त लागू नाहीं, अशी चाल पडली असावी. आपणास माहीत असलेल्या बहुतेक लोकांस अगदीं अर्वाचीन काळापर्यंत देखील एकीहून अधिक बायका करण्याची मोकळीक असे, व कित्येक लोकांत तर अद्यापीही ही चाल आहे. शिवाय पुरुषांनीं उघडपणें रंडीबाजी केली तरी त्यांस कोणी लांछन मानीत नाहींत. तथापि अलीकडे कांहीं कांहीं सुधारलेल्या राष्ट्रांत एकच बायको करण्याविषयीं कायदा अमलांत आला आहे, व तेथें दुसऱ्या सर्व बाबतींत जरी पुरुषाइतकेच स्वतंत्रतेचे हक्क स्त्रियांना मिळाले नाहींत तरी नवऱ्यास दुसरी बायको करण्याची

किंवा रंडीबाजी करण्याची सक्त मनाई आहे, व एखाद्यानें केलीच तर त्याज-पासून कांहीं तोडून मागण्याचा त्याच्या बायकोसही हक्क आहे.

दुसरें अनुमान असें निघतें कीं इतर मालमत्तेप्रमाणेंच स्त्रीरूपी मालमत्ता पाहिजे त्यास विकण्याचा, गहाण ठेवण्याचा अथवा भाड्यानें देण्याचा पूर्ण अधिकार नवऱ्यास येत असावा. पुढें लिहिल्याप्रमाणें उत्तरोत्तर चांगल्या समजुती मनुष्यांत येत जाऊन जरी त्या चाली लोकांस निंद्य वाटूं लागल्या व ह्यामुळें त्या कालांतरानें नाहींशा होऊन हल्लीं जरी क्वचित ठिकाणीं मात्र आढळतात, तरी त्या (वर सांगितलेल्या बायकांस विकण्याच्या व गहाण ठेवण्याच्या) रीती बहुतेक सर्वत्र चालू होत्या असें प्रत्येक राष्ट्राच्या इतिहासावरून दिसून येतें. इंग्लंडांत अगदीं एकोणिसाव्या शतकापर्यंत बायकांस विकण्याची व त्यांची अदलाबदल करण्याची चाल होती. कांहीं अरेबियन आणि पर्शियन लोक खुशाल आपल्या बायकामुलींस गहाण ठेवितात व त्याबद्दल त्यांस कांहीं वाईट वाटत नाहीं; व कित्येक रानटी लोकांत तर अशी देखील चाल आहे कीं त्यांच्या घरीं कोणी पाहुणा आला असतां त्यास मेजवानी देणें वगैरे जसें इतर आदरातिथ्य करावें लागतें तसेंच त्याचे पाहुणचार पूर्ण करण्यास आपल्या बायका मुलीही त्याजकडे पाठवाव्या लागतात.

नवऱ्याचे प्रेताबरोबर बायकोस पुरून किंवा जाळून टाकीत.

१४. तिसरी एक चाल अशीच कांहीं ठिकाणीं आढळते कीं नवरा मेला असतां त्याचेबरोबर त्याचे बायकोला मारून टाकावयाची. ही चाल देखील उत्पन्न होण्यास बायको ही नवऱ्याची मालमत्ता आहे हीच समजूत कारण झाली असावी; कारण जुन्या लोकांत अशी समज असे कीं इहलोकींप्रमाणें परलोकींही सर्व वस्तूंची गरज मनुष्यास लागते, व ह्या कारणामुळें कोणी मनुष्य मेला असतां त्याची मालमत्ता त्यास परलोकीं मिळावी ह्मणून ती त्याच्याचबरोबर पुरून किंवा जाळून टाकीत. तेव्हां अर्थातच बायको ही त्याची मौल्यवान व प्रीतींतली वस्तू त्यास परलोकीं प्राप्त व्हावी व लोकांस तिचा उपभोग घेतां घेऊं नये ह्मणून त्याचेच चितेवर तिचेंही दहन करीत असत. आपल्या हिंदू लोकांत सती जाण्याची चाल होती ही तरी

ह्या वरील चालींचीच धर्मरूप झालेली प्रतिमा होय; व अशा चाली बहुतक-रून जे बलाढ्य व लढाऊ लोक असत, त्यांच्यांत असत. वेराकूज येथील इंडियन लोकांत अशी चाल आहे कीं कोणी गृहस्थ मरूं लागला ह्मणजे त्याचे आधीं त्याजवळ असलेल्या सर्व गुलामांस ठार मारावयाचें; अशाकरितां कीं त्यानीं परलोकीं पुढें जाऊन मागून येणाऱ्या आपल्या धन्याकरितां घर वगैरे तयार करून ठेवावें!! "पेरू देशांत जेव्हां तेथील थिंका (राजा) मरे तेव्हां त्याचे सर्व चाकर आणि जनानखान्यांतील सर्व स्त्रिया त्याचे थडग्यावर मारून टाकण्याची चाल असे, व कधीं कधीं ह्या बळींची संख्या एकेक हजारा-पर्यंत असे." इतकेंच नव्हे, ते लोक आपण होऊन ह्याप्रमाणें बळी जाण्यास तयार असतात. ह्याविषयीं एक ग्रंथकार (स्पेन्सर) असें ह्मणतो कीं "मृतरा-जाच्या स्त्रिया खुषीनेंच बळी पडण्यास तयार असतात, व कधीं कधीं त्यांची इतकी गर्दी होई कीं शेवटीं तेथील दरबारी लोकांस मध्यस्ती करावी लागून 'सध्या पुरेशा बायका गेल्या असल्यामुळें तूर्त जास्तींची गरज नाहीं' असें सांगणें भाग पडे." सारांश पूर्वी बायका ह्या पुरुषांची मालमत्ता आहेत असें मानीत तर असतच परंतु त्याप्रमाणें प्रत्यक्ष आचरणही ठेवीत; व उत्तरोत्तर चांगलीं तत्वें मनुष्यास कळूं लागल्यापासून लोकांचा लढाई करण्याचा कल जसा कमी होत चालला आहे तशीच स्त्रियांविषयीं असलेली पूर्वींची निष्ठूरप-णाची समजूत आतां पुष्कळ सौम्य होऊन पूर्वींप्रमाणें तिचें प्रत्यक्ष आचरण फारसें घडत नाहीं. तरी ह्या समजुती अद्यापि पूर्ण नाहींशा झाल्या आहेत असें नाहीं.

जातिशुद्धत्वाविषयीं कांहीं लढाऊ लोकांचा कटाक्ष असे; कांहींत प्रजा पुष्कळ व सशक्त असावी व्हावी अशी इच्छा असे; व पुष्कळ लोक केवळ कां-मांध असत, यामुळें कां-

१५. या युद्धप्रधानकाळांत बायको ह्मणजे मालमत्ता असें मानीत व त्या समजुतीप्रमाणें लग्नाच्या चाली कसकशा होत्या हें सांगितलेंच आहे. या काळांत दुसऱ्या कांहीं समजुती असत त्यांमुळेंही विवाहपद्धतींत फरक ठि-काठिकाणीं झालेला आढळतो. प्रथम कांहीं लोकांत जाति शुद्ध ठेवणें हेंच एक अत्यंत श्रेयस्कर समजत असत. उघड आहे कीं जे बलिष्ठ लोक दुसऱ्यांस

हीं लोकांत लग्नाविषयीं व वयाविषयीं निर्बंध असत, पण बहुतेकांत कांहीं नसत.

पादाक्रांत करून टाकितात; त्यांस आपल्या जातिश्रेष्टत्वाबद्दल मोठा गर्व असतो व ह्मणूनच ते दुसऱ्या जातीच्या बायका करीत नाहींत व आपल्या मुली दुसऱ्या जातींत देत नाहींत. रोमन लोकांत प्रथम प्लीबियन ह्मणजे शूद्र जातीच्या मनुष्यानें पाट्रिशियन स्त्रीशीं लग्न करूं नये असा सक्त निर्बंध असे. पुष्कळ वर्षांनीं ही अट मोठ्या प्रयत्नानें नाहींशी झाली. हीच गोष्ट आपल्या हिंदूसमाजास लागू आहे. आर्यलोकांनीं हिंदुस्थानच्या मूळच्या लोकांस जिंकून शूद्र केलें व असा निर्बंध केला कीं द्विजांनीं शूद्र स्त्री करूं नये व शूद्रानें द्विजस्त्री करूं नये. आर्यांतही ब्राह्मणांनीं क्षत्रिय स्त्री करावी, क्षत्रियांनीं मात्र ब्राह्मण स्त्री करूं नये असे नियम असत; व वाढतां वाढतां जातिसंकराचें मोठें भय होऊन गेलें व हें महत्पाप आहे असें मानितात. अशा चालीरीतींपासून एक फायदा हा आहे कीं जातीचें शुद्धत्व फार चांगलें राहतें, परंतु एकअंशीं तोटा असा आहे कीं दोनचार जातींच्या मिश्रणानें एक दुसरी उत्तम जात तयार होते असें कांहीं ठिकाणीं दृष्टीस पडतें, तसें होत नाहीं. असो; ही जातिशुद्धत्वाविषयीं इच्छा सर्व बलिष्ट लोकांची नसते, किंबहुना पुष्कळ लोकांच्या इतिहासांत असाच क्रम दिसतो कीं दुसऱ्या जातीचा पाडाव करून पुरुषांस मारून टाकून स्त्रियांस बायका व दासी करून टाकीत. रोमन राज्याचा पाडाव करणारे गाथ, व्हण्डाल, लाम्बर्ड वगैरे बारबेरियन लोक यांनीं असें जातिमिश्रण केलें. याहूनही क्रूर व कामासक्त लोक ह्मणजे अरब, तुर्क, मोंगल हे समजले पाहिजेत व त्यांनीं इजिप्त, सिरिया, तुर्कस्थान, इराण व हिंदुस्थान या देशांत अनन्वित अनर्थ करून जातीच्या जाती नाहींशा करून नवीन बनविल्या. हिंदुस्थानांतील तुर्क व मोंगल बादशहा रजपुतांच्या स्त्रिया वरीत हें प्रसिद्धच आहे. दुसरी एक कांहीं युद्धप्रिय लोकांची अशी समजूत आहे कीं लग्न ह्मणजे एक केवळ पुष्कळ व बलवान संततीचें साधन आहे. स्पार्टन लोकांत जे लग्नाचे नियम असत त्यांचा मुख्य उद्देश हाच होता. जे लोक हमेशा लढाई करितात त्यांस पुष्कळ व बळवान संततीची नेहमीं अपेक्षा असतेच. स्पार्टन लोकांत पुरुषाचें लग्न ३० वर्षांपर्यंत होत नसे. तसेंच ६० वर्षेंपर्यंत त्यांच्यांत

स्त्रीपुरुषास एके ठिकाणीं नेहमीं राहूं देत नसत. आपल्या लोकांत सुद्धां लग्न ह्मणजे केवळ संततीकरितां करावयाचें असा समज होता. पिता मुलगी वराला देतांना असें ह्मणतोः "इमां कन्यां प्रजोत्पादनाय तुभ्यमहं संप्रददे;" व याच कारणावरून आपल्यांत पुत्र असण्याची फार अवश्यकता व पुष्कळ पुत्र असल्याचें पुण्य मानीत असत. याप्रमाणें कांहीं बलाढ्य लोकांच्या चाली जात शुद्ध ठेवण्याच्या ईर्षेनें बदलल्या; कांहीं लोकांच्या चालींचा रोंख केवळ पुष्कळ व सदृढ प्रजा उत्पन्न करण्याकडे झाला; परंतु बहुतेक लोकांचा कल केवळ स्पृहणीय बायका मिळविण्याकडे असे, व अशा लोकांत लग्नाचे विशेष कडक नियम असत.

रानटी लोकांत प्रीति, पातिव्रत्य इत्यादि मनोविकार नसत; ते शांततेमुमुळें उत्पन झाले.

१६. स्त्रीपुरुषांची परस्पराविषयीं ईर्ष्या, प्रीति व अव्यभिचारी भक्ति इत्यादि मनोविकार जसजशी मनुष्याची स्थिति सुधारत गेली त्याप्रमाणें नवीन उत्पन्न झाले; पूर्वीच्या रानटी स्थितींत मनुष्याचे स्वभावांत हे मनोविकार नव्हते असें ह्मणणें प्रथमदर्शनीं असंभवनीय वाटेल. स्थूलदृष्ट्या हे विकार मनुष्यास उपजतच असतात असें वाटतें; परंतु पुरातन रानटी लोकांत हे विकार बिलकुल नव्हते, आणि जसजसे लोक सुधारत गेले तसतसे हे विकार मागाहून उत्पन्न झाले, हें निर्विवाद आहे. स्पेन्सर ह्मणतो कीं जितके नीच ह्मणजे बाल्यस्थितींत लोक आहेत तितक्यांची खूण हीच कीं ईर्ष्या, प्रेम इत्यादि मनोविकारांचा अभाव त्या लोकांत असतो. मग त्या लोकांत एक बायको करण्याची चाल असो किंवा अनेक बायका करण्याची असो. साहजिकच आहे कीं लग्न ह्मणजे एका प्रकारची स्त्रीरूप मिळकत असून ती बापानें विकावी, नवऱ्यानें खरेदी करावी, व नंतर गुलामाप्रमाणें वागवावी, अशीच जर लोकांची समजूत होती तर त्या लोकांत स्त्रियांविषयीं सदयता व सन्मान ज्या विकारांत ओतप्रोत भरले आहेत ते येणार कोठून? आपली वस्तु दुसऱ्यानें वापरली तर मनुष्यास राग येईल हें खरें, परंतु हा राग ईर्ष्या ह्मणून जो स्त्रियांविषयीं चमत्कारिक मनोविकार आहे त्या योग्यतेचा खचीत नाहीं. "मीम्रो लोकांत पुरुषांचे ठायीं बायकांविषयीं प्रेम, राग, किंवा ईर्ष्या बिलकुल वसत नाहीं इतकेंच नाहीं, त्या लोकांचे भाषेंत वरील मनोविकारांस शब्दही नाहींत.

हीच गोष्ट पुष्कळ लोकांस लागू आहे व त्या सर्वत्रांचें वर्णन करणें व्यर्थ व त्रासदायक वाटेल. आपल्या हिंदु लोकांत देखील कांहीं नवरे ह्याच मालिकेंत ओढण्यासारखे आहेत; कारण बायका ह्मणजे जशा कांहीं हक्कानेंच मिळावयाच्या व एक सोडून दुसरी करण्यास प्रत्यवाय नाहीं असें त्यांस वाटत असतें. असो. जसजसे समाज वाढत जाऊन सुस्थित झाले, दंगे, लढाया कमी झाल्या, स्त्रीपुरुषें पुष्कळ काळपर्यंत कांहीं विघाडविघाड न येतां एकमेकांचे आश्रयानें राहूं लागलीं; जबरदस्तीनें दुसऱ्याच्या बायका घेऊन जाण्याचे प्रकार बंद होऊन परस्परांची ताटातूट होणें बंद पडलें; अशा स्थितींत स्त्रीपुरुषांचे अंगीं परस्पर प्रेमभाव उत्पन्न होऊन पातिव्रत्यादि विकार मनुष्याचे अंतःकरणास साहजिक व भूषणास्पद होऊन गेले. ईर्ष्या ही तर प्रथमच उत्पन्न झाली असावी; कारण तिचा आणि एकंदर आपली वस्तु दुसऱ्यानें वापरूं नये ह्या असहिष्णुतेचा संबंध जवळ जवळ आहे. सारांश, जोंपर्यंत मनुष्यें केवळ रानटी स्थितींत असून दंगेधोपे नित्य करीत असत तोंपर्यंत असे मनोविकार उत्पन्न होणें दूरापास्त होतें व जेव्हां ह्या अत्यंत निकृष्ट स्थितींतून तीं कांहीं बाहेर पडले तेव्हां अशा विकारांस जागा मिळाली.

ग्रीक व हिंदु लोकांची इलियड व रामायणाचे वेळची निराळी स्थिति. ग्रीक लोकांत पातिव्रत्यादि विकार उत्पन्न झाले नव्हते.

१७. मला वाटतें कीं जोंपर्यंत ग्रीक लोक ट्रायची लढाई लढत होते किंवा होमरनें इलियड लिहिलें नव्हतें तोंपर्यंत ते लोक ह्या पूर्वीच्या स्थितींत होते; कारण होमरच्या इलियडमध्यें प्रीति आणि पातिव्रत्य हे विकार कोठेंही चांगल्या रीतीनें खेळत नाहींत, व नंतरचे कांहीं ग्रंथांतून जसें त्यांचें हुबेहुब चित्र काढून वाचकांस किंवा प्रेक्षकांस ते रस केवळ स्वर्गतुल्य वाटतात तशीं ह्या विकारांचीं वर्णनें इलियडमध्यें कोठेंही दिसत नाहींत. हेलेन ही ह्या काव्याची नायिका आहे; ती आपल्या नवऱ्यास सोडून जाते व हें केवळ ह्याच दृष्टीनें अत्यंत निंद्य कृत्य झालें असें कोठें वर्णन नाहीं. बरें, ग्रीक लोक लढाईला निघाले ह्याचें कारण तरी इतकेंच कीं त्यांच्या देशाची अत्यं

सौंदर्यवान स्त्री ट्रायचे लोक पळवून घेऊन गेले ह्यांत सर्व देशाचा अपमान झाला. पुढें एका परदेशस्थ राजानें मध्यस्ती करून "मजजवळ दोन बायका आहेत व दोघींची मजला गरज नाहीं. मनिलास, (हेलनचा नवरा) तूं एक बायको घे आणि तंटा आटप," असा निरोप पाठविला. ह्यावरून त्यावेळच्या स्त्रीपुरुषांवर प्रीति व पातिव्रत्याचा किती अंमल होता हें साहजिक कल्पना करण्याजोगें आहे. आकिलीस व आगामेमनान ह्या दोघांस दोन सुंदर स्त्रिया सांपडल्या; ह्मणजे त्यांनीं धरून आणिल्या. आगोममनान याजला सूर्याचा कोप शांत करण्याकरितां आपली स्त्री तिचे बापास (हा सूर्योपासक होता) परत देणें भाग पडलें. त्यानें मी राजा आहें, ह्या जोरावर आकिलीस याजला मिळालेली स्त्री हिसकून घेतली. आगामेमनान परत स्वदेशास आला तेव्हां त्याजला त्याचे बायकोनें व तिचे जारानें ठार केलें. बहुतेक ग्रीक सरदार परत आले त्यांच्या बायकाही अशाच जारिणी निघाल्या. सारांश, स्त्रीप्रेम, एकपत्नीव्रत, पातिव्रत्य इत्यादि विकारांचे जसे आपल्या पुराणांत अनेक उत्कृष्ट देखावे आहेत, व ज्यांचा अखंड परिणाम हिंदु लोकांचे मनावर होत आहे असे चमत्कारिक देखावे इलियडमध्यें एके ठिकाणींही नाहींत. नाहीं ह्मणावयास एक उत्तम स्त्रीपात्र ह्मणजे हेक्टरची बायको अंड्रोमकी ही आहे. नवऱ्याचें प्रेम तिजवर आहे परंतु त्याचे भाषणांत तिजविषयीं तुच्छपणा दिसतो. तसेंच तिचेंही अत्यंत प्रेम त्याजवर दर्शविलें आहे; व जेव्हां तटावरून तिनें पाहिलें कीं आकिलीस आपल्या नवऱ्याचें प्रेत रथाला मागें बांधून फरफरा ओढीत आहे तेव्हां ती मूर्च्छित झाली. कवीनें तेथेंच तिला गतप्राण केली असती तर बरें झालें असतें, परंतु ती सावध झाली व पुढें आपल्या नवऱ्याचे एका भावाची बायको होऊन तिनें पुनः संसारसुख अनुभविलें. सारांश, जे लोक म्हणतात कीं रामायण हें होमरपासून उतरून घेतलें आहे, त्यांची केवढी चुकी आहे! अगोदर ह्या दोन्ही काव्यांतील नायिकांमध्यें जमीनअस्मानाचा फरक! होमरची नायिका हेलन म्हणजे स्त्रियांचे उच्छृंखळ स्वभावाचें एक अत्यंत निंद्य चित्र होय. रामायणांतील नायिका सीता पतिप्रेम, पातिव्रत्य इत्यादि सद्गुणांनीं ओतप्रोत भरलेली आहे. पारीसचा हात

धरून नवऱ्यास फसवून ट्राय येथें निघून जाणारी हेलन कोणीकडे, आणि भिक्षेच्या मिषानें पकडून नेलेली परंतु केवळ धरणीकडे बघणारी व बारा वर्षांत रावणाचें तोंड न पाहणारी पतिनिदिध्यासनिरत सीता कोणीकडे! तात्पर्य हें कीं रामायण व इलियड फार निरनिराळ्या वेळीं व निरनिराळ्या समाजस्थितिसंबंधें लिहिलीं असावीं. ग्रीक लोक इलियडचे वेळीं बरेच रानटी स्थितींत होते, व रामायणाचे वेळीं हिंदू लोक इतके सुधारलेले होते कीं प्रीति व परस्पर अव्यभिचारिता हे गुण त्यांच्यांत उत्पन्न झाले होते, इतकेंच नाहीं तर लोकांचे जीव कीं प्राण होऊन गेले होते.

कवींनीं हे विकार फार वाढविले व वर्णिले.

१८. समाजस्थिति सुधारत जाऊन शांतता होऊन लढाई व दंगे बंद झाले अशा वेळेस हे मनोविकार उत्पन्न झाले तेच कवींनीं फार विकसित स्थितीला आणिले असें म्हटलें पाहिजे. स्त्रीविषयक जितके मोहक मनोविकार आहेत, तितके कवींनीं आपले म्हणवून फार प्रेमानें वर्णिले आहेत; व वास्तविक ह्या विषयाइतका दुसरा कोणताही विषय कवींनीं इतका उत्तम वठविला नसेल व दुसऱ्या कोणत्याही विषयांत कवींचे इतके उपकार समाजावर नाहींत. मोठमोठ्या स्त्रीपुरुषांचीं पवित्र प्रेमचरित्रें, त्यांनीं परस्परांचीं सोसलेलीं दुःखें व शेवटीं त्यांचे समागमामुळें झालेला आनंद यांजविषयीं कवींनीं अनेक हृदयंगम वर्णनें लिहून ठेविलीं आहेत.

हिंदुस्थानांतील कवींनीं सावित्री, तारा, सीता इत्यादि स्त्रियांचीं जीं मोहक चरित्रें लिहून ठेविलीं आहेत त्यांत वर्णन केल्याप्रमाणें पातिव्रत्य दुसरें कोठेंही सांपडणार नाहीं व पुनः तशीं चरित्रेंही कल्पिलीं जाणार नाहींत. सारांश प्रत्येक सुधारलेल्या समाजांत राज्यव्यवस्था कायम होऊन जिकडे तिकडे शांतता झाल्यावर पुरुषांचे अंतःकरणांत स्त्रियांविषयीं, म्हणजे एकंदर स्त्रीजातीविषयीं, प्रेमबुद्धि उत्पन्न होऊन व त्यांचे अबलापणावर दृष्टि देऊन त्यांचीं दुःखें कमी करण्याची इच्छा प्रबळ होऊं लागली.

१९. रोमन लोकांत प्रथम एकसारख्या लढाया चालल्या होत्या अशा वेळीं

रोमन लोकांचें उदाहरण. बारबेरियन लोकांत अबलाभिमान अथवा शिव्हल्री उत्पन्न झाली. शिव्हल्रीचें अद्याप प्राबल्य आहे.

द्वादश फलकांत ( ह्मणजे प्रथम जो कायदा रोमन लोकांनीं लिहून ठेविला तो बारा फलकांवर लिहून प्रसिद्ध केला होता ) स्त्रियांस जें शोचनीय पारतंत्र्य ठेविलें होतें तें पुढें रोमन राष्ट्र वाढत गेल्यावर अशा प्रकारच्या मनोविकारांनीं पुष्कळ कमी झालें. पुढें पुढें रोमन स्त्रियांस इतकी स्वतंत्रता प्राप्त झाली कीं तशी आजपर्यंत स्त्रियांस कधींच कोठेंही मिळाली नाहीं, परंतु पुढें बारबेरियन ( रानटी ) लोकांनीं रोमन राष्ट्र उद्ध्वस्त करून टाकिलें, तेव्हां पुनः स्त्रियांस नष्टचर्य आलें, व त्यांची स्थिति केवळ गुलामांप्रमाणें किंवा बाहुल्याप्रमाणें झाली. पण जर्मन लोकांत पूर्वींपासूनच स्त्रियांविषयीं चांगलीं मतें असत त्यामुळें जेव्हां बारबेरियन लोकांत पुनः शांतता व भरभराट झाली, तेव्हां स्त्रियांस अनुकूल असे मनोविकार पुनः उद्भवूं लागून इतके वाढले कीं आजपर्यंत स्त्रियांना इतका मान कोणींच दिला नाहीं, असा शिव्हल्री ह्मणून एक संप्रदाय त्या लोकांत पसरला. स्त्रियांना अगदीं दुःख न देणें इतकेंच ब्रीद ह्या अबलाभिमानी लोकांचें होतें असें नाहीं. त्यांजला जो कोणी त्रास देत असेल त्याचे जाचांतून त्यांस सोडवणें, त्यांची आज्ञा शिरसावंद्य मानणें व कोणत्याही शूरत्वाच्या कृत्याबद्दल त्यांचे हातून बक्षीस घेणें हें महत्पुण्य आणि जन्मसार्थक समजत असत. शेकडों काव्यें आणि कादंबऱ्यांतून ह्या संस्थेचें वर्णन सांपडेल. कांहीं कांहीं प्रसंगीं तर आपल्यास अगदींच कमी योग्यतेचे व तृणवत् समजून मोठे मोठे शूर लोकही एखाद्या स्त्रियेचे दासानुदास आपणास मानून घेत, मग ती सुंदर असो वा नसो. आयव्हानूहो, रिचर्ड इत्यादि स्त्रियांचे रक्षणकर्ते व बंदे सेवक ज्या समाजांत उत्पन्न झाले ते यूरोपांतील पाश्चात्य समाज धन्य ह्मटले पाहिजेत. ह्याप्रमाणें शिक्षण वाढतां वाढतां व परस्परांचे ईर्ष्येनें अबलाभिमान इतका प्रबळ झाला व त्याचें लोकांस इतकें वेड लागलें कीं शेवटीं तो अगदीं उपहासास्पद होऊन गेला. अलीकडे उद्योगाचा काल सुरू झाला, आणि पूर्वी रानटी स्थितींत स्त्रियांचा फार छळ होत असे त्यावेळेस अशा अभिमानाची फार अवश्यकता होती ; परंतु तो काळ आतां अगदीं नाहींसा झाल्यामुळें ही संस्था

लोकांना आवडेनाशी झाली. इतकेंच नाहीं, तर तिचा फारसा उपयोगही राहिला नाहीं. सरव्हान्टीस ह्मणून एक कादंबरीकार स्पेन देशांत होऊन गेला. त्यानें डान क्विक्झोट ह्मणून ह्यासंबंधाची निंदापर एक प्रसिद्ध कादंबरी लिहिली. तेव्हांपासून शिव्हलरीचें बंड मोडत जाऊन ती हल्लीं योग्य प्रमाणानेंच लोकांत सुरू आहे. तत्रापि पाश्चात्य लोकांचा हा स्वभाव अद्यापि दृष्टीस पडतो आणि स्त्रियांचें अबलत्व मनांत आणून बहुतकरून त्यांस अधिक सुख व अधिक मान देण्याविषयीं ते नेहमीं झटत असतात. पाश्चात्य लोक एखाद्या गाडींत किंवा सभेंत स्त्रियांना—मग त्या ओळखीच्या असोत किंवा नसोत, हिंदू असोत किंवा युरोपियन असोत—चांगली सुखकर बसण्याची जागा किती आनंदानें आणि हौसेनें खालीं करून देतात ? ह्या त्यांच्या मनःस्थितीची कल्पना आपल्या हिंदु लोकांस हल्लीं अगदींच नाहीं.

अबलाभिमानामुळें लग्नाचे चालींत फरक पडून स्वयंवराचा अधिकार स्त्रियांस प्राप्त झाला.

२०. असो. येथवर समाजांत शांतता होऊन प्रीति व अव्यभिचारिता इत्यादि मनोविकार लोकांत कसे वाढत गेले व पाश्चात्य देशांत इतिहासदृष्ट्या त्यांचें कोठवर प्राबल्य होत गेलें हें दाखविलें. साहाजिकच आहे कीं ह्या मनोविकारांचा परिणाम लग्नाचे रीतींवर झाला. विवाहित स्त्रिया ह्मणजे केवळ गुरें व गुलामांप्रमाणें आहेत असें मानण्याचा संप्रदाय कमी झाला, व पुरुष त्यांना प्रेमानें व उदारपणानें वागवूं लागले. दुसरें, स्त्रियांना पकडून किंवा विकत घेऊन लग्नें करण्याची चाल बंद पडली व त्यांना आपला नवरा स्वतःच पसंत करण्याचा अधिकार प्राप्त झाला. हल्लींच्या पाश्चात्य लोकांतील विवाहरीति पाहिल्या तर त्या दोन काळांतील रीतींचें मिश्रण आहेत असें दिसून येईल; ह्मणजे ज्यावेळेस लोक लढाऊ होते तेव्हांच्या लग्नाच्या रीतीप्रमाणें आपल्या मुलीस पाहिजे त्यास देण्याची बापाची सत्ता, आणि लोक सुधारत जाऊन अबलाभिमानी झाल्यानंतरच्या काळांत इच्छित पुरुषास वरण्याचा मुलीचा अधिकार, ह्या दोन तत्वांचें मिश्रण आहे असें मानिलें पाहिजे. हल्लीं मुलींचा हक्क जास्त बलवान होत चालला आहे, तत्रापि बापाची परवानगी मिळणें अवश्य आहे, आणि ती न मिळाली तर लग्न

होऊं शकत नाहीं, असा त्या बहुतेक लोकांत नियम आहे. आपल्या लोकांच्या लग्नपद्धतींत मात्र कोठें या स्वयंवराचा किंवा अबलाभिमानतत्वाचा मागमूस या भित्तीस दिसत नाहीं. पण ह्याचें कारण वेगळें आहे. एका काळीं आपल्या लोकांतही स्त्रियांविषयीं अत्यंत पूज्यबुद्धि होती, व त्यांस स्वयंवर करण्याचा अधिकार होता; परंतु कांहीं कारणांनीं ( याचा उल्लेख पुढें येईल ) स्त्रियांचा हा हक्क हळू हळू कमी झाला, व बालविवाह अमलांत आल्यामुळें स्वयंवराचा हल्लीं आपल्या देशांत कोठें पत्ता राहिला नाहीं. मागें उल्लेख आलाच आहे कीं हिंदुस्थानांत सुधारणा फार प्राचीन काळींच झाली होती, ह्मणजे ज्या वेळेस ग्रीस व ट्राय येथें लोक बायका पकडून अथवा चोरून आणीत अशा वेळेस हिंदुस्थानांत शिव्हलरी अथवा अबलाभिमानाचा काळ होता. सीता, द्रौपदी, दमयंती इत्यादि स्त्रियांचे वेळेस हिंदुस्थानांत बायकांची अत्युत्तम स्थिति होती असें ह्मटलें पाहिजे,* परंतु ते दिवस आतां फार लांब गेले. स्वयंवर कांहीं जातींत अनेक वर्षें सुरू होतें,परंतु अलीकडे शेंकडों वर्षें त्याचें हिंदुस्थानांत नांव निघत नसून जर पुराणांतरीं त्याचीं वर्णनें आपल्या कानावर न येतीं तर आपणास त्याची कल्पनाही झाली नसती.

हिंदुस्थान व रोम व मुसलमान व हल्लींचे पाश्चात्य लोक यांचें उदाहरण.

२१. असो. हिंदुस्थानांत स्वयंवराचा काळ आला होता, तसाच इतर लोकांतही अबलाभिमानाचा परिणाम झाला. रोमन लोकांचीही स्थिति स्त्रीस्वातंत्र्यासंबंधें सुधारली हें वर लिहिलेंच आहे. रोमन बादशाही स्थापन झाल्यापासून जी शांतता, जें ऐश्वर्य व जी सुधारणा रोमन लोकांस प्राप्त झाली त्याचें हें साहाजिकच फळ आहे. किंबहुना रोमन स्त्रियांचें प्रस्थ फारच वाढून त्यांची स्वतंत्रता स्वच्छंदपणाचे सीमेस येऊन पोंचली; कारण जीं बंधनें लग्नसंबंधांत अवश्य व हितकर आहेत तीं नाहींशीं होऊन गेलीं. पुढें बारबेरियन लोकांचीं राज्यें स्थापित होऊन शांतता झाल्यावर शिव्हलरीचें बंड कसें माजलें हें वर निर्दिष्ट केलेंच आहे. इकडे मुसलमान लोकां-

---

* ब्राह्मणांत कधींच स्वयंवर नव्हता असें कित्येकांचें मत आहे परंतु देवयानीचें उदाहरण येथें दिल्यास पुरें आहे. याजविषयीं अधिक उल्लेख दुसऱ्या लेखांत येईल

चा पैगंबर महंमद याचा धर्मविषयांत जू व ख्रिस्ती लोकांच्या चालींकडे रोख असल्यामुळें त्यानें आपल्या रानटी आरब लोकांतही स्त्रियांना हितकर चांगल्या चाली घालून दिल्या. वयांत आलेल्या स्त्रियांस आपला नवरा पसंत करण्याचा अधिकार दिला व एकाच वेळीं चोहोंपेक्षां अधिक बायका करूं नयेत असा निर्बंध केला. सारांश आरब लोकांचा रानटीपणा मनांत आणून होतां होईल तितकें स्त्रियांविषयींचे आपले उदार विचारास अनुसरून त्यांस अनुकूळ असे कायदे महंमदानें घालून दिले.

२२. विवाहपद्धतीच्या संक्रमणसंबंधीं इतिहासांत तिसरी पायरी म्हटली म्हणजे मुलीनें आपण होऊन नवरा पसंत करावा ही होय. या वेळेस परस्पर प्रेम व अव्यभिचारिता हींच विवाहित स्थितीचें सर्वस्व बनून राहिलीं होतीं. स्वहिताला पराङ्मुख होऊन केवळ परस्परांवर अत्यंत प्रीति करणें हेंच लग्नाचें बीज असें समजत असत. जशा पाश्चात्य देशांत अलीकडे तरुण स्त्रिया ऐहिक द्रव्योपभोगाच्या इच्छेनें श्रीमान म्हाताऱ्यांशीं लग्नें करितात, किंवा म्हाताऱ्या विधवा श्रीमान् असल्यास द्रव्याच्या लोभानें तरुण बांड त्यांशीं लग्नें करितात, तसें करणें त्यावेळीं अत्यंत निंद्य मानीत असत. जात किंवा कुलीनपणा ह्याचा फार विचार होत नसे; एखाद्या गरीब शेतकऱ्याच्या सुरेख मुलीनें आपल्या कुरलकेशकलापानें आपल्या यजमानाच्या तरुण मुलास बांधून टाकावें, किंवा एखाद्या काउंटेसनें आपले प्रेमपाश अगदीं क्षुद्र पण सुरेख अशा हायलंडर तरुणाभोंवतीं टाकावे. लौकिक स्थितीनें अगदीं विरुद्ध अशा जोडप्याचें परस्परांविषयीं प्रेम व निःसीम भक्ति यांविषयीं वर्णन करणें पाश्चात्य कवि व कादंबरीकारांस फार आवडत असे. तरी इतकें खचित आहे कीं हल्लींही पाश्चात्य देशांतील स्त्रीपुरुषांचे विवाहनिश्चय पुष्कळअंशीं परस्पर प्रीतीनेंच होतात, व ही गोष्ट केवळ कविकल्पितच नाहीं, परंतु हमेशा प्रत्यक्ष अनुभवासही येते. * खरोखर तिकडील देशांत संसारांत स्त्रीपुरुषांचें पर-

विवाहसंक्रमणास्थितींत तिसरी पायरी स्वयंवर व एकपत्नीविवाह.

---

* प्रिन्स आफ् वेल्सच्या प्रिय कन्येनें ड्यूक आफ् फाइफशीं लग्न केलें, तसें इकडे बहुतकरून झालें नसतें; व केवळ परस्परप्रीतीचा विचार करून मी अनुमोदन देतें, असें त्या वेळीं राणीसाहेबांनीं म्हटल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

स्पराविषयीं अतिशय प्रेम, व परस्परांकरितां सहन केलेलीं मोठमोठीं दुःखें व निग्रह ह्यांचीं उदाहरणें वेळोंवेळीं दृष्टीस पडतात, तीं पाहून चित्त फारच थक्क होऊन पूज्यबुद्धीनें भरून जातें, व अशा गोष्टी विवाहाच्या ज्या विशेष चाली आहेत त्यांमुळेंच घडूं शकतात. आपण हिंदु लोक फारच निराळ्या स्थितींत वागलेले व वाढलेले; आपल्यास त्या प्रीतीची कल्पनाही करितां येणार नाहीं. व आपल्या प्रीतीचें स्वरूप फारच निराळें होऊन राहिलें आहे. परस्परांच्या स्वभावांचा समाधानवृत्तीनें मेळ घालून घेणें; संताप न करितां परस्परांविषयीं असंतुष्ट स्थितीचा निग्रह करणें, हेंच प्रेम शेंकडा नव्याण्णवांच्या ठिकाणीं दृष्टीस पडतें, असें म्हटलें पाहिजे. असो. आपलेकडेही पूर्वीं हा काळ होता, व त्या वेळेस स्त्रीपुरुषांचा परस्पर प्रेमोत्कर्ष स्वयंवराच्या योगानें होत असे.* आपलेकडेही कविवर्यांनीं वैवाहिक सुखाचें खरें रहस्य, प्रेमातिशय व अव्यभिचारी भक्ति, यांचीं अशीं अद्वितीय वर्णनें केलीं आहेत कीं त्यांसारखीं पुनः होणें दूरापास्तच आहे; परंतु ज्या कारणांमीं पाश्चात्य देशांतही लग्नाच्या रीतींत थोडा फेरफार केला, व ज्याविषयीं पुढें विवेचन केलें आहे, त्या कारणांनीं हा काळ निघून जाऊन त्याचे ऐवजीं बालविवाह वगैरे चाली हल्लीं जारीनें सुरू आहेत, व ह्मणूनच कवींचीं वर्णनें केवळ मृतवत्, निस्तेज, निरुत्साह वाटतात; व त्यांच्या स्वानुभवावरून यत्किंचित्ही बोध होत नाहीं. पाश्चात्य देशांतही व मुख्यत्वें अमेरिकेंत प्रीति व निःसीम भक्ति ह्यांचें प्राबल्य कांहीं विशेष कारणांनीं कमी होऊन इतर मनोवृत्तींचें वर्चस्व होऊं लागलें आहे हें ह्मणणें म्हणजे हेवापूर्वक समाधान करून घेणें आहे.

२३. बहुतेक लोकांत आजमित्तीस लग्नाचा व धर्माचा निकट संबंध

---

* ह्या तिसऱ्या स्थितींत एकपत्नीकत्व हें साहजिक अमलांत आलें, हें निराळें सांगावयास नको. हिंदुस्थानांतही हें एकपत्नीव्रत फार श्रेयस्कर व प्रशस्य समजलें जातें, व त्याचें अनुकरणीय व अविस्मरणीय उदाहरण रामचंद्र व सीता यांचें प्रसिद्धच आहे. ह्या जोडप्याचें मोहक चरित्र लोकांसमोर इतकें हमेशा राहिलें आहे कीं बहुतकरून राजेरजवाड्यांखेरीज ह्या व्रताचे अपवाद इतरांत फार थोडे सांपडतील.

लग्नाचा व धर्मसंस्काराचा हल्लीं सर्वत्र संबंध दिसतो.

असलेला आपणास आढळतो. जितकीं सुधारलेलीं राष्ट्रें आपल्या नजरेस येत आहेत त्यांचे चालीप्रमाणें लग्नसमारंभास धर्मोपदेशकांची किंवा उपाध्यायांची मदत लागते व कांहीं धर्मविधीही करावा लागतो. उदाहरणार्थ इंग्लिश लोकांत लग्न कायम होण्यापूर्वी बान्स ह्मणजे एक प्रकारची नोटीस प्रसिद्ध करावी लागते. वधूवरांस देवळांत जाऊन धर्मोपदेशकापुढें शपथ घ्यावी लागते, आणि ह्यांपैकीं एखाद्या गोष्टीची उणीव झाली ह्मणजे बान्स प्रसिद्ध केल्या नाहींत, किंवा देवळांत वधूवर गेले नाहींत किंवा योग्य उपाध्यायानें लग्न ग्रंथि बांधली नाहीं तर तें लग्न अविधि ठरून फुकट जातें व अशा लग्नापासून झालेली संतति कायदेशीर समजली जात नाहीं. इतर ख्रिस्ती देशांतूनही अशाच प्रकारचे लग्ननियम अमलांत आहेत. धर्मविधीवांचून केवळ स्त्रीपुरुषांचे करार लग्नास पुरे होतात ह्मणजे पुरुषानें सांगितलें कीं मी तुझा नवरा आहें आणि बायकोनें कबूल केलें कीं मी तुझी पत्नी आहें ह्मणजे लग्न ठरतें. अशा रीतीचें विवाहबन्धन फक्त स्काटलंड देशांत कायदेशीर समजलें जातें; परंतु हा अपवाद खेरीज करून बाकी सर्व ख्रिस्ती राष्ट्रांचा असा नियम आहे कीं जर योग्य मानिलेले धर्मविधि झाले नसतील तर तें लग्न फुकट व निरुपयोगी आहे. मुसलमान लोकांचीही अशीच गोष्ट आहे; ह्मणजे लग्न मशिदींत लावावें लागतें व लग्नास काजीची गरज असून त्याच्यावांचून दुसऱ्यास लग्नग्रंथि बांधतां येत नाहीं. हिंदु लोकांतही पुष्कळ लग्नविधि उरकावा लागतो, व त्यांच्यांत देवळांत जाण्याची जरी गरज लागत नाहीं तत्रापि उपाध्याय पाहिजे, व निदान दान आणि लाजाहोम हीं व्हावींच लागतात. हिंदु किंवा मुसलमान लोकांत धर्मविधीशिवाय केलेलें लग्न कायदेशीर मानिलें जाईल किंवा नाहीं असा प्रश्न कोणी काढिल्यास त्याचें साधार उत्तर देतां येणार नाहीं, परंतु हा प्रश्न केवळ कल्पनिक आहे; लग्नविधीवांचून लग्न झाल्याचें उदाहरण आमच्यांत नाहीं व कदाचित् असा प्रश्नही आजपर्यंत उद्भवला नसेल. असो. हिंदुलोकांतही लग्नास धर्माची अवश्यकता लागते, तशीच जू, पारशी वगैरे लोकांतही हीच तऱ्हा आढळते. सारांश बहुतेक सुधारलेल्या लोकांत विवाह-

बंधन कांहीं धर्मसंस्कार झाल्याशिवाय कायदेशीर होत नाहीं हें निर्विवाद आहे.

पण हा संबंध पूर्वी नव्हता याजविषयीं रोमन व हिंदुलोकांचें उदाहरण.

२४. आतां ही लग्नाची व धर्माची सांगड बहुतेक ठिकाणीं असलेली हल्लीं आपणास आढळते ह्मणून ही सांगड ह्मणजे नेहमीं अवश्यक आणि सार्वत्रिक असलीच पाहिजे असें नाहीं व ती अनादिकाळापासून आहे असेंही नाहीं; परंतु ही अलीकडे पडली असावी असें आपणांस विवाहेतिहासावरून दिसून येईल. पूर्वीं लग्नसंबंधास विशेष पवित्रता व दृढता येण्यास धर्माची मदत बिलकुल घ्यावी लागत नसे, आणि उघडच आहे कीं ज्या पूर्वीचे काळीं बायकांस बलात्कारानें हिरावून आणीत असत त्या वेळेस अशा स्त्रीवर नवऱ्याचा हक्क ठरविण्यास त्यानें तिला पकडून आणून आपल्या ताब्यांत ठेविलें ह्यापलीकडे जास्ती पुराव्याची व युक्तीची कांहीं गरज नव्हती. बरें, जेव्हां बायकांस पकडून आणणें बंद होऊन त्याचेऐवजीं त्यांस विकत किंवा दान घेण्याची पद्धति सुरू झाली तेव्हांही लग्नसंबंधाचें गौरव संस्काराचे मदतीनें जास्ती करण्याची समाजाला जरूरी वाटली नसेल; कारण पति आणि पत्नी यांचा संबंध स्वामिसेवकभावापलीकडे अजून गेला नव्हता आणि बायकोच्या संबंधानें पाहिलें असतां लग्नास गुलामगिरीपेक्षां अधिक योग्यता आली नव्हती. सारांश पूर्वस्थितींत धर्मसंस्काराची मदत लग्नसंबंधाला नव्हती, व त्याची त्यावेळीं जरूरीही नव्हती. हा सिद्धांत इतिहासाचे उदाहरणांवरून स्पष्ट करितां येईल. रोमन लोकांत प्रथम जो लग्नविधि असे त्यांत धर्माचें कांहीं एक अंग नसे. मात्र एक विक्री करण्याचा फार्स करीत असत, ह्मणजे एक ताजवा आणून त्याच्या एका पारड्यांत नवरा कांहीं नाणें टाकीत असे आणि दुसऱ्यापाशीं नवरीस बसवीत असत. तसाच लग्नाचा दुसरा एक मार्ग असा असे कीं एक वर्षपर्यंत नवऱ्याच्या वहिवाटीस बायको असली ह्मणजे त्या उभयतांचें लग्न कायम झालें असें मानीत. ह्यापेक्षांही अधिक गोष्ट अशी कीं जेव्हां रोमन राज्याचें प्रजासत्ताकत्व बुडालें व तेथें बादशाही सुरू झाली तेव्हां तर रोमन स्त्रिया इतक्या स्वतंत्र झाल्या कीं त्यांनीं वरील कोएम्प्शिओ

( विक्री ) विधिही सोडून दिला व एक सालाच्या वहिवाटीलाही कांहीं युक्तीनें बाध आणीत असत. सारांश लग्न ह्मणजे धड करारही राहिला नाहीं किंवा धर्मसंस्कारही राहिला नाहीं. इतिहासकार ह्मणतो: "एका दर्जातील स्त्रीपुरुष एके ठिकाणीं राहतात एवढीच गोष्ट लग्नाच्या पुराव्याला बस असे."

* हिंदुलोकांमध्येंही पूर्वीं कांहीं लग्नसंस्कार नसावा असें अनुमान होतें. आतां हिंदुलोकांचा इतिहास उपलब्ध झाल्यापासून त्या लोकांत धर्मप्राबल्य अतिशय असे ही गोष्ट खरी आहे, परंतु निदान गांधर्व किंवा आसुर लग्नाला धर्मसंस्काराची जरूरी नव्हती असें ह्मटलें तरी चालेल; कारण नवऱ्यानें बायको विकत घेतली किंवा परस्पर दोघांनीं प्रीतीनें लग्नसंबंध स्वीकारिला ह्मणजे त्याच्यापलीकडे विशेष खटपटीची कांहीं जरूरी दिसत नाहीं. कविशिरोमणि कालिदासानें आपल्या शाकुंतल नाटकांत दुष्यंत राजानें शकुंतलेला गांधर्व विधीनें वरिलें असें वर्णन केलें आहे त्यांत कोठें धर्मसंस्कार झाल्याचें कांहीं लिहिलें नसून परस्परांचे अनुमतानंतर लागलाच संभोग झाला आहे असें नाटकावरून दिसतें. सारांश गांधर्व विधींत यदाकदाचित् कांहीं कालानंतर कांहीं धर्मसंस्कार होत असेल, परंतु संभोगापूर्वीं अशा संस्काराची जरूरी नाहीं तर तो संस्कार ह्मणजे निरुपयोगीच ह्मटला पाहिजे. एकंदरीनें हे विवाहविधि संस्काराशिवाय होत असत असें दिसतें, आणि पुराणांत जितके गांधर्व विवाह सांगितले आहेत तितके असेच कांहीं एक धर्मसंस्कार झाल्याशिवाय झाले असावे. उदाहरणार्थ ययाति राजानें देवयानीला विहिरींतून बाहेर काढिलें त्या वेळेस तिनें त्यास पति ह्मणून गांधर्व विधीनें वरिलें; परंतु पुढें लग्नसंस्कार झाल्याचें कांहीं वर्णन नाहीं.

हा संबंध पाश्चात्य देशांत ज्यू लोकांपासून घतला व पुढें ख्रिस्ती ध-

२५. यावरून हा सिद्धांत खरा दिसतो कीं पूर्वीं लग्न ह्मणजे एक धर्मसंस्कार आहे असें मानीत नसत, परंतु स्त्री ही एका प्रकारची जबरदस्तीनें, खरेदीनें किंवा बक्षिसा ऐवजीं मिळविलेली मिळकत समजली जात असे. पाश्चात्य देशां-

* बौद्ध लोकांतही लग्नविधि नव्हता असें दिसतें.

मांची नीतिमत्ता उत्तम ठेवण्याकरितां धर्माचा अधिकार लग्न विषयांत पूर्ण ठरविला.

त लग्न ह्मणजे संस्कार ही कल्पना प्रथम यहुदी लोकांपासून उत्पन्न झाली असावी, व मोझीस ह्मणून जो त्यांचा स्मृतिकार झाला त्याचे निर्बंधांत ह्या कल्पनेचें बीज दिसून येतें. यहुदी लोकांची लग्नाची चाल इतर सेमिटिक व आर्यन लोकांहून भिन्न असे, आणि हे लोक धर्माचे बाबतींत ह्मणजे एकेश्वर मानण्यांत जसे अनादिकालापासून विलक्षण असत तसेंच लग्न ह्मणजे एक धर्मसंस्कार आहे असें मानण्याचा यांचाच पहिल्यापासून आग्रह असे. जू लोकांच्या ह्या लग्नरीति ख्रिस्ती लोकांनीं स्वीकारल्या. इतिहासकार ह्मणतो: "ह्या पूज्य संस्काराचें मूळ, त्याचें महत्व आणि त्यांतील पतिपत्नींचीं कर्तव्यें हीं प्रथम सिनागाग ह्मणजे यहुदी लोकांच्या धर्मसंस्थेपासून उत्पन्न होऊन बायबलाचे आज्ञेप्रमाणें व ख्रिस्ती धर्मसभांचे निर्णयाप्रमाणें कायम झालीं." दुसरें एक कारण असें झालें कीं, ख्रिस्ती शकाच्या दोन शतकेंपर्यंत त्या वेळच्या इतर धर्मांपेक्षां ख्रिस्ती धर्म अत्यंत नीतिमान् असा त्या धर्माचा बाणा असे. विशेषेंकरून लग्नसंबंध फार पवित्र, असें ख्रिश्चन लोक मानीत असत. किंबहुना त्या वेळेस रोमन लोकांत जी अतिनिंद्य अनीति पसरली होती तिचा उच्छेद करण्याकरितां ख्रिस्ती धर्मरूपी शस्त्रच मनुष्यस्वभावानें हातीं घेतलें, असें ह्मटलें असतां चालेल. यामुळें काय झालें कीं, ख्रिस्ती लोकांस आपलें वर्चस्व राखण्याकरितां साहजिकच लग्नाचे बाबतींत कडक नियम करावे लागले, व त्या नियमांचा पूर्णपणें अंमल बसावा ह्मणून लग्नाचे बाबतींत देखरेख करण्याचा अधिकार ख्रिस्ती धर्माधिकाऱ्यांस द्यावा लागला. लग्नें देवळांतच झालीं पाहिजेत असा एक नियम ठरला. अतिनिकटच्या स्त्रीपुरुषांचे विवाह धर्मांत निंद्य मानिले असल्यामुळें धर्माधिकाऱ्यांनीं ते बंद केले. तसेंच कारणावांचून होणारे व स्वेच्छाचारी घटस्फोट त्यांनीं मना केले. एक पत्नी जिवंत असल्यास दुसरी न करण्याविषयीं बायबलाची आज्ञा सक्त रीतीनें अमलांत आणिली, आणि ह्या नियमाविरुद्ध वागणाऱ्या लोकांस ख्रिस्तीधर्मसंस्थेनें, त्यांचीं लग्नें रद्द करणें, त्यांची संतति अनौरस ठरविणें इत्यादि ऐहिक शिक्षा ठेविल्या होत्या. इतकेंच नाहीं, परंतु ते अशा लोकांस बहिष्कृतही करीत असत.

सारांश ख्रिस्ती धर्मांप्रमाणें लग्न हा एक धर्मसंस्कार बनून गेला, व लग्नसंबंधीं गुन्हे करणें ह्मणजे परमेश्वराचे अपराध करणें असें ठरून गेलें. ह्याप्रमाणें ख्रिस्ती धर्मानें विवाहास मोठ्या पदवीस चढविलें. तत्रापि जोंपर्यंत रोमन लोकांची बादशाही कायम होती तोंपर्यंत रोमन लोकांच्या चालींवर ख्रिस्ती धर्माचा पूर्ण पगडा बसला नाहीं, व ख्रिस्ती धर्माधिकारी त्यांची ह्यासंबंधानें जी निर्भर्त्सना व त्यांस बहिष्कार वगैरे शिक्षा करीत त्यांचेमुळें जरी रोमन लोकांचे मनांत पापभीरुत्वाचा जोर कधीं कधीं होत असे तत्रापि त्यांच्या विवाहचालींवर त्याचा फारसा परिणाम घडला नाहीं. जस्टिनियन बादशहाचे देखील माजिस्ट्रेट लोक धर्माधिकाऱ्यांचें लग्नसंबंधांत आपल्यावर वर्चस्व आहे असें कबूल करीत नसत, आणि ह्या बाबतींत आपल्या पूर्वींच्या चालीप्रमाणेंच ते ठराव देत असत. जस्टिनियन बादशहा स्वतः देखील विवाहसंबंधानें प्रश्न निघाल्यास पूर्वींचे ह्मणजे ख्रिस्ती नव्हेत असे जे रोमन कायदेकार होऊन गेले त्यांचे ग्रंथांचा आधार घेत असे, व पांडेक्ट व कोडमध्यें जो विवाहाचा कायदा जस्टिनियननें उतरून घेतला आहे त्यांत धर्मसंबंधाचें तत्व मुळींच नसून फक्त न्याय, राजनीति आणि स्त्रीपुरुषांची नैसर्गिक स्वतंत्रता या तत्वांवर तो रचिला होता. असो. ह्याप्रमाणें रोमन लोकांचे लग्नाचे चालीवर जरी ख्रिस्ती धर्माचें पूर्ण वर्चस्व झालें नाहीं तथापि जेव्हां जर्मनी व सिथियाचे रानटी लोकांनीं रोमन राज्याचा विध्वंस केला त्या वेळेस मात्र त्या लोकांनीं ख्रिस्ती विवाहशास्त्र पूर्ण कबूल केलें; कारण हे लोक आधींच ख्रिस्ती झालेले असून त्यांच्यांत स्त्रियांना फार उत्तम रीतीनें वागवीत असत. जर्मन लोकांतील स्त्रीपुरुषांच्या परस्पर नेकीविषयीं तर फार प्रसिद्धि असे. तेव्हां अर्थातूच ख्रिस्ती धर्माचे कडक नियम ह्या लोकांस फारसे त्रासदायक न वाटून ते सहजच त्यांनीं कबूल केले; परंतु पुढें पुढें धर्मभोळेपणा फार वाढत जाऊन शेवटीं ह्या लोकांवर पोपांचा इतका पगडा बसला कीं, राजे लोकांचीं आणि सरदारलोकांचीं लग्नें देखील धर्माविरुद्ध ठरवून पोप तीं रद्द करीत असत; व तसेंच मनास येईल त्या राजाची व सरदाराची संतति अशास्त्र ठरवून त्यांस वारसाहक्क पोंचूं नये असेंही ठरविण्याचा अधिकार त्यांनीं बळकाविला. सारांश लग्नाचे बाब-

14831

तींत पोप व इतर धर्माधिकारी यांचा पूर्ण अधिकार आहे असें लोकांनीं कबूल केलें. ही गोष्ट रोमन राष्ट्राचे पश्चिमेकडील भागाची झाली. पूर्वेकडील भागांत जरी कांहीं दिवसपर्यंत रोमन लोकांच्या जुन्या वाईट चाली कायम राहिल्या, व तिकडील बादशहा कान्स्टांटिनोपल येथील पाट्रियार्कस–जसे इंग्लंडचे जान व फ्रान्सचे हेन्री वगैरे राजे पोपास मान देत असत–तसा मान देत नसत, तरी धर्मबंड वाढत गेल्यामुळें तिकडेही ख्रिस्ती धर्माची लग्नपद्धति कांहीं काळानें अमलांत आली.

ह्याप्रमाणें यूरोपांतील राष्ट्रांचे लग्नपद्धतीचा आणि धर्माचा अनिवार्य संबंध जडून गेला. हा संबंध प्रथम यहुदी लोकांपासून घेऊन ख्रिस्ती धर्मानें दृढ केला; कारण रोम व ग्रीस येथील त्या वेळच्या धर्मापेक्षां आमची नीति फार उत्तम आहे असें प्रत्यक्ष सिद्ध करून दाखविण्याची त्या वेळच्या ख्रिस्ती लोकांची फार उत्कट इच्छा असे, व पुढें हाच संबंध केवळ जुलमी बनून गेला, ह्याचें कारण बारबेरियन लोक हे स्वभावतःच लग्नविषयांत नीतिमान व धर्मभोळे होते हेंच होय; परंतु अलीकडे यूरोपांतील लग्नसंबंध ख्रिस्ती धर्माचे कबजांतून सुटत चालले आहेत, कारण ख्रिस्ती धर्माचे विवाहनियम कडक व हल्लींच्या पाश्चात्य सुधारणेच्या कल्पनेला कांहीं अंशीं प्रतिकूल असे आहेत. याविषयीं लवकरच पुढें उल्लेख केला जाईल; तत्रापि इतकी गोष्ट निर्विवाद आहे कीं, कित्येक शतकेंपर्यंत धर्माधिकाऱ्यांची सत्ता विवाहाचे बाबतींत अनियंत्रित होती, व अजूनही पुष्कळ अंशीं आहे, व लग्नाचे संबंधीं सर्व विवाद इक्लिझियास्टिकल कोर्टांत फैसल होत असत. इंग्लंड देशांत मृत पत्नीचे बहिणीशीं विवाह केला असतां तो अशास्त्र अजूनही मानितात.

२६. असो. ह्याप्रमाणें पाश्चात्य देशांतून विवाहाचा आणि धर्माचा निकट संबंध पडून गेला. हिंदुस्थानांतही याप्रमाणेंच ही सांगड फार लवकर जडली. त्याचें बीज असें दिसतें कीं, जे जे लोक अत्यंत धार्मिक आहेत व ज्यांच्या धर्मसंस्था सूक्ष्म व विस्तृत अशा बनून गेल्या आहेत अशा लोकांत धर्माची व विवाहाची

हिंदुस्थानांत धर्माचा व विवाहाचा संबंध फारच लवकर झाला, याचें कारण सर्व उत्तम धर्मांचा कल नीति, समाज, राज्य इत्यादि विषयांत नियम घालून देण्याकडे आहे.

१४८३९



संगति होणें फार साहजिक असतें. उदाहरणार्थ जू (यहुदी) लोकांची धर्मनिष्ठा अत्युत्कट होती हें इतिहासप्रसिद्धच आहे. कारण आज हजारों वर्षें-पर्यंत शेंकडों परधर्मी लोकांनीं त्यांचा पाडाव करण्याचा यत्न केला व त्यामुळें ते परतंत्रही झाले आहेत तरी त्यांचा धर्म अद्याप जशाचा तसा अविछिन्न कायम आहे. तसेच खिस्ती लोकही मोठे परधर्मासहिष्णु आहेत, व त्यांनीं इतर धर्मांशीं आणि स्वजात पाखांड्यांशीं जशा भयंकर लढाया मारिल्या आहेत तशा दुसऱ्या कोणीही मारिल्या नसतील. ख्रिस्ती धर्म स्थापन झाल्यापासून ख्रिस्ती धर्माचा इतिहास ह्मणजे एरायनस्, निओफाईटस्, मनाथेलाईटस्, एकानाक्लास्ट, पलाईटस्, बिक्लीफीटस् इत्यादि अनेक पाखांड्यांशीं व मुसलमानी धर्मांशीं ज्या टकरा मारिल्या त्यांचा इतिहास समजला पाहिजे. मुसलमानांशीं लढून पॅलेस्टाईन प्रांत परत घेण्याकरितां तीन शतकेंपर्यंत तंटा चालला होता व लाखों मनुष्यांचे बळी पडले. शेवटीं प्राटेस्टंट धर्माबरूनही मोठा भयंकर युद्धप्रसंग झाला. सारांश यहुदी व ख्रिस्ती लोकांची धर्मश्रद्धा विलक्षण आहे व ह्मणूनच त्या लोकांत विवाहाचा आणि धर्माचा अनिवार्य निकट संबंध आहे, व जसें अलीकडे पाश्चात्य देशांत धर्मबंधन शिथिल झालें आहे त्याप्रमाणेंच विवाहपद्धतीही हळू हळू खिस्ती धर्मापासून स्वतंत्र होऊं पाहत आहे. दुसरें उदाहरण मुसलमानी धर्माचें घ्या. हाही धर्म मोठा परधर्मासहिष्णु आहे व त्यांतही विवाहनियम धर्माचे बाबतींत गोवून दिले आहेत. त्याप्रमाणेंच हिंदुलोकही अत्यंत धर्मनिष्ठपणाविषयीं प्रसिद्ध आहेत, व जरी धर्माकरितां फारशा लढाया त्यांनीं मारिल्या नाहींत, तथापि स्वधर्म न सोडण्याविषयीं त्यांचा चिकटपणा मशहूर आहे. सारांश हिंदुधर्मांत लग्न ह्मणजे एक धर्मविधि असें ठरून गेलें आहे व तें इतकें बळकट कीं इतर धर्मापेक्षां आपल्या धर्मानें लग्नाचे संबंधांत फार कडकपणा बाळगिला आहे, व त्यापासून आपलें अत्यंत हित तसेंच नुकसानही झालें आहे. असो. धर्म आणि विवाह यांची सांगड होण्याचें दुसरें एक कारण असें आहे कीं, जो धर्म विस्तृत व प्रौढ दशेस येतो त्यांत बहुतकरून नीति व राज्यव्यवस्था यांचाही समावेश होऊं लागतो. पृथ्वीवरील उत्तम धर्मांनीं नीतितत्वें धर्मविषयांत गोवून दिलीं आहेत व नीतिविषयक अपराधांस

धार्मिक शासन कायम ठेविलें आहे; कारण ह्या शासनाचे भीतीनें तरी अज्ञानजनांनीं नीतिपंथ सोडूं नये असा धर्माचा कटाक्ष असतो. मग विवाहशास्त्र-ज्यावर समाजनीति एक अंशीं अवलंबून आहे तें धर्मांत गोंवून ठेविलें आहे ह्यांत आश्चर्य कोणतें ? किंबहुना हिंदुस्थानांतील ब्राह्मणांनीं आणि रोमच्या पोपांनीं राजकीय बाबतींत देखील आपली सत्ता वाढविली; मग विवाहाची काय कथा ! !

लग्न हा संस्कार ठरल्यामुळें स्त्रियांचें नुकसान झालें, लग्न हें स्त्रियांस अवश्यक ठरलें व पुरुषास पुत्रप्राप्ति किंवा नरकनाशाकरितां जरूर आहे.

२७. हिंदुस्थानांत धर्मविषयक विवाहशास्त्र कसें होऊन गेलें हें वर सांगितलें. ही उपपत्ति सुयुक्तिक असो किंवा नसो, आपलें विवाहप्रकरण धर्मशास्त्राचें अंग होऊन जाऊन पाश्चात्य लोकांपेक्षां आपल्यांत धर्माची सत्ता बलवत्तर होउन दुष्परिणामास कारणीभूत झाली हें निर्विवाद सिद्ध करितां येईल. कारण पाश्चात्य लोकांत लग्न धर्मविषयक झालें हें खरें; परंतु लग्न करणें न करणें हें तरी लोकांचे खुषीवर होतें व त्यांत धर्माची जबरदस्ती नव्हती. परंतु हिंदुस्थानांत स्त्रियांचें लग्न होणें हा एक अवश्यक धर्मविधि होऊन गेला आहे, म्हणजे त्यांस लग्नाशिवाय गति नाहीं. जसें हिंदु पुरुषांस मौंजिबन्धन, किंवा ख्रिस्ती लोकांस बाप्तिस्मा, मुसलमान लोकांस सुंता व पारशी लोकांस किश्न, हे विधि अवश्यक व परलोकांत उत्तम गतीचे साधक आहेत तसेंच हिंदु स्त्रियांस लग्न हें अवश्यक आहे. तसेंच लग्न केल्याशिवाय स्त्रियांस वैदिक कर्माचा अधिकार नाहीं. वेद तर तिला पठन करितां येत नाहींच, कारण स्त्रियांना स्वभावतः शूद्रवत् मानिलें आहे. परंतु लग्न झाल्यानंतर स्त्रियांस लागलाच असा स्पृहणीय अधिकार प्राप्त होतो कीं पतिसान्निध बसून तिनें वैदिक कर्मे नित्य करावीं. जर वैदिक कर्माशिवाय सुगति नाहीं व लग्न केल्यावांचून त्या कर्माचा अधिकार प्राप्त होत नाहीं, तर लग्नाची अवश्यकता स्त्रियांस किती बरें आहे ! ही स्त्रियांची गोष्ट झाली. पुरुषांसही लग्न ह्मणजे एका अर्थी उत्तम गति प्राप्त होण्याचें एक साधन झालें आहे. ब्रह्मचारी व्रतानें वैदिक कर्मे करून व्रतस्थ राहिल्यास पुरुषास उत्तम गति आहेच, परंतु व्रतवैकल्य मनुष्याचे हातून घडते त्याला कसें करावें ! व व्रतवै-

कल्य झाल्यास गृहस्थाश्रम घेऊन पुत्रप्राप्ति झाल्याशिवाय गति नाहीं. सारांश विवाहसंबंधानें हिंदू व ख्रिस्ती ह्या धर्मांत फार फरक आहे. ख्रिस्ती धर्मांत आपल्याप्रमाणें प्रत्येक अविवाहित पुरुषानें ब्रह्मचारीच असलें पाहिजे असें नाहीं व अविवाहित स्त्रियांसही गति नाहीं असें नाहीं. अविवाहित स्त्रीपुरुषांचे हातून जरी चुक्या घडल्या तरी ख्रिस्ती धर्माप्रमाणें परमेश्वराची उपासना करून त्यांस सुगति मिळवितां येते, परंतु आपल्या ह्याविषयीं कल्पना अगदीं वेगळ्या आहेत; आणि परलोकांत जर सुखप्राप्ति पाहिजे असेल तर प्रत्येक स्त्रीचें लग्न झालेंच पाहिजे व प्रत्येक पुरुषानें लग्न करावें हें फार चांगलें. ह्यामुळें असें झालें आहे कीं हिंदुस्थानांतील प्रत्येक मुलीचें लग्न झाल्यावांचून राहत नाहीं व बहुतेक मुलांचीं लग्नें होऊन जातात व ह्यामुळें योग्य वधूवरें होत नाहींत. एखादा ह्यातारा पुरुषही धर्माज्ञा पाळण्याकरितां ( पुत्रप्राप्तीकरितां ) लग्न करण्याची खटपट करीत असतो. सारांश आपल्या लोकांत लग्न ह्मणजे अवश्यक आणि पुण्यप्राप्तीचें प्रथम साधन बनून राहिलें आहे.

बालविवाह व विधवासंन्यासाचें कारण हेंच आहे.

२८. धर्माचा व विवाहाचा निकट संबंध पडल्यामुळें मुलींचीं लग्नें लवकर करण्याचा संप्रदाय कसा पडत गेला व विधवासंन्यासाची चाल पडण्यासही बहुतकरून हेंच कारण कसें होत गेलें असावें इत्यादि विवेचन पुढील भागांत सविस्तर करण्याचा प्रसंग येणार आहे.

दुसऱ्याही अटी सप्रवर वगैरेच्या व ज्योतिषसंबंधीं उत्पन्न झाल्या.

२९. ह्या ज्या वरील धर्मसंबंधाच्या अटी लग्नांत पडल्या त्यांशिवाय दुसऱ्याही कित्येक लहानसहान अटी लवकरच उत्पन्न झाल्या. लाजाहोम आणि सप्तपदी हा धर्मविधि अवश्यक झाला. परगोत्रविवाहाचाही निर्बंध ठरून गेला. अशा सगोत्र सप्रवर विवाह लागलेल्या मुलींची अत्यंत दुर्दशा होते. धर्मशास्त्राप्रमाणें तिचें एकदार लग्न झाल्या कारणानें दुसरें होऊं शकत नाहीं, व जें लग्न झालें त्यांत सगोत्रतेमुळें नवऱ्याच्या व्यवहारास ती उपयोगी नाहीं. ती मातुश्रीप्रमाणें आहे असें नवऱ्यानें मानिलें पाहिजे. एकूण त्या विचारीस इकडे कूप तिकडे विहीर असें होतें. ज्योतिषशास्त्राच्याही अटी

विवाहसंबंधांत घुसल्या व त्यांतील कांहीं अवश्यक आणि कांहीं माह्य पक्ष अशा ठरल्या. लग्नाला अमुक मास मात्र योग्य व त्यांतील अमुक तिथी ठरलेल्या असून ग्रहस्थितीही इष्ट असावी लागते. गुरुशुक्रास्तांत लग्नें होत नाहींत. कांहीं जातींत तर हें वेड इतकें आहे कीं गुरु कन्यागतीं आल्यावांचून त्यांच्यांत लग्नें होत नाहींत; ह्मणजे बारा वर्षेंपर्यंत लग्नाचा काळच नाहीं; ह्मणून बिचाऱ्या आईबापांस मुलांचीं पाळण्यांत लग्नें लावावीं लागतात, व नवरा न मिळाल्यास श्रीकृष्णाशीं मुलीचें लग्न लावावें लागतें. नवरानवरीच्या पत्रिका जुळल्या पाहिजेत, व नवरीचे जन्मपत्रिकेंतील कांहीं नक्षत्र किंवा ग्रहस्थिति नवऱ्याला किंवा सासऱ्याला किंवा सासूला अनिष्ट असल्यास त्या मुली कोणी करीत नाहींत. जरी हे वरील ज्योतिषाचे नियम केवळ शास्त्राज्ञा नाहींत-व त्या अकारणीं प्रायश्चित्त प्राप्त होत नाहीं तथापि भोळ्या लोकांचे मनावर त्यांचा परिणाम झाल्यावांचून राहत नाहीं व बहुतकरून हिंदु लोक वधूवरांचे पत्रिकेचा विचार केल्यावांचून लग्नें करीत नाहींत. धर्मसंबंधीं व ज्योतिषसंबंधीं ज्या आणखी बारीकसारीक अनेक अडचणी आहेत त्या सविस्तर देणें फार कंटाळवाणें होईल. वरील उदाहरणांवरून स्पष्ट होईल कीं हिंदुस्थानांत विवाह ह्मणजे एक धर्माची बाब हा संबंध पूर्णपणें अमलांत आहे, आणि हें साहजिकच आहे, कारण आपल्या ह्या विश्वव्यापि हिंदु धर्मांत लग्नविषयकच काय परंतु सर्व सामाजिक आणि राजकीय संबंधही गोंवून टाकिले आहेत.

आतां पाश्चात्य देशांप्रमाणें इकडेही धर्माचें प्राबल्य विवाहविषयांतून कांहीं अंशीं कमी होत चाललें आहे असें दिसून येईल. पूर्वीं एकाकाळीं हें धर्माचें प्राबल्य इतकें होतें कीं लग्न ह्मणजे ऐहिक सुखाकरितां नव्हेच; केवळ अग्निहोत्रादिक वैदिक कर्में पुरुषांना करितां यावीं, परलोकप्राप्त्यर्थ पुण्यसंचय करितां यावा म्हणूनच लग्न करावयाचें, व आम्रवृक्षाचे सुगंध, छाया इत्यादि प्रमाणें लग्नाचीं ऐहिक सुखें ह्मणजे केवळ आनुषंगिक आणि मर्त्य शरीराचे सदा जुलमी शत्रूंपैकीं अग्रगण्य शत्रूचा कांहींअंशीं मान राखणें, असें समजत असत, परंतु ही समजूत आतां बहुतेक कमी झाली आहे. पूर्वींप्रमाणें अग्नि-

होत्र हें आतां अवश्यक राहिलें नाहीं, आणि विवाहाचे प्रथम दिवशीं जो स्मार्ताग्नि सिद्ध करावयाचा तो आमरणांत प्रदीप्त ठेवण्याचा असून आतां बहुतकरून त्याचें आवाहन व विसर्जन त्याच दिवशीं करितात. तत्रापि पूर्वीच्या समजुती लोकांच्या मनास चिकटून राहिल्या आहेत, व वास्तविक रीतीनें आतां जरी कन्यादानोत्तर मुख्य विधि कांहींच राहत नाहीं तत्रापि नांवाला तरी एक दोन दिवस स्मार्ताग्नीची सेवा होते.

या संबंधापासून वैवाहिक नीति उत्तम स्थितींत राहिली आहे.

३०. ह्याप्रमाणें विवाहाचे बाबतींत धर्माचें प्राबल्य कसें शिरलें याचें निरूपण झालें; ह्मणजे बहुतेक धर्मांची प्रवृत्ति परमेश्वराविषयीं मनुष्याचें कर्तव्य काय आहे इतकेंच ठरविण्याकडे नसून मनुष्यांनीं परस्परांशीं कसें वागावें या विषयांत ह्मणजे सामाजिक व राजकीय संबंधांतही नियम घालून देण्याकडे असते, ह्यामुळें धर्माची व विवाहाची सांगड पडली. तसेंच या सांगडीपासून स्त्रियांच्या संबंधानें पाहतां अनेक नडी कशा उत्पन्न झाल्या हेंही सांगितलें, व या संबंधापासून समाजनीति कशी सुधारली याचेंही दिग्दर्शन झालें. रोमन राष्ट्राची नीति अनेक कारणांनीं बिघडली होती ती ख्रिस्ती धर्मानें विवाहशास्त्राचे कडक निर्बंध करून सुधारली. आपल्या देशाचा इतिहास जरी साद्यंत उपलब्ध नाहीं तत्रापि जेव्हांपासून परस्थ लोक इकडे येऊं लागले तेव्हांपासून ह्मणजे आलेक्झांडरच्या वेळेपासून हिंदु लोकांच्या वैवाहिक नीतिमत्तेविषयीं परस्थ इतिहासकार नेहमीं प्रांजलपणें स्तुति करितात, व या प्रसंशनीय स्थितीचें हेंच कारण आहे कीं धर्माचा विवाहाविषयांत पूर्ण संबंध जडल्यामुळें साहजिक आपल्या देशांत लोकस्थिति चांगली राहिली. हें धर्मबंधन अद्याप आपल्या देशांत शिथिल झालें नाहीं, व जरी कांहींअंशीं धर्मांच्या अटी कमी होऊन स्त्रियांचें दुःख कमी होणें इष्ट आहे तरी एकंदरींत ही गोष्ट पुष्कळ अंशीं अभिनंदनीय आहे; कारण पाश्चात्य देशांतून धर्मबंधन शिथिल होऊन विवाहपद्धतीवर कसा परिणाम घडत चालला आहे याजविषयीं आपल्यास आतां विचार करणें आहे. हा परिणाम ह्मणजे विवाहसंक्रमणाच्या इतिहासांतील चवथी पायरी होय व त्याची दिशा विवाहास

केवळ करारांचें स्वरूप आणण्याकडे असून हा परिणाम अनेक कारणांनीं स्पृहणीय नाहीं याजविषयीं पुढील विवेचनावरून सहज अनुमान होण्यासारखें आहे.

आपल्यांत जे आठ विवाह सांगितले आहेत ते आतांपर्यंत दिलेल्या संक्रमणेतिहासाचे पूर्ण दर्शक आहेत. व आपल्या चालींवरूनही ह्या इतिहासाचें पुष्टीकरण होतें.

३१. परंतु ह्या चवथ्या गोष्टीचें विवेचन करूं लागण्यापूर्वीं इतकें सांगितलें पाहिजे कीं हें कारण अजून हिंदुस्थानांत उत्पन्न झालें नाहीं. तात्पर्य हें कीं आपल्या लोकांत अद्याप पाश्चात्य सुधारणेचें फळ दृष्टीस पडूं लागलें नाहीं व म्हणूनच ह्यापुढें हिंदुस्थानाचें उदाहरण घेतां येणार नाहीं. हिंदुस्थानांत येथवरच मजल पोंचली आहे ह्मणजे प्रथम स्त्रीपुरुषांचा अनियमित व्यवहार, नंतर लग्नसंस्था, व स्त्रियांचें दास्यत्व, नंतर स्त्रियांविषयीं उदारबुद्धि व प्रीति. त्यापासून झालेली स्त्रियांची उन्नति, व त्यांचे स्वयंवर करण्याचे अधिकार. नंतर धर्माचें प्राबल्य; त्यापासून झालेली एकपक्षीं नीतिमत्ता व इतरपक्षीं स्त्रियांची अवनति. हा जो लग्नाचा इतिहास येथवर झाला त्या हकीकतींत आपलाही देश अंतर्गत आहे. इतकेंच नव्हे, परंतु असा चमत्कार आहे कीं आपल्या धर्मशास्त्रांत ह्या सर्व स्थितीचें प्रतिबिंब अजून राहिलें आहे. हिंदुधर्मांत कांहीं युक्तिप्रवादानें ज्या ज्या स्थिति होऊन गेल्या, त्या सर्व संभाळून ठेविल्या आहेत. आपल्या शास्त्रांत जीं आठ प्रकारचीं लग्नें वर्णिलीं आहेत तीं केवळ कल्पनेचीं आहेत असें समजूं नये. तर ज्या ज्या स्थितींतून लग्नपद्धति बदलत गेली त्याचें एक उत्कृष्ट दर्शक आहे असें समजलें पाहिजे. स्मृतींतून आठ विवाह येणेंप्रमाणें सांगितलें आहेत: ब्राह्म, दैव, प्राजापत्य, गांधर्व, आसुर, राक्षस आणि पैशाच; व ते उत्तरोत्तर नीच मानिले आहेत, परंतु हीच व्यवस्था उलट केली तर विवाह कसकसे हिंदुस्थानांत सुधारत गेले ह्याचें हीच मालिका दर्शक आहे. पैशाच विवाह ह्मणजे अनियंत्रित स्त्रीपुरुषसमागम; राक्षस म्हणजे बायको पकडून आणणें; व हें स्त्रियांचे दास्यत्वाचें चिन्ह आहे. आसुर म्हणजे बायको विकत घेणें; गांधर्व ह्मणजे स्त्रियांनीं पुरुषास वरणें. ह्या काळांत परस्परांचें प्रेम आणि समान हक्क असलेले दिसून येतात, व बाकी राहिलेले चार विवाहसांप्रदाय धर्मप्राबल्याचा काळ दर्शवितात. प्राजापत्य विधीचे वेळेस तर वधूवरांस दोन गाई देऊन बाप सांगतो कीं तुह्मीं दोघें धर्मा-

चरण करा. ब्राह्म विवाहांत धर्माचें प्राबल्य कांहीं कमी आहे. सारांश हे आठ विधि विवाहरूपी थर कसे बदलत गेले हें स्पष्टपणें दाखवितात. आपल्यांतील लग्नरीतींचा विचार केला असतांही असें दिसून येईल कीं जसजशी नीच जात तसतशी त्यांच्यांत फार प्राचीन लग्नपद्धति सांपडेल. सर्वांत श्रेष्ठ ब्राह्मण वर्णांत ब्राह्म विवाह राहिला आहे, परंतु इतर कांहीं वर्णांत अद्याप बायका विकत घ्याव्या लागतात, म्हणजे मुली कधीं हुंडा देत नाहींत परंतु मुलालाच उलट द्यावा लागतो. कांहीं वानिये लोकांत नवऱ्याला हजारों रुपये खर्च करावा लागतो. कांहीं नीच जातींत बायका पकडून आणण्याचें चिन्ह तरी राहिलें आहे; म्हणजे शूद्रांत नवऱ्याचे हातांत तलवार किंवा कट्यार असावी लागते. याचा अर्थ जशी काय तलवारबहादुरी करून बायको मिळविली असा दिसतो. आतां गांधर्व आणि पैशाच विवाहाला जागाच राहिली नाहीं; कारण समाजव्यवस्था सुरळीत सुधारलेली झाल्यामुळें अनियमित स्त्रीपुरुषांचे व्यवहार कोठून राहणार; किंबहुना पैशाच विवाह हल्लीं शिक्षेस पात्र होईल. तसेंच लहानपणीं लग्नें करण्याच्या चालीमुळें गांधर्वालाही जागा उरली नाहीं. सारांश विवाह ह्मणजे काय आणि त्याच्या चालीरीती कशा बदलत गेल्या ह्याचा जो इतिहास दिला आहे त्यास आपल्या धर्मशास्त्रांत सांगितलेले आठ विवाह व आपल्या लोकांतील लग्नाच्या चाली यांचे योगानें चांगलें पुष्टिकरण येतें.

पाश्चात्य देशांत स्त्रियांची अत्युच्च स्थिति मान, बुद्धि कौशल्य, इत्यादि गोष्टींत झाली आहे. योग्य शिक्षण दिल्यास त्या लढाईत ही पुरुषांची बरोबरी करूं शकतील.

३२. पाश्चात्य देशांत, विशेषेंकरून अमेरिकेंत स्त्रियांना लग्नाचे बाबतींत पूर्ण स्वतंत्रतेचे हक्क मिळावे असें कांहीं स्त्रियांस आणि त्यांचा पक्ष धरून भांडणाऱ्यांस व नास्तिक लोकांस वाटूं लागलें आहे. सुधारणेच्या प्रसारानें किंवा जगामध्यें जो एकसारखा ज्ञानविकास होत आहे त्यामुळें स्त्रियांचे अंगीं उद्योग करण्याचें सामर्थ्य आणि योग्यता येत चालली असल्यामुळें पुरुषांचें आपल्या वरील जोकड अजीबात फेंकून देऊन आपण अगदीं स्वतंत्र व्हावें अशी त्यांस इच्छा उत्पन्न झाली आहे. (परंतु

ह्या सुधारणेमुळें मानवी स्थिति विशेष चांगली होईल किंवा आहे तशीच राहील किंवा तींत हल्लींपेक्षां अधिक घोटाळा होऊन ती निकृष्ट होईल याचा जगंनियंत्या परमेश्वरावांचून दुसऱ्यास आज निर्णय करितां येणें अशक्य आहे.) सुधारलेल्या आणि सुधारणेच्या पंथांत असणाऱ्या प्रत्येक समाजांतील स्त्रियांस हल्लीं जे स्वतंत्रतेचे हक्क मिळत आहेत ते पूर्वींच्या काळीं त्यांच्या आयांच्या किंवा आजांच्या स्वप्नांत देखील आले नसतील. तसेंच शिक्षणाच्या परिणामानें उदार झालेल्या मनाचे लोकांस स्त्रियांविषयीं मोठा कळवळा आहे व कोणत्याही सामाजिक कृत्यांत त्यांस मोठ्या आदरानें आणि हौसेनें प्रथम मान देण्याविषयीं ते फार तत्पर असतात. जेवणाचे वेळीं किंवा नाचण्याचे वेळीं बक्षिसें वांटण्याच्या किंवा एखाद्या सार्वजनिक इमारतीचा पाया घालण्याच्या समारंभांत, आगगाडीच्या किंवा ट्रामवेच्या प्रवासांत अथवा नाटकगृहांत, सभ्य लोक बायकांचा सन्मान ठेऊन त्यांची सोय प्रथम लावितात. इतकेंच नाहीं, एखाद्या अनभ्यस्त हिंदूनें युरोपियन गृहस्थास भेटतांना चुकीनें प्रथम मडमेस सलाम न केला, किंवा कोणी स्त्रीपुरुषयुक्त सभेला व्याख्यान देतांना प्रथम स्त्रियांस संबोधून न बोलतां सभ्य गृहस्थांस संबोधून बोलूं लागला तर त्याचें वर्तन असभ्य आणि उद्धटपणाचें मानतात. इतका स्त्रियांचा मान अलीकडे वाढला आहे, व उद्योगकाल वाढल्यामुळें पुरुषांचें वर्चस्व अनेक कारणांनीं उत्तरोत्तर कमी होत जाणें साहजिकच आहे; कारण सतत लढाया व दंगेधोपे बंद होऊन जेव्हां लोक स्वस्थतेच्या उद्योगांत निमग्न असतात तेव्हां त्यांचे रानटी व जुलुमी स्वभाव नाहींसे होऊन स्त्रियांविषयीं ममता आणि कळवळा त्यांचे ठायीं वाढत जातात व श्रमाचीं कामें उभयतांवर सारखीं वांटलीं जाऊन तीं करण्यास ते खुषी असतात. तसेंच लढाईच्या काळांत पुरुषांची वारंवार कत्तल होई ह्यामुळें त्यांची संख्या फार कमी असे व बायका त्यांचे मानानें पुष्कळ असल्यामुळें अर्थातूच त्यांची लोक पर्वा करीत नसत, परंतु लढाया बंद झाल्यामुळें उभय वर्गांची गणती समसमान् होत जाऊन बायकांस जास्त किंमत आली आहे व अलीकडे शारीरिक आणि मानसिक शिक्षण मिळविण्याची सर्वांस पूर्ण मोकळीक झाल्यापासून तर स्त्रियांनीं असें दाखविलें आहे

कीं पुरुषांस कलानैपुण्याची आणि ज्ञानाची जी घमेंडी आहे ती फुकट असून त्यांस वर्चस्व येण्याचें कारण केवळ त्यांस प्राप्त होणारें शिक्षण व त्यांची अनुकूळ स्थिति हींच होत; स्त्रियांसही ईश्वरानें तितकेंच ज्ञान दिलें असून त्यांस पुरुषांप्रमाणें शिक्षण दिल्यास त्याही हस्तकौशल्यांत किंवा बुद्धिप्रभावाचे कामांत पुरुषांची बरोबरी करतील. ह्याचीं प्रत्यक्ष उदाहरणें हल्लीं फ्रान्स, इंग्लंड, अमेरिका इत्यादि ठिकाणीं अशीं आढळून येतात कीं, कारकुनीचें काम, दुकानदारीचें काम, कारागिरीचें काम वगैरे स्त्रियाही पुरुषांप्रमाणें चांगल्या रीतीनें बजावितात. केंब्रिज युनिव्हरसिटीच्या अलीकडील परीक्षांवरून असें दिसून येईल कीं बुद्धीचेंच केवळ ज्यांत काम आहे अशा गणितशास्त्रांतही पुरुषांस मागें सारून स्त्रियांनीं बक्षिसें मिळविलीं आहेत. भाषाविषय, शास्त्रविषय, धंदे, घोड्यावर बसणें वगैरे शारीरिक कामें इत्यादि अनेक विषयांत स्त्रियांनीं आपलें प्राविण्य दाखविलें आहे. स्त्रिया लढाईला योग्य आहेत किंवा नाहींत इतकाच प्रश्न राहिला आहे आणि जोंपर्यंत या कामांतही स्त्रिया पुरुषांची बरोबरी करूं शकत नाहींत तोंपर्यंत लढाऊ लोकांचा शांत लोकांवर जो अंमल असतो तो स्त्रियांवर पुरुषांचा राहिल्यावांचून राहणार नाहीं.* तथापि या बाबतींतही स्त्रियांचे पक्षाभिमानी लोक उत्तर देण्यास तयार आहेतच. इतिहासांत प्राचीन काळांतील अमेझान नांवाच्या व अलीकडीलही दुसऱ्या कित्येक शूर स्त्रियांनीं मोठमोठे पराक्रम केले आहेत. सारांश लढाऊपणाही स्त्रियांचे अंगीं नाहीं असें नाहीं, व लग्न करण्याचा मोह जिंकून जर त्यांनीं असा मनोनिग्रह केला कीं बहुतेकींनीं अविवाहित राहून शिपाईगिरी करावी व मनुष्यजा-

---

* हिंदुस्थानांतील शेवटची रणशूर स्त्री लक्ष्मीबाई झांशीवाली इजविषयीं अशी एक गोष्ट सांगतात कीं जेव्हां झांशी शहर इंग्रजांनीं सर केलें व किल्ला घेतला तेव्हां वेढा फोडून लक्ष्मीबाई निघून गेली आणि काल्पीस बाळासाहेबांस जाऊन मिळाली. तेव्हां काल्पीस पोंचतांच रजस्वला झाल्यामुळें तीन दिवस तिला एकीकडे बसून काढावे लागले. सारांश रजोदुःख किंवा गरोदरपणा इत्यादींमुळें स्त्रियांस लढाईचा प्रसंग पाहिजे तेव्हां करितां येईल हें दुःसाध्य आहे.

तीस संतति पाहिजे ह्मणून थोड्यांनीं मात्र ऐहिक सुखाचा अनुभव घ्यावा, तर लढाईच्या व दुसऱ्या शूरत्वाच्या कसबांत स्त्रिया पुरुषांशीं टक्कर मारण्यास खचित हटणार नाहींत, आणि आजपर्यंतच्या अनुभवावरून व शास्त्रावरून ह्या कल्पनेवर आक्षेप घेण्यास कोठें आधारही सांपडणार नाहीं. असो. इतकी गोष्ट खास आहे कीं हल्लीं प्रत्येक सुधारलेल्या समाजांतील स्त्रियांचें पाऊल पुढें पडत असून त्या खेळण्यांत, कसबांत, उद्योगांत, कलांत, भाषाविषयांत आणि न्यायाचीं कोर्टें आणि पार्लमेंटें हीं जरी जुन्या मताला अनुसरून चाललीं आहेत ( ह्मणजे जरी त्यांत अद्याप स्त्रियांचा प्रवेश होऊं देत नाहींत ) तरी न्यायाच्या आणि राजकीय कामांत देखील त्या पुरुषांची बरोबरी करीत आहेत. *

---

* पुरुषांची बरोबरी करण्याची स्त्रियांस हल्लीं जी महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली आहे ती चांगली नाहीं असें म्हणण्याचा माझा हेतु नाहीं; किंवा गर्भधारण आणि बालसंगोपन हें जें कर्तव्य कर्म ईश्वरानें आणि मनुष्यानें त्यांजवर सोंपवून दिलें आहे त्याच कामांत मात्र त्यांनीं निपुण असून इतर गोष्टी शिकूं नयेत असाही माझा अभिप्राय नाहीं. किंबहुना मुलाच्या संगोपनाचें काम उत्कृष्ट रीतीनें बजाऊनही इतर कामांत पुरुषांस मदत करण्यास त्यांस फावणार नाहीं ,असेंही नाहीं ;म्हणून हीं दोन्हीही कर्तव्य कर्में करण्यास त्यांनीं झटावें हा मार्ग विशेष प्रशस्त वाटतो, आणि अशा प्रकारें त्यांनीं पुरुषांची बरोबरी करण्याची उमेद धरली असतां सर्व मनुष्यजातीच्या सामाजिक आणि शारीरिक सुधारणेंत भर पडून त्यांची नीतिमत्ताही वाढेल. सारांश स्त्रियांना घरांतच कोंडलेल्या ठेवणें व ज्या उद्योगाच्या योगानें मनुष्याची बुद्धि आणि कल्पनाशक्ति वाढते अशा विषयांचा त्यांस गंधही लागूं न देणें हें योग्य नसून त्यामुळें आज कित्येक युगें मनुष्यांच्या कर्तृत्वशक्तींत भर पडेनाशी झाली आहे. बहुतेक स्त्रिया अनुत्साही व अशक्त असल्यामुळें ( व आजपर्यंतच्या त्यांस वागविण्याच्या रीतीचा त्या अशा होणें हा साहजिकच परिणाम आहे ) त्यांच्याचपासून उत्पन्न होणाऱ्या त्यांच्या संततींत हे दोष उत्पन्न झाल्यावांचून राहत नाहींत; ह्याकरितां देशाची उन्नति होणें हें पुष्कळ अंशीं त्यांतील स्त्रियांची सुधारणा होण्यावर अवलंबून असतें, आणि यूरोपांतील देशांत, शारीरिक, मानसिक आणि उद्योगाच्या प्रत्येक विषयांत आज जी सुधारणा उच्च स्थितीस जात असलेली दिसत आहे हें, तेथील स्त्रियांची सुधारणा होऊन त्या शारीरिक, मानसिक आणि उद्योगाच्या कामांत पुरुषांची बरोबरी करूं लागल्या ह्याचेंच फळ निदर्शनास येऊं लागलें आहे असें ह्मटलें तरी चालेल.

३३. हल्लीं यूरोपांतील स्त्रियांनीं सामाजिक कृत्यांत पुरुषांइतका मान मिळविणें, त्यांच्या बरोबरीनें विद्या शिकणें व इतर शारीरिक आणि उद्योगांच्या कसरतींत त्यांची बरोबरी करणें इत्यादि बाबतींत, हक्क मिळविले आहेत असें नाहीं. त्यांच्या चालीप्रमाणें व कायद्यानें हल्लीं त्यांस स्वतंत्र मिळकत संपादन करण्याची किंवा वारसाचे हक्कानें घेण्याची मोकळीक असून तिचा उपभोगही त्यांस स्वतंत्र रीतीनें घेतां येतो. ह्याप्रमाणें कोणतीही गोष्ट पुरुषांवर अवलंबून न राहिल्यानें त्यांस स्वतंत्रतेचें सुख पूर्णपणें घेतां येऊं लागलें आहे. प्राचीन काळच्या लोकांत व कित्येक अलीकडील समाजांत देखील स्त्रियांस वारसाच्या नात्यानें जे हक्क येत ते नियमित व अगदीं थोडे असत, आणि शिवाय तिची मिळकत वारसदारीनें मिळालेली असो किंवा तिनें स्वतः संपादन केलेली असो, तिचा उपभोग स्वतंत्रपणानें घेण्याची मोकळीक तिला नव्हती. सारांश प्राचीन कायद्यानें स्त्रीजातीला स्वतःची अशी कोणतीही वस्तु न उरूं दिल्यामुळें आधाररहित होऊन अर्थात्च कोणाच्या तरी ह्मणजे बापाच्या, नवऱ्याच्या अथवा मुलाच्या ताब्यांत जन्मभर राहणें त्यांस भाग पडत असे, व हीच स्थिति स्त्रियांस योग्य असें प्राचीन लोकांचें मत असे; परंतु ही स्थिति बदलत जाऊन स्त्रियांस स्वतंत्र मालमत्ता मिळविण्याचा अधिकार कसा मिळत गेला व त्यांस वारसाचे नात्यानें येणारे हक्कही कसे वाढले हें सांगत बसलें असतां विषयांतर होईल; ह्मणून इंग्लंडांतील स्त्रियांच्या व हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या मिळकतीसंबंधाच्या हक्कांतील तफावत दाखविली असतां पुरे होईल, आणि तेवढ्यावरून पूर्वस्थितींत कायम राहिलेल्या समाजांतील स्त्रियांपेक्षां सुधारलेल्या समाजांतील स्त्रियांची स्थिति किती चांगल्या दशेस पोंचली आहे हेंही समजेल. हिंदुशास्त्राप्रमाणें, नवऱ्याच्या तर्फेनें बायकोस येणारे हक्क शिवाय करून स्त्रियांस स्वतःच्या नात्यानें वारसदारीचा हक्क येणें तो फक्त मृत मनुष्याचे मुलीला आणि आईला मात्र येतो. तेव्हां अर्थात्च अविवाहित असून वारसाचा

पाश्चात्य देशांत स्त्रियांस मिळकत वारसनात्यानें मिळण्याचे व उपभोगण्याचे पुरुषांबरोबर हक्क आहेत. बालविवाहामुळें इकडील स्त्रियांस द्रव्य संपादन करण्याचा उद्योग करण्याची संवय नसते.

हक्क येण्याचा संभव मुलीलाच मात्र आहे, आणि इंग्लंडांत पाहिलें तर कोणत्याही स्त्रीला—मग ती विवाहित असो किंवा अविवाहित असो—ती मृत मनुष्याची बाकीच्या सर्वांहून जवळची नातलग असल्यास तिला हक्क पोंचतो. हिंदुस्थानांतील स्त्रियांस ह्याप्रकारें जी मिळकत मिळते ती जशीच्या तशी कायम ठेवून आपल्या हयातीपर्यंत तिचा उपभोग मात्र घेण्याचा हक्क त्यांस मिळतो, आणि इंग्लंडांत तसें नसून तेथील स्त्रिया त्या मिळकतीची पाहिजे ती व्यवस्था करण्यास स्वतंत्र मुखत्यार असतात. हिंदुस्थानांतील बायकांची मालमत्ता त्यांच्या स्वतःच्या माहेरच्या नातलगांस न मिळतां नवऱ्याचे वारसांस मिळते; परंतु इंग्लंडांतील स्त्रियांची मिळकत त्यांच्या स्वतःच्या वारसांसच मिळते. तसेंच बायकोची स्वतःची वेगळी मालमत्ता असली तरी अडचणीचे प्रसंगीं ती विकण्याचा हक्क हिंदुस्थानांत नवऱ्यांस आहे, परंतु इंग्लंडांत ह्याविषयीं असा वेगळा नियम आहे कीं नवऱ्यानें आणि बायकोनें आपापल्या मालमत्तेचा उपभोग स्वतंत्र रीतीनें घ्यावा व एकाचे मिळकतीवर दुसऱ्याचा दावा चालूं नये असा बंदोबस्त करितां येतो. सारांश इंग्लंडांतील बायकांचे वारसाचे हक्क आणि संपत्तीचा उपभोग घेण्याचे हक्क पुरुषांसारखेच स्वतंत्रतेचे आहेत; परंतु हिंदुस्थानांतील स्त्रियांस प्राचीन काळचीच बहुतेक रीत लागू आहे; ह्मणजे आधीं वारसाचे हक्क त्यांस फारसे नाहींत आणि आहेत त्याप्रमाणें जी मिळकत त्यांचे वांट्यास येते किंवा जी त्या स्वतः मिळवितात तिचा स्वतंत्र रीतीनें उपभोगही त्यांस घेतां येत नाहीं. अशा हिंदुस्थानांतील निराधार स्त्रिया पुरुषांवर सर्वस्वी अवलंबून असल्यामुळें आपल्या अन्नवस्त्रदात्या धन्यांची बरोबरी करण्याचें धाडस त्यांस होत नाहीं ह्यांत काय आश्चर्य आहे? युरोपांतील स्त्रियांस वारसाचे आणि संपत्तीचा स्वतंत्र रीतीनें उपभोग घेण्याचे जसे हक्क मिळाले आहेत तशाच तिकडील सामाजिक चालीही कांहीं अंशीं सोयीच्या असल्यामुळें स्त्रियांचे स्वतंत्रतेंत विशेष भर पडली आहे. युरोपांत स्त्रियांस आपलें लग्न पाहिजे त्या वयांत करण्याची मोकळीक आहे, आणि मुळींच केलें नाहीं तरीही कांहीं हरकत नाहीं; ह्यामुळें विद्याभ्यास किंवा दुसरा इच्छित उद्योग करण्यास त्यांस चांगली सवड मिळते, परंतु हिंदुस्थानांतील मुलींच्या

लग्नकालाची इयत्ता ठरलेली असून ती फारच थोडी ठेविल्यामुळें त्यांस समजूं लागून आपलें हिताहित कळत नाहीं तोंच त्यांचीं लग्नें होतात, व अर्थातच स्वतःच्या उपजीविकेचा कोणत्याही प्रकारचा उद्योग करण्याची सवड न सांपडल्यामुळें बहुतकरून त्या अडचणीचे वेळीं एकच धंदा करून आपली उपजीविका करूं शकतात, आणि तो कोणता ह्मणून कोणी विचारील तर मोठी शोचनीय गोष्ट आहे कीं त्या प्रश्नास, "स्वयंपाक" याशिवाय उत्तर नाहीं.

पाश्चात्य स्त्रियांची लग्न ह्मणजे केवळ करार असें ठरविण्याविषयींची इच्छा. सर्व देशांत लग्न व करार यांत अजूनही फरक आहे; ह्मणजे पतिपत्नींचीं कर्तव्यें निश्चित आहेत. पाहिजे तशीं ठरवितां येत नाहींत.

४. अशा स्थितींत पाश्चात्य देशांतील स्त्रियांस लग्नाचे बाबतींत पूर्ण स्वतंत्रतेचे हक्क मिळविण्याची इच्छा होणें साहजिक आहे, आणि हल्लीं देखील लग्नाचे बाबतींत पाश्चात्य स्त्रियांची स्थिति हिंदु स्त्रियांपेक्षा फार चांगली आहे हें कबूल करावें लागतें. त्यांजवर लग्न केलेंच पाहिजे अशी सक्ति नाहीं. आपला नवरा आपण पसंत करण्याचा त्यांस अधिकार आहे. एक बायको जिवंत असतां नवरा दुसरी बायको करूं शकत नाहीं; तसेंच त्याला रंडीबाजीही करितां येत नाहीं. स्त्रीला आपली मिळकत स्वतंत्र रीतीनें उपभोगितां येते इत्यादि अनेक नियम स्त्रियांच्या सोयीचे आहेत तत्रापि अजून जितके पूर्ण समान अधिकार मिळण्यासारखे आहेत तितके सारे त्यांस मिळाले नाहींत; व लग्न ह्मणजे केवळ करार असें स्वरूप अद्याप लग्नसंबंधास तिकडे आलें नाहीं. कुटुंबाची व्यवस्था करण्याचा हक्क पुरुषांस आहे. मुलांचें संगोपन, शिक्षण व धर्ममत हीं पुरुषांचे ह्मणजे नवऱ्याचे अधिकारांत असतात इत्यादि. पुरुषांचे अंगीं अधिक बल, अधिक अक्कल वगैरे गुण साहजिक असल्यामुळें कायद्यानें आणि लोकमतानें हें वर्चस्व त्यांस मिळालें आहे, परंतु स्त्रियांचे अभिमानी लोक असें ह्मणतात कीं जर स्त्रीपुरुषांचे जोडप्यांत बायकोच नवऱ्यापेक्षां शहाणी व हुशार असली तर तिला हे हक्क कां असूं नयेत? सारांश पाश्चात्य देशांतील स्त्रिया व त्यांचे अभिमानी यांचा यत्न लग्न ह्मणजे केवळ करार असें सिद्ध करण्याकडे आणि अमलांत आणण्याकडे आहे. आपल्या लोकांत लग्न ह्मणजे

करार नव्हे हें सुप्रसिद्धच आहे. पाश्चात्य देशांत लग्न ह्मणजे केवळ करार असें नाहीं हें मात्र फार थोडक्यांस अवगत असेल. करारांचें खरें स्वरूप ह्मणजे करार करणाऱ्या लोकांस परस्परांचे हक्क व जबाबदाऱ्या अमुक आहेत असें ठरविण्याची मुभा असते. उदाहरणार्थ नोकरीचा करार पाहिजे तसा होऊं शकतो. काम, वेतन, काम करण्याची वेळ, मुदत वगैरे जसें योग्य वाटेल तसें ठरविण्याची मोकळीक आहे, परंतु लग्नाची गोष्ट कोठेंच अशी नाहीं. नवराबायकोची कार्यें कर्तव्यें आहेत हीं कायद्यानें ठरविलीं आहेत.* लग्नाचा अर्थ करार इतक्याचपुरता पाश्चात्य देशांत समजला जातो कीं ही नवराबायकोची स्थिति पत्करण्यास स्त्रीपुरुषें स्वतः मुखत्यार आहेत; ह्मणजे आपल्यांत जसा व्यापांत करार होतो तसा त्यांच्यांत प्रत्यक्ष नवराबायकोंत होतो. सारांश अशी स्थिति नसतां मनास योग्य वाटतील ते हक्क ठरविण्याचा अधिकार स्त्रीपुरुषांस असावा असा सांप्रदाय सुरु करण्याकडे स्त्रियांचे अभिमानी लोकांची प्रवृत्ति आहे, व या यत्नास अनुकूल स्त्रियांचें शिक्षण व त्याचे बरोबरीचे शारीरिक व मानसिक गुण व मिळकत मिळण्याचे व उपभोगण्याचे स्वतंत्र हक्क या गोष्टी झाल्या आहेत.

सिंहावलोकन. राहिलेला विषय ह्मणजे लग्नाचे उद्देश.

३५. असो. येथपर्यंत लग्नसंबंधें समाजस्थिति कसकशी बदलत आली याचें विवेचन झालें. त्यांतील सारांश थोडक्यांत बघूं या.

(१) प्रथमारंभीं स्त्रीपुरुष अनियमित रीतीनें परंतु कांहीं काळपर्यंत एकत्र राहत असत. पुढें मनुष्याच्या वेगवेगळ्या टोळ्या होऊन त्या एकमेकांशीं लढाया करूं लागल्यामुळें लग्नाची चाल वाढत जाऊन ही एक कायमची संस्था झाली, कारण लग्नामुळें समाजाची संख्या वाढून त्यांत इतर समाजांशीं टक्कर मारण्यासारखे पुष्कळ शूर शिपाई निपजत. शिवाय सर्वांची जात एक बनत जाऊन जात्यभिमान, पूर्वजभक्ति

*फ्रान्स देशांत असा निर्बंध आहे कीं ज्या वेळेस स्त्रीपुरुषाचें लग्न देवळांत होतें त्यावेळेस पतिपत्नीच्या अधिकारासंबंधीं जो कोड डी नेपोलियन कायद्याचा भाग आहे तो वाचून दाखवावा लागतो.

इत्यादि मनोविकार त्यांच्यांत उत्पन्न होत, ह्यामुळें त्यांची एकीही वाढत जाई व ते समाज अजिंक्य होऊन त्यांचें प्राबल्य परंपरेनें राहत चाललें. ( २ ) परंतु ही लढण्याची प्रवृत्ति फार दिवस चालत आल्यामुळें शेवटीं जसें बलिष्ट राष्ट्रांनीं दुर्बल लोकांचा पाडाव करून त्यांतील लोकांस आपले गुलाम केलें तसेंच त्यांच्या स्त्रियांसही पकडून त्यांशीं लग्नें करूं लागल्यामुळें बायकांस दास्यत्व प्राप्त झालें. मुख्य मुख्य लढाऊ जातींनींच तेव्हां माहीत असलेल्या सर्व जगाचें आधिपत्य मिळविलें आणि त्यांच्यांत बायकांस पकडून आणून आणि पुढें विकत अथवा दान घेऊन लग्न करण्याची चाल असे. बायका ही एक प्रकारची मिळकत आहे असें ते समजत. इतर मालमत्तेप्रमाणें तिजवरही मालकाचा आणि त्याचे मागें त्याच्या वारसांचा पूर्ण हक्क असे. त्यास नानाप्रकारचे कष्ट करण्यास लावीत व कोणत्याही प्रकारची मिळकत स्वतंत्र रीतीनें उपभोगण्याचा त्यांस हक्क नसे. सारांश सर्व प्रकारांनीं पराधीन अशी स्त्री आपल्या नवऱ्याची गुलाम समजली जाई. ( ३ ) कालांतरानें जेव्हां समाज मोठमोठे होऊन ठिकठिकाणीं स्थाईक झाले, लढाया व दंगे बंद होऊन चहूंकडे शांतता होऊं लागली, कायदे आणि राज्यव्यवस्था अमलांत येऊं लागलीं तेव्हां लोकांच्या मनांत थोरपणाचे विचार वाढत जाऊं लागले, बायकांची योग्यता वाढूं लागली, त्यांस आपला नवरा आपण पसंत करण्याचा हक्क मिळाला, स्वतंत्र मिळकत संपादण्याची आणि तिचा स्वतंत्र रीतीनें उपभोग घेण्याची मोकळीक त्यांस झाली, व योग्य कारणास्तव नवऱ्याचा घटस्फोट करितां यावा असाही कायदा झाला. ( ४ ) याच सुमारास लग्नाला दुसरें एक स्वरूप आलें, व त्याचा लग्नपद्धतीवर पूर्ण पगडा बसला. लोकांत नीतीचा प्रसार होऊन त्यांनीं एकमेकांशीं कसें वर्तलें पाहिजे ह्या गोष्टींचे नियम करून ते अमलांत आणण्याविषयीं धर्माचा प्रयत्न नेहमीं चाललाच असतो, त्याप्रमाणें लग्न हाही एक धार्मिक विधि बनविला, आणि नवऱ्यानें व बायकोनें काय काय कर्तव्य कर्में करावीं हें ठरवून टाकिलें; लग्न कायदेशीर झालें असें मानण्यास अमुक अमुक विधि केलाच पाहिजे असा नियम केला, व घटस्फोट पाहिजे तेव्हां करितां येऊं नये ह्मणून त्याला कांहीं कडक अटी ठेवल्या. कित्येक देशांत तर घटस्फोट होऊंच शकत

नाहीं असें धर्मानें ठरविलें. ह्याप्रमाणें ह्या धार्मिक नियमांनीं पुष्कळ प्रकारें हो-णारे अनीतीचे प्रचार बंद केले खरे, तत्रापि हे नियम बायकांस विशेष प्रतिकूल असल्यामुळें नवऱ्याचा अधिकार तिजवर पुनः स्थापित झाला. (५) हल्लीं शास्त्रीय विषयांचें ज्ञान आणि सुधारणा वाढूं लागलीं आहेत व धर्माच्या अटींचें प्राबल्य कमी होत जाऊन हल्लीं स्त्रियांची स्थिति पुनः पूर्ण स्वतंत्र होत चालली आहे. कायद्यावरून व लोकवहिवाटीप्रमाणें त्यांस मिळकत संपादण्याचा, किंवा वारसाचे नात्यानें घेण्याचा हक्क आहे आणि स्वतंत्र रीतीनें तिचा उपभोग घे-ण्याचीही मोकळीक त्यांस आहे. दुसरेही कित्येक सार्वजनिक हक्क पुरुषांचे बरो-बरीनें त्यांस मिळाले आहेत. उद्योगशीलता आणि शिक्षण हींही त्यांच्यांत वाढत चालल्यामुळें कलाकौशल्यांत आणि विद्वत्तेंत त्या पुरुषांची देखील बरोबरी करण्यासारख्या झाल्या आहेत; आणि अलीकडे तर त्यांची योग्यता आणि धी-टपणा अशा स्थितीस जाऊन पोंचलीं आहेत कीं लग्नसंबंधानें पुरुषांस कोण-ताही हक्क विशेष नसून उभयतांस सारखीच स्वतंत्रता असावी अशी खटपट त्या करीत आहेत. ह्याप्रमाणें मानवी जातीच्या बाल्य दशेपासून तों आजपर्यंत लग्नसंबंधांत झालेल्या फेरफारांची हकीकत झाली. आतां इतक्या गोष्टींचा वि-चार करणें राहिलें कीं लग्न करण्याची सर्वांत उत्तम तऱ्हा जशी असावयास पा-हिजे तशी अद्याप प्रचारांत आली आहे किंवा नाहीं ? तसेंच समाजशास्त्रदृष्ट्या ते हेतु लग्नापासून साधले पाहिजेत ? आणि आजपर्यंत लग्नपद्धतीला जीं निरनिराळीं स्वरूपें येत गेलीं त्यांत हे उद्देश त्यांचे महत्वाचे मानानें कितपत साधत असत हेंहीं पाहणें अवश्य आहे. हा विषय फार गहन आणि वादग्रस्त असल्यामुळें स्पेन्सर ह्यानें आपल्या ‘ समाजशास्त्र ’ ग्रंथाच्या पहिल्या पुस्तकां-तील आरंभींच्या भागांत सामाजिक संस्था ह्याविषयीं विवेचन केलें आहे त्यांतील भावार्थ ( जसा मला समजला आहे तसा ) वाचकांस सादर करितों, आणि त्यांत सांगितलेल्या गोष्टी आपल्या हल्लींच्या हिंदुस्थानांतील लग्नपद्धतीस कितपत लागू पडतात हेंही थोडक्यांत सांगणें अवश्य आहे. त्याविषयीं सविस्तर विवेचन पुढील भागांत होईल.

३६. लग्नाचा पहिला उद्देश समाजाचें अस्तित्व चिरकाल राहणें हा होय,

पहिला हेतु समाजाचा उत्कर्ष हाच आहे.

व समाजाचें अस्तित्व राखण्यास लग्नपद्धति अवश्य आहे, मनुष्यजातीचें अस्तित्व राखण्यास ती अवश्य नाहीं हें येथें ध्यानांत ठेविलें पाहिजे. कारण एकमेकांशीं लढाई करणें हा जर मनुष्यजातीचा देहस्वभाव नसता तर पशुपक्ष्यादि इतर एकेका जातीचे सर्व प्राणि जसे लग्नचालीशिवाय राहिले आहेत तशीच मनुष्यजात राहती; परंतु ह्या लढाई करण्याच्या स्वभावामुळें एकमेकांविरुद्ध असे मनुष्यजातीचे निरनिराळे समाज बनले आहेत व त्या समाजांस एकमेकांशीं टक्कर मारून आपापलें अस्तित्व कायम राखण्यासाठीं लग्नपद्धति स्वीकारण्याची अवश्यकता आली म्हणून लग्न करण्याचा मुख्य हेतु हाच आहे (आणि ह्यामुळेंच लग्नपद्धति प्रचारांत आली) कीं समाजाचें अस्तित्व चिरकाल रहावें; आणि हा उद्देश एका पुरुषानें एक बायको करावी या नियमानें इतर विवाहाच्या चालींपेक्षां जास्त साधतो. हल्लींच्या काळांत राष्ट्राची शक्ति फार वाढली आहे; तसेंच परोपकारबुद्धि आणि दुसऱ्याचा कळवळा हींही लोकांचे मनांत जागृत होऊं लागलीं आहेत, ह्यामुळें पूर्वीसारख्या सतत लढाया होत नाहींत. लढाई केव्हां उद्भवेल ह्याचा नेम नसल्यामुळें विचारदृष्ट्या ती सतत जवळच येऊन ठेपलेली आहे असें धरून जरी चालावें लागतें तरी प्रत्यक्ष लढाई फारच क्वचित् घडते, यामुळें पूर्वीप्रमाणें लढाईनें पुरुषांची संख्या कमी न होतां स्त्री व पुरुषांचे दोन्ही वर्ग समसमान झाले आहेत व त्यांची परस्पर चढाओढ लागून दोन्ही वर्ग महत्वानेंही सारखेच होत आहेत. तेव्हां अशा स्थितींत एकच स्त्री करण्याची चाल असणें अवश्य आहे आणि एकंदर राष्ट्राची लोकसंख्या पुष्कळ व निरोगी होण्यास हीच रीति उपयुक्त आहे. त्याचप्रमाणें एकपत्नीक धर्माचें महत्व लोकांचे मनांत पूर्ण बिंबल्यामुळें आणि उद्योगशिलतेचा प्रसार होत असल्याकारणानें एक स्त्री असणें हा एक जणूं सृष्टिनियमच आहे किंवा मनुष्याची उपजत बुद्धि आहे असा भास होतो. व त्याविरुद्ध पक्षाची ह्मणजे अनेक स्त्रिया करणाऱ्या पुरुषांचा आणि अनेक पति करणाऱ्या स्त्रियांचा आपणास तिरस्कार वाटतो. शिवाय हल्लींच्या काळांत अनेक बायका करण्याची चाल असती तर तिचे परिणाम दुःखदायकच झाले असते. ह्मणजे एक तर बायकांचा तोटा येऊन कित्येक पु-

रुषांस अविवाहित व्हावें लागेल. आणि दुसरें असें कीं एकच बायको एकच नवरा व यांस जितकीं मुलें होणार तितकीं एक पुरुषास अनेक बायका असल्यानें न होऊन समाजाचा उत्तरोत्तर ऱ्हास होत जाईल. तसेंच एक स्त्री करण्याच्या रीतीपासून जितका कुळाभिमान जागृत असतो तितका अनेक बायका केल्यानें नसतो. परंतु उलट कुटुंबांत द्वैत वाढून तेंच सर्व घराण्यांत, जातींत आणि राष्ट्रभर पसरतें. सावत्र भावांनीं आपसांत लढाया करून किती रक्तपात केला आहे हें वाचतांना इतिहासाचीं पानें देखील रुधिरमय झालेली भासतात* तर ह्यावरून लग्न करण्याची अत्युच्च तऱ्हा समाजाचे उत्कर्षासंबंधें पाहिलें असतां प्रचारांत येऊन चुकली आहे, आणि ती एक बायको करण्याची चाल होय. हिंदुस्थानांतील लोकांची रीति व समजुत प्रायः अशीच आहे, कीं एक स्त्री करणें चांगलें. आमच्या शास्त्रांत देखील असेंच लिहिलें असून एकीहून अधिक बायका करण्याची जी सवड ठेविली आहे ती कांहीं विशेष कारणाकरितां मात्र आहे. तत्रापि कित्येक राजे व श्रीमंत लोक त्या सवडीच्या कारणांचा विचार न करितां पुष्कळ बायका कराव्या एवढ्या परवानगीचाच तेवढा फायदा घेतात. ह्या करितां आपल्या शास्त्राचा जो नियम आहे कीं केवळ चैनीकरितां कोणीही पुष्कळ बायका करूं नयेत हा नियम कडक रीतीनें अमलांत आणण्याची सुधारणा आपल्या लोकांत होणें अवश्य आहे. या पलीकडे आपल्या लग्नपद्धतींत ह्या संबंधानें दुसरी सुधारणा करण्यासारखी दिसत नाहीं. हिंदुस्थानचे विशेष स्थितीकडे लक्ष देऊन एकच बायको करण्याच्या नियमाला कांहीं अपवाद शास्त्रकारांनीं करून ठेविले आहेत ते अवश्य आहेत यांचा विचार मागाहून करूं.

लग्नाचा दुसरा हेतु संततीचा उत्कर्ष होय. प-

३७. लग्नाचा दुसरा हेतु हा आहे कीं त्यापासून पुढील संततीचें कल्याण व्हावें. ह्मणून ज्या लग्नपद्धतीचे योगानें आईबापांवर फारसा त्रास न पडतां सशक्त आणि पुष्कळ

---

* हिंदुस्थानाचा इतिहास सूक्ष्म दृष्टीनें पाहिला तर रजपूत व मुसलमानी राज्याचा नाश अनेक लग्नाच्या चालीमुळें झाला आहे असें ह्मटलें पाहिजे.

READING ROOM

रंतु याजकडे लक्ष कोण- त्याच लोकांत दिसत नाहीं. पाश्चात्य लोकांच्या चालींपासून हा हेतु साह- जिक साधतो. अलीक- डील कल मात्र दूषणीय आहे.

मुलें होवात तीच तऱ्हा उत्तम असें ह्मटलें पाहिजे. आपल्या लग्नापासून पुढें होणाऱ्या मुलांवर काय परिणाम होईल याचा विचार प्रत्येक लग्न करणारे जोडप्यानें लग्नापूर्वी करणें अवश्य आहे. परंतु चमत्कार असा आहे कीं तिकडे कोणीही लक्ष पुरवीत नाहींत, व कोणी कायदेकारांनींही आजपर्यंत ह्याचा विचार केलेला आढळत नाहीं. याचें कारण असें आहे कीं लग्न करण्याचे लोकांचे हेतु फार वेगळेच असतात. कित्येकांची परस्परप्रीति जमते ह्मणून ते लग्न करितात, कित्येक असें मानितात कीं धर्मांत सांगितल्याप्रमाणें लग्न करणें अवश्यच आहे. आणि कित्येक निवळ स्वतःच्या सोयींसाठीं करितात. अर्थातूच ह्या प्रकारच्या लग्न करणाऱ्या जोडप्याच्या मनांत लवलेश देखील असा विचार नसेल कीं लग्न करून ज्या मानवी प्राण्यांना पुढें आपण ह्या भवसमुद्रांत लोटणार आहोंत त्यांच्या प्रारंभींच्या अवश्य असणाऱ्या शिक्षणास आणि सुश्रूषेस लागणारीं भरपूर साधनें आपणापाशीं आहेत किंवा नाहींत? अथवा आपली संतति चांगली निरोगी होईल, इतके आपण स्वतः सशक्त आणि पूर्ण वयाचे आहोंत किंवा नाहीं ? हाही विचार कोणी करीत नाहींत. ग्रीक देशांतील लायकरगस् नांवाच्या कायदेकाराला मात्र हें तत्व पूर्ण कळलें होतें असें दिसतें; कारण त्यानें स्पार्टा येथें लग्नसंबंधाचे जे कायदे केले त्यांतील मुख्य उद्देश पुढील संतति शूर व दगडासारखी बळकट व्हावी हाच होता; परंतु त्या नियमांनीं फक्त शरीर मजबूत होण्यावांचून आयुष्यांत जीं इतर अनेक सुखें मनुष्यांस मिळण्यासारखीं आहेत त्यांची बंदी केल्यामुळें लवकरच लोकांस त्यांचा कंटाळा वाटूं लागला; व ते नाहींसे होऊन त्यांचें अनुकरण पुनः कोणींही केलें नाहीं. स्पार्टन लोकांचा अपवाद खेरीज करून आजपर्यंतच्या दुसऱ्या कोणत्याही लोकांत मुलांच्या कल्याणाचा विचार झालेला दिसत नाहीं. लग्नाची सुधारणा होत जाऊन तें हल्लींच्या स्थितीस येईपर्यंत त्यास चार निरनिराळीं स्वरूपें आलीं; ह्मणजे प्रथम स्त्रियांना धरून आणून केवळ गुलामांप्रमाणें वागवीत; नंतर स्त्रियांस उदारपणानें वागवून त्यांची प्रीति संपादन करणें लोकांस आवडूं लागलें; त्यानंतर लग्न ह्मणजे केवळ धार्मिक विधि झाला; आणि हल्लीं लग्न करण्यांत स्त्रीपु-

रुषांची दृष्टि परस्परसोयीकडे असते. परंतु ह्यापैकीं एकाही प्रकारांत संततीच्या हिताकडे बुद्धिपुरःसर लक्ष दिलेलें नसून शारीरिक इच्छा तृप्त करून घेणें, प्रीति संपादणें, धार्मिक विधि करणें किंवा मनाच्या लहरीप्रमाणें वागणें इत्यादि तात्कालिक फायदे करून घ्यावे इतकेच लग्न करणारांचे हेतु असतात. आतां दैवयोगानें ह्या निरनिराळ्या लग्नपद्धतींत मुलांचें कल्याण निरनिराळ्या रीतीनें आपोआप होत गेलें हें खरें आहे; परंतु तें खात्रीनें होण्याचे ,बुद्धिपुरःसर उपाय आजपर्यंत कोणीं योजिले नाहींत. सर्व पद्धतींत यूरोपांतील प्रस्तुतची लग्नपद्धति मुलांच्या कल्याणास चांगली अनुकूळ आहे असें दिसतें. कारण तिच्या योगानें प्रत्येक जोडप्यास पुष्कळ व निरोगी मुलें होतात. तसेंच, तिकडील उच्च प्रतीचे आणि मध्यमप्रतीचे लोक चांगली खाण्यापिण्याची सोय असल्यावांचून बहुतकरून लग्नें करीत नाहींत. तेथील लोकांचें समाजमतच असें आहे कीं, ज्या मनुष्यास आपल्या योग्यतेनुरूप घरीं बरदास्त राखण्याचें किंवा होणाऱ्या मुलांस आपल्या योग्यतेनुरूप शिक्षण देण्याचें सामर्थ्य नसेल त्यांनीं लग्न न करणें बरें. दुसरें असें आहे कीं, यूरोपांतील सुशिक्षित लोकांत बहुतकरून स्त्रीचें लग्न १६ व्या आणि पुरुषाचें २५ व्या वर्षानंतर करण्याची चाल आहे, आणि तीही सशक्त मुलें होण्यास फारच उपयुक्त आहे. एकंदरींत यूरोपांतील चाली मुलांस पुष्कळ हितावह आहेत यांत संशय नाहीं. परंतु अलीकडे पाश्चात्य देशांत फ्रीम्यारिजेस ह्मणजे ऐच्छिक लग्नें करण्याची सुधारणा होऊं पाहत आहे व मुलांच्या संगोपनाकरितां एक शिक्षणगृह काढून त्यांत लहानपणापासून मुलांस ठेवावें अशाविषयीं कल्पना चालू झाल्या आहेत, ही गोष्ट मात्र फार शोचनीय वाटते. कारण मुलें मोठीं होऊन कांहींशीं वयांत येईपर्यंत तीं आईबापांच्या देखरेखींतच असलीं पाहिजेत. आणि त्यांच्या ऐवजीं नोकर ठेविलेल्या दाया आणि शिक्षक ह्यांच्या नजरेंत त्यांस ठेविलें असतां पुष्कळ वाईट परिणाम घडून मुलांचें नुकसान झाल्यावांचून राहणार नाहीं. स्पेन्सर ह्याचें मतही ह्याप्रमाणेंच ह्या नवीन सुधारणेस प्रतिकूळ आहे. असो. वास्तविक रीतीनें ह्या गोष्टींचा वादविवाद करण्याची आपणास गरज नाहीं- व फार पुढें सरसावलेल्या आणि सुशिक्षित अशा पाश्चात्य लोकांस हीं नवीन मतें सोडून देण्याविषयीं उपदेश करण्याचा माझा

हेतुही नाहीं. कारण ते आपली स्वतःची काळजी घेण्यास पूर्ण समर्थ आहेत. परंतु अनुसंधानाच्या प्रसंगानें आलेल्या गोष्टीचा उल्लेख करावा लागला.

आपल्या चाली संततीचे उत्कर्षास अत्यंत प्रतिकूळ आहेत.

३८. मुलांच्या कल्याणासंबंधानें हिंदुस्थानांतील लग्नपद्धतीचा विचार केला असतां असें आढळून येईल कीं ह्या बाबतींत आपल्या चाली फारच दुष्ट आहेत. किंबहुना त्यांच्या पलीकडे वाईटपणाची सीमा राहिली नाहीं. हिंदु लोकांस आपल्या मुलांची माया कमी आहे, किंवा त्यांच्या शिक्षणाविषयीं ते बेपर्वा असतात असें माझें ह्मणणें नाहीं; परंतु आपल्यांतील चालीच अशा वाईट आहेत कीं, मुलें अशक्त आणि निस्तेज व्हावीं हा त्यांचा स्वाभाविक परिणाम आहे. शिवाय लहानपणापासून मुलांस वळण लावण्याचें व शारीरिक शिक्षण देण्याचें काम आईबापांवर असतें; परंतु आपलीं मुलें नुस्तीं रोगरहित किंवा व्यसनरहित असलीं ह्मणजे झालें शारीरिक शिक्षण, आणि नीतिशिक्षण;–अशी त्यांची समजूत अगदीं कोती असल्यामुळें अर्थातूच मुलांस लहानपणापासून उत्साहोद्योगादि गुण अथवा धाष्टर्य, तेज इत्यादि शारीरिक उत्कर्ष प्राप्त होत नाहींत. हिंदू मुलांची उत्कर्षस्थिति न होण्यास बालविवाह हें दुसरें मोठें कारण निःसंशय आहे, व त्याविषयीं पूर्ण विचार मी पुढील एका भागांत करणार आहें. येथें इतकेंच सांगणें बस्स आहे कीं, आपल्या हिंदुस्थानांत लग्न ह्मणजे केवळ धर्माचरण करण्याकरितां करावयाचें अशी समजूत आहे, व त्यामुळें स्त्रीपुरुषांचा स्वभाव आणि परस्परप्रेमभाव कसा आहे ह्याचा यत्किंचितूही विचार लग्नापूर्वी केला जात नाहीं. जेथें लग्न करणारीं जोडपीं नवरा बायको होण्यास योग्य आहेत किंवा नाहींत इकडे कोणी लक्ष पुरवीत नाहींत; मुली अगदीं अशक्त व कुरूप असल्या तरी त्यांचीं लग्नें झालींच पाहिजेत असा जेथें जुलूम आहे; जेथें वृद्धपुरुष देखील पुत्रप्राप्ति होऊन आपला उद्धार व्हावा अशा समजुतीनें (अर्थात् बाल स्त्रियांशीं) लग्नें करूं इच्छितात;–अशी स्थिति आहे, तेथें एकमेकांना योग्य अशा स्त्रीपुरुषांचीं जोडपीं जमणें क्वचित् शक्य आहे. आणि असा शारीरिक व मानसिक रीतीनें जोडा जमल्यावांचून खरें ऐहिक सौख्य आणि उत्कृष्ट

संतति प्राप्त होण्याची आशा बाळगणें व्यर्थ आहे. मुलें चांगलीं वाढण्यास प्रथमतः आई प्रौढ आणि सुशिक्षित असावी लागते. परंतु आपल्या लोकांतील बालविवाहाच्या चालीनें प्रजाजननाचें काम स्त्रियांवर अल्पवयांत आल्यामुळें मुलांच्या लहानपणीं त्यांची योग्य काळजी घेण्याचें काम त्यांजकडून चांगलें होत नाहीं. मुलांना मरूं न देतां सरासरी त्यांचा जीव जगविला ह्मणजे मातृप्रेमास उचित असें आपलें कर्तव्य सरलें असें त्यांस वाटतें, आणि कुटुंबांतील इतर मनुष्यांची आणि लोकांचीही अशीच समजूत असल्यामुळें तेही समाधान पावतात. ह्याप्रमाणें आपली हल्लींची लग्नपद्धति संततीच्या हितास अत्यंत प्रतिकूल आहे असें ह्मटल्यावांचून गत्यंतर नाहीं.

समाजहित. संततीचें हित व मातापितरांचें हित परस्पर कांहींअंशीं विरुद्ध आहेत, परंतु मातापितरांनीं आपले हितापूर्वीं संततीचे कल्याणाकडे लक्ष दिलें पाहिजे याचें कारण.

३९. परंतु सशक्त आणि पुष्कळ संतति व्हावी हा हेतु लग्नापासून प्रथम साधला पाहिजे, हें अक्षरशः खरें आहे व तिकडे आपणांस लक्ष पुरविलें पाहिजे. पुष्कळ संतति होणें हें तर अवश्यच आहे; कारण तसें न झाल्यास समाज क्षीण होत जाऊन नाहींसा होईल, हें सांगावयास नको. परंतु नुस्ती पुष्कळ संतति उपयोगाची नाहीं, ती चांगली सशक्तही असली पाहिजे. कारण एखाद्या समाजांत अशक्त मनुष्यांची संख्या वाढत जाऊन तो समाज पुष्कळ मोठा झाला, तरी असल्या मोठ्या होण्यानें त्याचा निभाव लागणार नाहीं. उलट असें आहे कीं, ज्यांस आयुष्यांत पडणारे कष्ट सोसण्याची आणि व्यवहार, युद्ध, बुद्धि इत्यादिकांत इतर मनुष्यांस हटविण्याची शक्ति नाहीं अशा असंख्य दुर्बल मनुष्यांनीं जरी समाज भरलेला असला तरी तो केवळ निरुपयोगी आणि भारवत् समजला पाहिजे; व त्याच्या योगानें लोकांचीं दुःखें कमी न होतां उलट वाढत मात्र जातील. अशा समाजांत अज्ञान मुलें आणि निराश्रित मनुष्यें मरण्याचा झपाटा सुरू असल्यास तोच फायदेशीर होऊन त्याच्या योगानें तो समाज उच्छिन्न होत नाहीं. सारांश मनुष्यांची फक्त संख्याच वाढत जाऊन उपयोगी नाहीं; तिच्या प्रमाणानें त्यांचें बळ आणि श्रम करण्याची शक्तीही वाढत जा-

ऊन सर्व समाज पूर्वींपेक्षां संख्येनें आणि शक्तीनें बळकट होत जाणें अवश्य आहे. ह्याप्रमाणें एकेक पिढी मोठी होऊन त्यांस पुनः सशक्त आणि पुष्कळ मुलें होण्याचा क्रम अक्षयीं सुरू असावा असें वर सांगितलें. परंतु नवीन संततीच्या योगानें पहिल्या प्रौढ झालेल्या पिढींतील मनुष्यांस (आईबापांस) शारीरिक त्रास न पडेल, व समाजाचें अस्तित्व राखण्यास अवश्य अशीं सामाजिक कामें करण्याची उमेद त्यांस राहील, अशी त्यांची स्वतःची स्थिति असली पाहिजे. कारण प्रत्येक मनुष्यास आपलें जीवित राखण्याकरितां जसें अनेक तऱ्हांनीं झटावें लागतें, तसेंच इतर समाजांत आपल्याही समाजाचें अस्तित्व राखण्याकरितां त्यांशीं टक्कर मारून त्यांस नेहमीं पुरें पडावें लागतें; आणि हें काम प्रत्येक वेळीं पुढली पिढी तयार होईपर्यंत समाजांतील ह्या प्रौढ मनुष्यांवरच अवलंबून असतें. ह्याप्रमाणें आपलें स्वतःचें, आपल्या मुलांचें आणि समाजाचें हित, निरनिराळीं असून हीं तिन्हीं परस्परांशीं विरुद्ध आहेत, ह्मणजे एकाचें महत्व धरून चाललें तर दुसरें चांगलें साधत नाहीं. आतां समाजाचें हित प्रथम साधलें पाहिजे व नंतर स्त्रीपुरुषांनीं स्वताचें हित साधण्यापूर्वीं, मुलांचे हिताकडे लक्ष देणें अत्यंत अगत्याचें आहे. कारण प्रत्येक पिढी अशक्त होत गेल्यानें तो समाज उत्तरोत्तर क्षीण होऊन त्याचा पूर्ण अपकर्ष होईल व इतर ज्या समाजांत संततीचे उत्कर्षास अनुकूल स्थिति असेल अशा समाजांत लोक त्यास जिंकून टाकितील. ह्याप्रमाणें समाजशास्त्रदृष्ट्या लग्नाचा दुसरा मुख्य हेतु हाच आहे कीं त्यापासून भावि प्रजेचें हित ह्मणजे पुष्कळ व सशक्त प्रजा व्हावी* न्यायदृष्टीनें पाहिलें असतांही मुलांचें संगोपन करून त्यांस वाढवि-

---

* माल्थस नांवाच्या एका प्रसिद्ध अर्थशास्त्रकारानें असें ठरविलें आहे कीं एखाद्या देशांत धान्य वगैरे उत्पन्न करून मनुष्य पोषण करण्याची जमिनीची जितकी शक्ति असते त्या पलीकडे प्रजा वाढत जाते व यामुळें देशांत दारिद्र्य उत्पन्न होऊन मनुष्यास उपासमार पडते. ह्मणून प्रजेचे वृद्धीस निर्बंध ठेवला पाहिजे. प्रथमदर्शनीं वरील मत या माल्थसच्या सिद्धांताच्या विरुद्ध दिसतें परंतु लग्न करून नंतर प्रजाजननास अडथळे ठेवणें हें नीतीस व कोणत्याही समंजस मनुष्यास पसंत पडणार नाहीं व माल्थसच्या सिद्धांताचाही रोख इकडे नसावा. कारण इतर पुष्कळ उपायांनीं प्रजा फार वाढूं न देणें हें साध्य आहे.

ण्याचें जोखिमीचें काम आईबापांवर घातलेलें आहे ह्मणून जे लोक आईबापांची संज्ञा मात्र मिळवितात परंतु आईबापांचें कर्तव्य योग्य बजावीत नाहींत ते महानिंद्यस पात्र आहेत.

मनुष्याची साधारण प्रवृत्ति लग्नाकडे आहे. त्यांत धर्माज्ञा. यामुळें हिंदुस्थानांत लग्नांत संततींचे हिताकडे दुर्लक्ष होतें, व हा देश आर्यांचा असून राष्ट्राच्या चढाओढींत मागसला आहे.

४०. हिंदुस्थानांतील लोकांच्या मनांत भावि प्रजेचें काय होईल याचा कधींच विचार येत नाहीं. केवळ अंधत्वानें, अशक्त, अपूर्ण अशा मुलींचीं व मुलांचीं लग्नें करून टाकितात व एक आपलें कर्तव्य आपण केलें असें आईबाप समजतात. विचारदृष्टया पाहिलें तर तुह्मी लग्न करूं नका हा उपदेश करणें फार सोपें आहे हें खरें आहे. प्रत्येक मनुष्य ह्मणजे स्त्री व पुरुष यांस संसारसुख घेणें व नीतीनें समागमेच्छा तृप्त करणें अगदीं वाजवी जरूर आहे. कोणी कितीही कारणांनीं लग्नाला अयोग्य असो तरी त्यासही लग्नाची इच्छा आवरणें फार कठीण आहे. ही गोष्ट पाश्चात्य व पौर्वात्य लोकांस सारखीच लागू आहे. ही नैसर्गिक लग्नाकडे ओढणारी प्रवृत्ति आपल्या लोकांत धर्माज्ञेमुळें जास्तीच बलवत्तर झाली आहे. ह्मणजे लग्नाशिवाय स्त्रियांस परलोक नाहीं व गृहस्थाश्रम पुरुषास प्रशस्त मानिला आहे.—यामुळें बहुतेक सर्व स्त्रीपुरुषांचीं लग्नें होतात; ह्याप्रमाणें मनुष्याची स्वाभाविक प्रवृत्ति आणि धर्माज्ञा ह्या दोहोंचा एकच रोख आहे हें खरें आहे. परंतु हिंदु लोकांनीं हें लक्षांत वागविलें पाहिजे कीं, ह्या पृथ्वीतलावर जीं राष्ट्रें आहेत त्यांतून हिंदू समाजाचें अस्तित्व नाहींसें होणें योग्य नाहीं. इतकेंच नाहीं. तर ज्या आर्य लोकांचा त्यांच्या स्वगुणांनीं पृथ्वीवरील चढाओढींत उत्कर्ष होत आहे, त्याच आर्य लोकांची पुरातन शाखा आपण हिंदु लोक आहोंत; व आपण ह्या पार्थिव कलहांत मागसणें हें अयोग्य व अश्रेयस्कर आहे. ह्मणूनच स्वाभाविक देहप्रवृत्ति व धर्माज्ञा ह्या दोहोंचाही मेळ समाजहित व भावी प्रजेचें हित ह्यांशीं घातला पाहिजे.

४१. स्पेन्सर साहेबांच्या सिद्धांताप्रमाणें हें समाजहित व भावि संततीचें

हें हित पूर्ण वाढ झाल्यानंतर स्त्रीपुरुषांचा समागम झाल्याशिवाय साधणार नाहीं, असें स्पेन्सरचें मत आहे.

हित, स्त्रीपुरुषें प्रजोत्पादनास योग्य होईपर्यंत समागम न होण्याची व्यवस्था ठेविल्याशिवाय साधणार नाहीं. तात्पर्य, शरीराची वाढ पूर्ण होईपर्यंत प्रत्येक मुलास स्वतंत्र वाढूं दिलें पाहिजे. ज्या देशांत प्रौढ वयांत लग्नें करण्याची स्वयंवराची व स्त्रीपुरुषांनीं अविवाहित राहण्याची चाल आहे, त्या देशांत स्त्रीपुरुषें बहुतकरून परस्पर योग्यत्व साधून चांगली प्रजा उत्पन्न होण्यास हरकत पडत नाहीं; व ह्मणून ह्या चाली चांगल्या असें ह्मणावें लागतें. आपल्या हिंदुस्थानांत ह्या चाली प्रचारांत आणणें कितपत हितावह होईल, व ज्या धर्माच्या आकलनानें लोकांची वैवाहिक स्थिति फार निष्कलंक राहते, व जें धर्मबंधन हिंदु लोकांच्या मनाला इतकें प्रिय होऊन खिळून गेलें आहे, तें कमी करणें किंवा नाहींसें करणें प्रशस्त आहे किंवा नाहीं, ह्याचा विचार स्वतंत्र लेखांत केला पाहिजे. येथें इतकें सांगणें पुरें होईल कीं, आपल्या धर्मविषयक कल्पना कायम राहून, स्त्रीपुरुषांची वाढ पूर्ण होऊन त्यानंतर प्रजाजनन व्हावें, अशी विवाहपद्धति आपणांस अमलांत आणितां येईल. मात्र प्रौढ वयांत आल्यानंतर संतति होणें हें समाजाला व भावि प्रजेला अत्यंत श्रेयस्कर आहे, हें हिंदू समाजानें निश्चयपूर्वक पूर्ण लक्षांत ठेविलें पाहिजे. तसेंच लोकमतही असें झालें पाहिजे कीं, जर मुलांचें योग्य संगोपन व शिक्षण होण्याचें सामर्थ्य नाहीं, तर लग्न न करणें प्रशस्त. कारण लोकमताचाही जोर कायद्याइतकाच असतो. कायद्यानें जी गोष्ट होते तीच लोकविद्वेषाचे भयानेंही पूर्ण अमलांत येऊं शकते. असो.

४२. लग्नापासून आपणा स्वतःलाही सुखप्राप्ति करून घेण्याची इच्छा लग्न करणारांस असणें वाजवी आहे. परंतु आधीं मुलांचा विचार केल्यानंतर मग त्यांनीं आपल्या हिताकडे दृष्टि द्यावी. सशक्त मुलें व्हावीं व त्यांचें संगोपन व शिक्षण यथास्थित व्हावें, मग स्त्रीपुरुषांच्या सुखाचें नुकसान झालें तरी हरकत नाहीं असें मात्र त्याच्या संबंधानें समजतां येत नाहीं. कारण,

लग्नाचा तिसरा हेतु मातापितरांचें हित याकडेही दुर्लक्ष करतां येत नाहीं. हें हित साधण्यासही प्रौढ विवाह व वृद्ध विवाहाची बंदी पाहिजे.

मुलांच्या संबधाचें कर्तव्य करण्यांत आईबापांस अति शारीरिक त्रास पडला असतां दुसरीं अवश्य सामाजिक कामें करण्याचें सामर्थ्य त्यांस राहणार नाहीं. व असें झाल्यास फार वाईट परिणाम होतील. कल्पना करूं कीं एका समाजांतील प्रौढ मनुष्यांपैकीं तीनचतुर्थांश मनुष्यें तिशीच्या सुमारास क्षीण होऊं लागून चाळिशींत मरूं लागलीं. तर तो समाज कायम राहण्याकरितां इतर समजांतील लोकांशीं चढाओढ करून त्यांस हटविण्याचें किंवा आपलें संरक्षण करण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत राहणार नाहीं. व हें काम मुलांना आणि तरुण पुरुषांना करणें भाग पडून नेपोलियनच्या लढायांनंतर फ्रेंच राष्ट्रास जशी अवस्था आली होती तसा त्या समाजाचा अपकर्ष लवकरच होईल. ह्या संबंधें स्पेन्सर ह्यानें असा उपाय सुचविला आहे कीं स्त्रीपुरुषांना उतार वयांत संतति न व्हावी अशी समाजव्यवस्था असावी. व मातापितरांनीं मुलांच्या संगोपनांत फार सप्रेम लक्ष पुरवावें. आतां स्त्रीपुरुषांची वाढ पूर्ण झाल्यावर प्रजाजनन सुरू व्हावें, हेंही ह्या मुद्यासंबंधें जरूर व इष्ट आहेच. आपल्या हिंदू विवाह रीतीविषयीं पहिल्या उपायासंबंधें विशेष लिहिणें नको आहे. व दुसऱ्या उपायासंबंधें ह्यापूर्वीं उल्लेख आलाच आहे. सारांश समाजशास्त्रसंबंधें विचार केला व समाजहित, संततीचें हित, व स्त्रीपुरुषांचें हित, तिघांच्याही हिताचा विचार केला तर असें ह्मटलें पाहिजे कीं, हिंदुस्थानचे विवाहपद्धतींत, बालविवाह बंद करणें नसेल तर निदान बालप्रजाजनन हें तरी समूळ बंद झालें पाहिजे हीच अत्यंत अवश्य सुधारणा आहे.

स्पेन्सरचा साद्यंत उतारा.

४३. ह्या भाग संपविण्यापूर्वीं स्पेन्सरच्या समाजशास्त्रांतील एक साद्यंत उतारा येथें घेऊं. त्यांत लग्नाचे खरे हेतु काय आहेत, व त्यांचें परस्पर महत्त्व कसें आहे; व ते साधण्यास कोणत्या चाली फार सोयीच्या आहेत ह्याचा स्पेन्सर ह्यानें इतिहासदृष्ट्या आणि समाजशास्त्रदृष्ट्या विचार थोडक्यांत केला आहे ह्मणून तो उतारा येथें घेणें अवश्य आहे:—

"साधारण रीत्या जेव्हां कोणत्या सामाजिक चाली चांगल्या, किंवा गृहस्थिति कशी असावी, ह्याविषयीं वादविवाद निघतो, तेव्हां त्याचा निर्णय क-

रितांना ज्यांचा विवाहांत प्रत्यक्ष परस्परसंबंध येतो त्यांच्याच कल्याणाचा मात्र विचार आपण करितों. स्त्रीपुरुषांच्या लग्नसंबंधाचे नियम ठरवितांना त्यांपासून चालत्या पिढीला कितपत सुख होईल किंवा कितपत अपाय होतील इकडे काय तें लक्ष असतें; परंतु त्या चालींचा आपल्या भावि प्रजेवर काय परिणाम होईल हें कोणी पाहत नाहीं. मग अर्थातच त्याच्याही मागूनच्या पिढ्या कशा होतील किंवा त्यांना कशी स्थिति येईल ह्याचा विचार त्यांच्या स्वप्नींही येत नसेल. ही विचारसरणी उलट केली पाहिजे.

"तसेंच आपली कुटुंबव्यवस्था कशी असावी हें ठरवितांना जी व्यवस्था आपला समाज परंपरेनें उत्कर्षस्थितींत राहण्यास विशेष अनुकूळ असेल तीच स्वीकारिली पाहिजे. प्रत्येक समाज त्यांतील सर्व मनुष्यें मिळून एका वेगळ्या प्राणिकोटीप्रमाणें आहे, आणि इतर प्राणिकोटींप्रमाणें त्याचेंही अस्तित्व परंपरेनें राहणें अवश्य आहे; कारण, मागें सांगितल्याप्रमाणें इतर जातींपैकीं प्रत्येक जातीचे प्राणि एक समुदायानें राहिल्यामुळें त्यांचें अस्तित्व परंपरेनें राहतें; परंतु मनुष्यजातीचें अस्तित्व वेगवेगळ्या समाजरूपानें राहतें, ह्यामुळें सृष्टींतील सर्व मनुष्यजातीची परंपरा चालत जाणें ह्मणजे तिच्या वेगवेगळ्या समाजांची परंपरा चालत जाणें होय, म्हणून समाजाची परंपरा चालत जाण्यास जी कुटुंबव्यवस्था फार हितावह ती चांगली असा प्रथम सिद्धांत ठरविला पाहिजे.

"सशक्त आणि पुष्कळ मुलें होऊन तीं सर्व प्रौढ दशेत यावीं हा दुसरा हेतु लग्नाच्या योगानें साधला पाहिजे, व याचा उपयोग समाजाचें अस्तित्व राहण्यास विशेष असल्यामुळें महत्वानेंही याला दुसरा नंबर देणें योग्य आहे. कोणी ह्मणतील कीं, संतति पुष्कळ असून पुनः ती सशक्तही असण्याची काय गरज आहे? कोणता तरी एक प्रकार असला ह्मणजे पुरे. हें प्रथमदर्शनीं खरें दिसतें; परंतु अनुभवावरून असें सिद्ध आहे कीं, कोणत्याही समाजांत आणि विशेषेंकरून नवीन स्थापन झालेल्या समुदायांत त्यांतील मनुष्यांची केवळ संख्या जरी अनियंत्रित वाढत गेली तरी त्यांचा उत्कर्ष होत नाहीं, परंतु प्रसंगीं त्यांचें अस्तित्व कायम राहण्याची देखील पंचाईत पडते, आणि उल-

ट लहान मुलांच्या मृत्यूंची संख्या वाढणें हेंच त्या समाजाच्या बचावाचें साधन होतें.

"ह्याप्रमाणें प्रथम समाजाचें हित साधलें पाहिजे; त्यानंतर मुलांचें; आणि त्याच्या खालोखालची महत्वाची गोष्ट आईबापांचें स्वतःचें हित होय; ह्मणून ज्या लग्नपद्धतीच्या योगानें वरील दोन्ही परिणाम चांगले घडून शिवाय लग्न करणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या शरीरास फारसा त्रास न पडतां तेही सुखाच्या आणि भरभराटीच्या स्थितींत असतात, ती लग्नपद्धति उत्तम होय.

"लग्नाचा चौथा आणि शेवटला परिणाम असा झाला पाहिजे कीं, लग्न करणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या वयाच्या उत्तरार्धांत त्यांच्या मुलांनीं आनंदानें त्यांची चांगली बरदास्त ठेवावी; व हालअपेष्टा न होतां त्यांचा तो काळ सुखांत जावा. ह्यापासून त्या मुलांसही एक प्रकारचा आनंद वाटत असतो, हें आपल्या पाहण्यांत आहेच.

"हे सर्व नियम एकत्र करून पाहतां त्यांपासून आपणांस असा एक उपसिद्धांत ठरवितां येतो कीं, अमुक प्रकारची लग्नपद्धति सर्वांत उत्तम असें असणें ह्मणजे तिच्या योगानें समाजाचा आणि त्यांतील मुलें व तरुण पुरुष ह्या दोहोंचाही उत्कर्ष होणें; मुलें जन्मल्यापासून प्रौढ दशेंत येतपर्यंतच्या अवकाशांतील त्यांच्या मरणाची संख्या फार कमी होणें; आणि त्यांस वाढविण्याच्या कामीं त्यांच्या आईबापांस फारच थोडा त्रास पडणें; हें त्या लग्नपद्धतीपासून साधलें पाहिजे. ह्या तिन्हीं गोष्टींचा मेळ तीन रीतींनीं होऊं शकतो. प्रथम मुलें होऊं लागण्यापूर्वीं आयुष्याचा बराच भाग स्वतःच्या वृद्धीकडे लागला पाहिजे; दुसरें अतिशय मुलें होऊं नयेत, व जीं होतील त्यांस यथायोग्य काळजीनें आणि प्रेमानें वाढवावें; आणि तिसरें, फार वार्धक्य होईपर्यंत प्रजोत्पत्तीचा क्रम ठेऊं नये. ह्मणजे पुढें पुष्कळ दिवस सुखांत घालविण्यास सांपडतात."

स्पेन्सरमतें उत्तम विवाहपद्धति व रानटी विवाहपद्धति यांचें अंतर

४४. "प्राणिवर्गांतील स्त्रीजातीच्या आणि नरजातीच्या अनियंत्रित शरीरसंबंधाचा, आणि त्यांच्यांतील आईबाप आणि मुलांच्या नात्यांचा विचार केला असतां हल्लींची (यूरोपांतील) कुटुंबव्यवस्था जशी सर्वांत उत्तम अशी

ह्मटलें ह्मणजे बालमृत्यु, बालहत्या, लवकर स्त्रीपुरुषांचा समागम, काबाडकष्टामुळें व प्रजोत्पादनामुळें बायकांचें अल्पायुष्य, स्त्रीपुरुषांची कमी प्रीति व वृद्ध मातापितरांचे हाल हीं होत.

ठरते, त्याचप्रमाणें मनुष्याच्या रानटी स्थितीचा आणि सुधारलेल्या स्थितीचा विचार केला असतां हीच व्यवस्था सर्वांत उत्तम ठरेल. रानटी लोकांत लहान मुलांच्या मृत्यूंची संख्या फारच मोठी असते असें आढळतें; थोडीबहुत तरी बालहत्येची चाल त्यांच्यांत असतेच; व दुसऱ्याही कित्येक अडचणींमुळें मुलांस अल्पवयांत मृत्यू फार येतात. किंबहुना हे सर्व प्रकार एकाच ठिकाणींही सुरू असतात. तसेंच ह्या निकृष्टावस्थेंतील लोकांत स्त्रीपुरुषांच्या समागमास अल्पवयांत आरंभ होऊं लागतो; अर्थात्च प्रजोत्पत्तीही लवकरच होऊं लागते; ह्यामुळें त्यांची शारीरिक स्थिति फार खराब होते. शिवाय विशेषेंकरून बायकांना अनेक प्रकारचे काबाडकष्ट करावे लागल्यामुळें प्रजोत्पत्ति व काबाडकष्ट ह्यांनीं त्यांची दुहेरी दुर्दशा होते. सुधारलेल्या लोकांत स्त्रीपुरुषांस परस्पर प्रेमसुख प्राप्त होतें तितकें त्यांस होत नाहीं; व थोडेंबहुत होतें तें अल्पकाळपर्यंत मात्र टिकतें. शेवटीं मुलांना वाढवून तीं मोठीं झाल्यावर मग जें वृद्ध मातापितरांस सुख होणार तोंवर हीं क्षीण झालेलीं आईबापें बहुतकरून मरणाच्या पंथांत असतात, किंवा कोणी तरी त्यांस मारून टाकितात, अथवा त्यांचीं पोरें त्यांस सोडून देऊन विचारीतनाशीं होतात, ह्मणून त्यांची प्रकृति क्षीण होऊन त्यांत दुसरा कांहीं रोग होऊन व योग्य बरदास्त न राहिल्यामुळें हाल होऊन ते मरतात. ह्या एकंदर विचारांवरून असें दिसतें कीं हल्लींचे [ यूरोपांतील ] कुटुंबविषयक जे नियम आपण पाळितों ते नीतिदृष्ट्या सर्वोत्कृष्ट आहेत, इतकेंच नाहीं, परंतु शिवाय शारीरिक शास्त्रदृष्ट्या आणि समाजशास्त्रदृष्ट्याही ते उत्तम आहेत असें ह्मटलें पाहिजे. "

येथें येवढें सुचविणें योग्य आहे कीं अमेरिकेंत व यूरोपांतील देशांत जे लग्नसंबंधांत फेरफार होऊं पाहत आहेत व धर्मबंधन नाहींसें होऊन केवळ कराराचें स्वरूप लग्नास येण्याचा संभव दिसत आहे, ही स्थिति प्रशंसनीय नाहीं व ती स्पेन्सर यांस पसंत आहे असें समजूं नये. वरील उताऱ्यांतील ' हल्लींचे नियम ' हे शब्द या नवीन होऊं पाहणाऱ्या स्थितीस लक्षून नाहींत.

४५. हें भयंकर गृहस्थितिवर्णन आपल्या लोकांस किती अक्षरशः लागू पडतें ! मातापितरांचा आणि अपत्यांचा मात्र संबंध आपल्या लोकांत निर्दयतेचा नाहीं. बाकी वरील निकृष्टावस्थेंतील गृहस्थितीचें वर्णन अक्षरशः लागू पडेल. आपल्या समाजस्थितीचें पूर्ण बिंब आपल्या विचारदर्पणांत न्याहाळून पहा, आणि ज्या पुरातन

आपल्या देशास हें वर्णन अक्षरशः लागतें. आपल्या लोकांस स्त्रियांचे स्थितीची कींव आली पाहिजे.

सुधारणेविषयीं आपण गर्व मानितों ती सुधारणा आपल्यांत असूनही हा आपला समज अद्याप केवळ रानटी स्थितींतच आहे किंवा नाहीं, ह्याचा निर्णय करा. ज्यांत बालवध मधून मधून होतच आहेत ; स्त्रियांचें आयुष्य काबाड कष्ट व अल्पवयांत प्रजाजनन यांमुळें अगदीं अल्प झालें आहे ; लहान मुलांच्या मृत्यूंची संख्या फारच मोठी आहे ; स्त्रीपुरुषांचा प्रेमसंबंध ह्मणजे केवळ एकमेकांविषयीं समाधानवृत्ति असणें इतकाच ज्यांत मानितात; असा हा समाज केवळ रानटी स्थितींतच नाहीं काय ? बालवध हा एक निंद्य गुन्हा आहे ; परंतु तो देखील नुसत्या लोकमताच्या जोरावर बंद झाला नसून सरकारच्या दयाळू प्रयत्नांनीं कमी झाला आहे. पण ह्या कोमळ अनुकंपनीय स्त्रियांची आपणास कींव येत नाहीं, व सरकारही त्यांच्याविषयीं दयाळू होऊन कांहीं करूं शकत नाहीं. लोकहो, ह्या स्त्रियांच्या दुर्दशेची तुह्मांस कींव येऊं द्या; त्यांचें बालपण तुमच्या चालीरीतींनीं अगदीं संपुष्टांत आलें आहे त्याजबद्दल तुह्मांस वाईट वाटूं द्या ; त्यांचें तारुण्य नवरे अगदीं क्षणिक व रोगपीडित करून टाकीत आहेत त्याजबद्दल तुह्मांस दयेचा पाझर फुटूं द्या ; व पंचविसाव्या वर्षींच अगदीं वार्धक्यस्थितींत आलेली, व मृत्युकूपाच्या अगदीं कांठावर येऊन ठेपलेली ही जी तुमची कुलस्त्री, तिजबद्दल तुमचे हृदयांत सलज्ज खेद उत्पन्न होऊं द्या. माझी पूर्ण खातरी आहे कीं, आमच्या समाजांतील दयार्द्र व समंजस मातापितरें लवकरच हा आपल्या समाजाचा दुर्लौकिक व दुःखस्थिति नाहींशी करून टाकतील ; आपल्या स्त्रियांची स्थिति वाईट आहे हें ते कबूल करतील ; आणि त्याजबद्दल सुधारणा करण्याचे उपाय हल्लींच्या समाजशास्त्रांत आधारभूत मानलेल्या स्पेन्सर साहेबांनीं दर्शविलेल्या दिशेनें अमलांत आणण्याचा उद्योग

करतील. कदाचित् जितकी कल्पना वाटते, किंवा सप्रमाण दाखवितां येईल तितकी वाईट दशा आपल्या समाजाची नाहीं असें जरी मानिलें तरी इतकें निर्विवाद आहे कीं समाजशास्त्रदृष्ट्या आपली विवाहपद्धति चांगली नाहीं; आणि निदान ती स्थिति तरी सुधारण्यास आपणांस प्रयत्न केले पाहिजेत व या प्रयत्नांची मुख्य दिशा स्त्रीपुरुषांचा प्रौढ वयांत समागम होणें हीच आहे हें आपण पूर्ण लक्षांत वागविलें पाहिजे.

---

## सारांश.

स्त्रीपुरुषसमागम हा सर्व प्राणिमात्रांस साधारण आहे, व लग्नसंस्था पशूंत नाहीं तशीच अगदीं रानटी स्थितींतल्या मनुष्यांत नव्हती. यावरून लग्न ह्मणजे संभोगाचें नियमन हें कांहीं कारणावरून उत्पन्न झालें असावें हें निर्विवाद आहे. आतां हा निर्बंध कसा उत्पन्न झाला व लग्नाच्या चाली कसकशा बदलत गेल्या हें या लेखांत वर्णिलें आहे. तसेंच लग्नाचे समाजशास्त्रदृष्ट्या हेतु काय व ते आपल्या चालीमुळें कितपत साधतात हेंही दाखविलें आहे.

लग्नसंस्था उत्पन्न होण्याचीं कारणें दंतकथांतून सांपडतात. श्वेतकेतु व दीर्घतम्याच्या गोष्टी भारतांत दिल्या आहेत त्यांवरून वृद्धपणीं व लहानपणीं पुरुषांस सोडून बायका (किंवा उलट) जात असत. या अडचणीमुळें लग्नाची मर्यादा या ऋषींनीं बांधून दिली आहे. पुष्कळ अंशीं स्पेन्सरच्या सिद्धांता-

शीं या दंतकथांचा मेळ आहे. तो सिद्धांत असा आहे. मनुष्यप्राण्याचे समाज नेहमीं आपसांत लढत असतात. ते जर एकमेकांस खाऊन न टाकतील तरच मनुष्यकोटि जगांत कायम राहील; ह्मणून प्रत्येक समाज बळकट झाला पाहिजे. बळकटी ही दोन गोष्टी, एकी व अधिक संख्या यांपासून आहे. लग्नामुळें एकी वाढते, पितापुत्राचें नातें निश्चित होतें, कुटुंब, एकजाति, जात्यभिमान व पूर्वजभक्ति उत्पन्न होतात. तसेंच अनियमित व्यवहारापेक्षां लग्नपद्धतीपासून पुष्कळ प्रजा होते हें प्रसिद्धच आहे. याप्रमाणें लग्नपद्धति प्रचारांत लढाईच्या संवयीमुळें आली, व ज्या समाजांत आली त्यांनीं इतरांस नाहींसें करून टाकिलें.

कांहीं शास्त्रकार ह्मणतात कीं प्रथम अनियमित व्यवहार ह्मणजे सामाजिक मिळकत समजत असत, व नंतर लग्न ह्मणजे विशिष्ट मिळकत; परंतु हें मत निराधार आहे. पशू ही खासगी मिळकत, भक्ष्य बसण्याची जागा वगैरे समजतात. तसेंच सामाजिक मिळकत ही कठीण कल्पना रानटी लोकांचा संभवत नाहीं. असो; लढाईमुळें लग्नें प्रचारांत आलीं व लढाऊ लोकांनीं इतर लोक जिंकून पृथ्वी व्यापिली, यामुळें इतिहासप्रसिद्ध सर्व लोकांत प्रथम बायका पकडून आणणें भूषण समजत; ह्मणून बायका ह्मणजे मिळकत. असा समज दृढ झाला. लग्नामुळें कुटुंबें झालीं, व लवकरच कुटुंबाधिपतीस अनियंत्रित अधिकार प्राप्त झाला; यामुळेंही हा समज वाढला लढाऊ लोकांत गुलामगिरी उत्पन्न झाली. मग बायकांस गुलामाप्रमाणें समजत यांत आश्चर्य नाहीं. रोमन लोकांत बापाचा पूर्ण अधिकार मुलीवर असे, व कायद्यानें ( द्वादश फलकांत ) असें ठरविलें होतें कीं याचा अधिकार बायकोवर आपल्या मुलीप्रमाणें आहे. असो. बहुतेक लोकांच्या हल्लींच्या चालीवरून ही समज अद्याप आहे असें दिसतें; समाजमतंही असेंच आहे; ह्मणजे जी स्त्री नवऱ्याच्या पूर्ण अंकित असेल ती चांगली; पण स्त्रीच्या अंकित जो पुरुष असेल तो निंद्य मानतात. बायका ह्मणजे मिळकत असें समजून पूर्वी पुष्कळ लोकांत त्यांस गाहाण, फरोखत, भाड्यानें देत असत. कांहीं लढाऊ लोकांत जातिशुद्धत्वाविषयीं कटाक्ष असे, कांहींत सदृढ प्रजेकडे लक्ष असे; यामुळें

लग्नाच्या चालींत वय व जात यांविषयीं नियम पडले. पण बहुतेक लोकांत विशेष नियम नव्हते.

जेव्हां मोठमोठालीं राष्ट्रें बनून शांतता कायम झाली, लढाया कमी झाल्या,-तेव्हां स्त्रियांविषयीं प्रीति, पातिव्रत्य इत्यादि मनोविकार उत्पन्न झाले. रानटी लोकांस हे विकार नसतात याचें उदाहरण नीग्रो लोक आहेत. त्यांच्या भाषेत वरील विकारांस शब्दच नाहींत. होमरच्या वेळेसही हे विकार फारसे प्रबल नव्हते. इलियडमध्यें याचें वर्णन फारसें नाहीं. असो. याच विकारांचा विकास शिव्हलरीच्या रूपानें फार झाला व त्याचा अंमल अद्यापिही पाश्चात्य देशांत आहे. या विकारांमुळें लग्नाच्या चालींत मोठा फरक हा पडला कीं स्त्रियांना स्वयंवराचा अधिकार प्राप्त झाला. तसेंच एकपत्नीनियमही अमलांत आला. पाश्चात्य देशांत हे दोन्ही परिणाम अजून पूर्ण आहेत, व अत्यंत प्रीति व एकनिष्ठेचीं उदाहरणें तिकडे पुष्कळ सांपडतात. आपल्यांतही पूर्वीं स्वयंवर व एकपत्नीत्व होतें. रामचंद्र व सीता यांचें अद्वितीय चरित्र याची साक्ष देतें व असलें मोहक चरित्र कधींही बनवितां येणार नाहीं; परंतु ते दिवस फार दूर गेले. बालविवाहाच्या चालीमुळें आपल्यास त्या प्रीतीची कल्पना करतां येत नाहीं.

स्त्रियांस स्वतंत्रता प्राप्त झाल्यामुळें रोमन राष्ट्रांत अनीति फार पसरली; यामुळें ख्रिस्ती धर्माचा मोठा कटाक्ष नीति सुधारण्याकडे होता; ह्मणून विवाहाचे बाबतींत ख्रिस्ती धर्मानें आपला पूर्ण अंमल बसविला. जू लोकांच्या चालीवरून लग्नाचा संस्कार घेतला व लग्नाचे अनेक नियम केले. व्यभिचार व सपिण्ड लग्नें अगदीं बंद केलीं. याप्रमाणें पाश्चात्य देशांत लग्न ह्मणजे धर्मविधि बनून गेला तो अद्यापिही आहे. धर्मसंस्कारावांचून झालेलें लग्न कायदेशीर समजत नाहींत. हिंदुस्थानाचा इतिहास उपलब्ध आहे तेव्हांपासून लग्न ह्मणजे संस्कार आहे. सर्व धर्मांची प्रवृत्ति सामाजिक विषयांतही नियम घालण्याची आहे. यामुळें स्त्रियांचें स्वातंत्र्य, स्वयंवरादि कमी होऊन बालविवाह, विधवासंन्यास इत्यादि अमलांत आले, परंतु वैवाहिक नीति हिंदुलोकांची फारच उत्तम राहिली हें इतिहासप्रसिद्ध आहे.

अलीकडे पाश्चात्य देशांत व अमेरिकन स्त्रियांना पूर्ण स्वतंत्रता आली आहे. अविवाहित राहण्याचा त्यांस अधिकार आहे. मिळकतीचा वारसा त्यांस पुरुषाप्रमाणें मिळतो व उपभोगगही घेता येतो. विद्या व कला यांत त्या पुरुषांची बरोबरी करीत आहेत. लढाईतही करूं शकतील. यामुळें कांहीं अभिमानी लोकांस असें वाटतें कीं लग्न ह्मणजे केवळ करार ठरला पाहिजे. हल्लीं कोणत्याही देशांत लग्न ह्मणजे करार नाहीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे ह्मणजे पतिपत्नीचीं कर्तव्यें कायद्यानें ठरविलीं आहेत व हा संबंध पाहिजे तेव्हां तोडता येत नाहीं. करारांत कर्तव्यें पाहिजे तीं ठरवितां येतात व तो तोडल्यास नुकसान मात्र द्यावें लागतें. असो. हा लग्नाचा कल प्रशंसनीय नाहीं; कारण यापासून संततीचें फार नुकसान आहे.

याप्रमाणें लग्नाच्या संक्रमणेतिहासांत चार पायऱ्या आहेत. प्रथम बायकांस मिळकत समजत. नंतर त्यांस (१) स्वतंत्रता पुष्कळ मिळून मुख्य (२) स्वयंवर व एकपत्नीत्वाचा हक्क मिळाला. नंतर स्त्रीपुरुषांचा संबंध ह्मणजे एक धर्मसंस्कार झाला. अगदीं अलीकडे लग्न ह्मणजे (३) करार होऊं पाहत आहे. आतां (४) लग्नाचे हेतु सामाजिक दृष्ट्या काय आहेत व ते कसे साधतात हें पाहिलें पाहिजे. हें विवेचन करतांना स्पेन्सरचा सायंत उतारा घेतला आहे.

१. लग्नाचा पहिला हेतु समाजाचा फायदा. तो कोणता हें प्रथमारंभीं सांगितलें आहे. एकी व संख्यावृद्धि. आतां लग्नाच्या रीति अनेक आहेत. त्यांत एकपत्नीविवाहामुळें एकी फार चांगली साधते. रजपूत व मुसलमानी इतिहासाकडे पाहिलें तर सावत्र भावांच्या लढायांमुळें फार नुकसान झालें असें दिसून येईल. आपल्या लोकांत श्रीमंत व राजे यांखेरीज बहुतकरून अनेक बायका करीत नाहींत; परंतु राजे लोकांच्याच लग्नापासून फार नुकसान आहे. ज्या द्वितीय विवाहाच्या शर्ती आपल्या धर्मांत लिहिल्या आहेत त्या फार इष्ट आहेत. त्या पाळल्या मात्र पाहिजेत.

२. लग्नाचा दुसरा हेतु मुलें सशक्त व पुष्कळ उत्पन्न व्हावीं. पुष्कळ लोकांची नजर लग्नांत लग्न करणाऱ्यांच्या हिताकडे मात्र असते; परंतु ही मोठी चूक आहे, व संततीच्या हिताकडे लक्ष न दिलें व लग्नापासून संतति बळकट न

निपजली तर पिढ्यानुपिढ्या तो समाज अशक्त होऊन इतर समाज त्यास जिंकून टाकतील. निरनिराळ्या लग्नपद्धतींत संततीचें हित निरनिराळ्या तऱ्हेनें साधतें. हिंदुलोकांच्या बालविवाहादि चालींपासून संतति अशक्त होते ह्याचें स्पष्टीकरण पृथक् होईल. संतति दृढ व पुष्कळ व्हावी याचें मुख्य साधन स्पेन्सरमतें स्त्रीपुरुषांची वाढ पूर्ण होऊन नंतर प्रजाजनन व्हावें हें आहे

३. तिसरा हेतु लग्न करणाराचें हित. याचें साधन स्त्रीपुरुषांची पूर्ण वाढ होऊन प्रजाजनन व्हावें, तसेंच वृद्धपणीं न व्हावें इत्यादि आहे.

निकृष्ट स्थितींतील लग्नपद्धतीचें लक्षण स्पेन्सरनें असें दिलें आहे: बालमृत्युसंख्या फार असते. बालहत्याही सुरू असते. लवकर रजोदर्शन होऊन अल्पवयांत प्रजाजननास आरंभ होतो. बायकांच्या काबाडकष्टामुळें व प्रजाजननामुळें लवकर मृत्यु होतो. नवराबायकोंची प्रीति चांगली असत नाहीं. वृद्ध मातापितरांची जोपासना मुलें ठेवीत नाहींत. आपल्या गृहस्थितीकडे लक्ष दिलें तर मातापितरांच्या व मुलांच्या संबंधाव्यतिरिक्त बाकी वरील वर्णन अक्षरशः आपल्यास लागू होईल, म्हणून हिंदु लोकांस हेंच उचित आहे कीं त्यांनीं आपली गृहस्थिति सुधारली पाहिजे व स्पेन्सर ह्यांचा महान समाजशास्त्रवेत्ता याच्या सिद्धांताप्रमाणें स्त्रीपुरुषांची पूर्ण वाढ झाल्यानंतर स्त्रीपुरुषसमागम व्हावा हेंच सुधारणेचें मुख्य तत्त्व आहे.

---

टिळक ग्रंथसंग्रहालय
दा. क्र.
14831
301.42 3
वाई जि. सातारा

१४८३१/ विविध/३१